१९ ऑगस्ट १९६७

चाळीस पैसे




# छोडो भारत: जुनी घोषणा, नवीन शत्रू

# फॉस्फोमिन -



अधिक उत्साह देते.



भूक वाढविते. जोम
वृद्धिंगत करते.



शरीराची रोग-
प्रतिकार-क्षमता
वाढविते.




खरोखर!...
फॉस्फोमिन म्हणजे
घरकुलांतील
आरोग्याचे कारंजे!

विहटॅमिन बी कॉम्प्लेक्स आणि विविध ग्लिसरोफॉस्फेटसंयुक्त उत्तम
फलास्वाद असलेले हिरव्या रंगाचें टॉनिक—फॉस्फोमिन

SQUIBB

® हा ई. आर. स्क्विब ॲण्ड सन्स इन्कॉर्पोरेटेड यांचा रजिस्टर्ड ट्रेडमार्क आहे व करमचन्द प्रेमचन्द प्रायवेट लि. यांना तो वापरण्याचे लायसन्स आहे

SARABHAI CHEMICALS

Shilpi SC 50A/67 Mar

समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : बारावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

स. न.

श्री. ज. जोशींची 'एक संध्याकाळ' वाचली आणि 'कातरवेळची हुरहूर' वगैरे शब्दांचा अर्थ त्या वेळीच प्रथम समजला. आजवर बालगंधर्वांविषयी बरंचसं वाचलंय, ऐकलंय तर उदंड. पण ते सगळं वाचून आणि ऐकून कळलं ते इतकंच की, बालगंधर्व म्हणजे कुणीतरी अतिमानवी व्यक्ती—साक्षात् गंधर्वाचा किंवा प्रत्यक्ष रंगदेवतेचाच अवतार ! पण अखेर बालगंधर्व झाले तरी त्यांना माणूस म्हणून जगावं लागलं हे फक्त श्री. जं.चा लेख वाचूनच जाणवलं. नटसम्राट अॅम्ब्युलन्समधून स्मशानात नेला होता. रुक्मिणीचा महाल आणि कोंबडीची पिसं, अंड्यांची टरफलं, चिता धडधडत होती. सुभद्रा, रुक्मिणी, भामिनी तिथे जळत होत्या ! सारं वाचून मन थकून गेलं. कित्येक वर्षं कल्पनेनं आकारलेली एक लावण्यमूर्ती हादरू लागली. आणि कधी न समजलेले बालगंधर्व त्या वेळी फक्त समजले !

शकुंतला फडणीस, पुणे

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच, असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २.
दूरध्वनी : ५७३५९



# दा दा,

# ते आलेच नाहीत !

शाहुनगरवासी कंपनीचा मुक्काम कोल्हापूरला होता. शिरस्त्याप्रमाणे पहिल्या प्रयोगाला शाहूमहाराजांना निमंत्रण देण्यासाठी गणपतराव वाड्यावर गेले.

महाराज म्हणाले–

“ गणू, माफ कर. मला नाटकाला येण्याचा आग्रह करू नकोस ”

“ का ? ”

“ कारण सांगण्यासारखं नाही ”

“ तरी पण मला कळायला हवं ”

“ अरे, आताशा मला लघवीचा त्रास होतो. नाटकाला आल्यावर वरचेवर उठावं हे बरे दिसणार नाही. ”

गणपतराव हात जोडून म्हणाले—

"महाराज, आपण नाटकाला या. नाटक संपेपर्यंत आपल्याला लघवीची याद आली तर पुनः तोंडाला रंग फासणार नाही!"

प्रेक्षकांना तहानभूक, व शरीरधर्म विसरायला लावण्याची शक्ती असलेल्या नटसम्राट गणपतराव जोशी यांच्या संबंधीची ही आठवण प्रा. ना. सी. फडके यांनी गणपतराव जोशी यांचेवरील आपल्या लेखात दिली आहे.

७ मार्च १९२२ रोजी वयाच्या ५५ व्या वर्षी गणपतराव निधन पावले. अच्युतराव कोल्हटकरांच्या 'श्रुतिबोध' कचेरीतून संध्याकाळी ६ वाजतां निघालेल्या प्रेतयात्रेत हजारो लोक सामील झाले होते.

गणपतरावांच्या मृतदेहावर तीनशे रुपये किंमतीचा भरजरी शेला घालून बालगंधर्वांनी गणपतरावांना अखेरचा मुजरा केला!

स्वर्गारोहण झाल्यावर गणपतरावांनी नारायणरावांना विचारले असेल—

"नारायणा, तुझ्या अंगावर रे कुणी काय घातले? तुझ्या प्रेत यात्रेला तर तुझे लाखो भक्त जमले असतील नाही?"

बालगंधर्व म्हणाले असतील—

"दादा, ते आलेच नाहीत—"

*विं. ग. कानिटकर*

१९ ऑगस्ट १९६७

# हा समाजवादाचा येळकोट कशासाठी ?

ऑगस्ट क्रांतीच्या रौप्यमहोत्सवाचा मूहूर्त साधून काँग्रेस पक्षातल्या शंभरहून अधिक संसदसदस्यांनी प्रधान मंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांना समाजवादाच्या आवरणाखाली एक आव्हान दिले आहे. सहा महिन्यांच्या आत समाजवादी कार्य-क्रमानुसार वाटचाल सुरू केली नाही तर तुमचे राजकीय भवितव्य धोक्यात येईल, अशी गर्भित धमकीही या आव्हानात अंतर्भूत आहे. काँग्रेस पक्षीय संसदसदस्यांमधला तरुण गट प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांच्यावर रुष्ट आहे ही गोष्ट सर्वांनाच माहीत आहे.

गेल्या फेब्रुवारीतील सार्वत्रिक निवडणुकीनंतर इंदिरा गांधी मंत्रिमंडळ बनवि-ताना तरुण रक्ताला (म्हणजे आपल्याला) वाव देतील अशी या काँग्रेस पक्षाच्या दृष्टीने तरुण असलेल्या सदस्यांची कल्पना होती. श्रीमती गांधी आपल्या मंत्रि-मंडळात वरिष्ठ सहकाऱ्यांशी चर्चा करीत असताना या 'तरुण' सदस्यांतील काही उत्साही जण आपला मंत्रिमंडळात हमखास समावेश होणार आहे असे सांगू लागले होते. परंतु आपले सहकारी निवडताना इंदिरा गांधी यांनी या 'तरुणां'ना डावलले आणि त्या ऐवजी करणसिंग, त्रिगुण सेन, फुलरेणू गुहा अशी बरीच अन-पेक्षित नावे यादीत आढळली. आपले सहकारी निश्चित करताना इंदिराजींनी जसा कामराजांचा सल्ला घेतला नव्हता तसेच या तरुणांनाही विश्वासात घेतले नव्हते. त्यांच्या मंत्रिमंडळात कोणाकोणाचा समावेश होणार आहे या संबंधी त्या वेळी राजधानीत बऱ्याच वावड्या उठत होत्या. परंतु इंदिराजींनी संबंधितांचा अपेक्षाभंग करून आपल्या नेतृत्वाला आव्हान देण्याची कुवत असणाऱ्या कोणाचाही मंत्रिमंडळात समावेश करण्याचे कटाक्षाने टाळले. त्यांच्या या नियमाला दोनच व्यक्ती अपवादभूत होत्या. एक मोरारजी देसाई आणि दुसरे यशवंतराव चव्हाण.

यांपैकी मोरारजी देसाई यांचा जो मंत्रिमंडळात समावेश झाला त्याला कारण म्हणजे महामंत्रिपदाच्या निवडणुकीतून माघार घेण्याची त्यांनी दाखविलेली तयारी. यशवंतराव चव्हाण यांच्या बाबतीत तसे काहीही कारण नव्हते. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस त्यांच्यामागे एकमुखाने उभी आहे हे चव्हाण यांचे खरे सामर्थ्य ! इतर काही राज्यांतील काँग्रेस संघटना आपापसातील हेव्यादाव्यांमुळे खिळखिळी बनत चालली असताना व या अंतर्गत हेव्यादाव्यांमुळे विरोधकांच्या हाती सत्ता जात असताना

# दिल्ली दरबार

— सदाशिव पेठकर

महाराष्ट्रात मात्र काँग्रेसने विधानसभेच्या दोनशेसत्तर जागांपैकी दोनशेहून अधिक जागा जिंकून लोकसभेतही काँग्रेसने बहुमत कायम ठेवण्यास मदत केली. दिल्लीत वावरणाऱ्या काँग्रेसश्रेष्ठांपैकी एवढा मोठा पराक्रम चव्हाणांखेरीज कोणीही करू शकलेले नाही. त्यामुळे महामंत्रिपद कोणाहीकडे गेले तरी केंद्रीय मंत्रिमंडळातील श्री. चव्हाण यांच्या स्थानास धस लागण्याचा सुतराम संभव नाही.

या सर्व पार्श्वभूमीचा विचार केला की, हे समजून येते की इंदिरा गांधी यांना स्वत:ला आणि त्यांच्या विश्वासातील मंडळींना कोणत्याही प्रादेशिक पक्षसंघटनेत स्थान नाही. मोरारजी देसाई यांच्यामागे गुजरात काँग्रेसची शक्ती उभी असली तरी वयामुळे यापुढे इंदिरा गांधींच्या नेतृत्वाला आव्हान देण्याइतकी शक्ती त्यांच्यात उरलेली नाही. आज मोरारजीभाई बहात्तर वर्षांचे आहेत. म्हणजे पुढील निवडणुकीच्या वेळी ते सत्त्याहत्तर वर्षांचे होतील. ऐंशीच्या घरात पोचल्यानंतर महामंत्रिपदासाठी झुंज घेण्याइतकी शक्ती त्यांच्यात उरणार नाही व ही गोष्ट स्वत: मोरारजीभाईंनीही ओळखलेली आहे. अशा परिस्थितीत मंत्रिमंडळात समावेश न झालेल्या 'तरुण रक्ता'ने कोणाकडे पाहावे ? मला कोणावरही हेत्वारोप करावयाचा नाही. परंतु काँग्रेस महासमितीच्या मागील अधिवेशनामध्ये इंदिरा गांधी आणि मोरारजी देसाई यांच्या विरोधाला अव्हेरून भूतपूर्व संस्थानिकांचे तनखे बंद करण्याची मागणी ज्या आग्रहाच्या बळावर मंजूर करून घेण्यात आली ते बळ कोणते हे ध्यानात येण्यास वेळ लागत नाही. देशापुढे संस्थानिकांच्या तनख्यापेक्षा कितीतरी महत्त्वाचे प्रश्न उभे राहिलेले असताना त्यांकडे प्रच्छन्न दुर्लक्ष करून समाजवादाचा आज जो हा पुकारा होत आहे तो कशासाठी हेही स्पष्ट व्हावयास हवे.

आजच या मंडळींना समाजवादाचा पाझर कशासाठी फुटला आहे ? सर्वसाधारण विमाव्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करण्याची त्यांना एवढी घाई का झाली आहे ? समजा, संस्थानिकांचे तनखे आणखी दहा-पंधरा वर्षे चालू राहिले तरी देशावर कोणतेही अरिष्ट कोसळत नाही. सर्वसाधारण विमाव्यवसाय आजच्या स्वरूपात राहिला तरी त्यामुळे अशी कोणतीही राष्ट्रीय हानी होणार नाही की, तिची आताच दखल घेतली पाहिजे. परकीय चलनाचा तुटवडा, अन्न-धान्याच्या दुष्काळामुळे निर्माण झालेले उपासमारीचे संकट, चीन-पाकिस्तान युतिमुळे परकीय आक्रमणाचे

भय, मिझो, नागा आदी बंडखोरांच्या वाढत्या लष्करी कारवाया या असल्या फार गंभीर स्वरूपाच्या आर्थिक आणि राजकीय प्रश्नाबाबत साफ डोळेझाक करून संस्थानिकांच्या पाच कोटी रुपयांच्या तनख्यावाबत घोळ घालत बसलेल्या या 'तरुण रक्ता 'स समाजवादासंबंधी फारशी आस्था नसून समाजवादाच्या लोकप्रिय आवरणाखाली इंदिरा गांधी यांच्या नेतृत्वाला आव्हान देण्याचा डाव खेळावयाचा आहे, असा जर एखाद्याने आरोप केला तर तो संबंधितांना नाकारता येईल काय ? त्याबरोबरच हाही विचार करावयास हवा की हे तरुण रक्त इंदिरा गांधींना आव्हान देण्याइतके समर्थ आहे का ?

यावरून असे अनुमान निघते की कोणा तरी बलदंडाचा आशीर्वाद असल्याशिवाय इंदिरा गांधी यांना समाजवाद आणा, नाही तर खुर्ची सोडा असे दटावण्याइतके धाडस ही तरुण मंडळी करू शकली नसती. या तरुण मंडळींमध्ये आपले मोहन धारिया प्रमुख आहेत. धारियांचे समाजवादाबाबतचे प्रेम इतके उतू जाईलयाची मला कल्पना नव्हती. का या समाजवादाच्या आस्थेपायीच त्यांनी प्रजासमाजवादी पक्षाशी घटस्फोट घेऊन कॉंग्रेसशी मोठ्या चतुराईने सोयरिक लावली! कॉंग्रेसला समाजवादी करण्यासाठी आपण कॉंग्रेसमध्ये जात आहोत किंवा गेलो आहोत, अशी बढाई कोणी मारू नये. कारण पंडित नेहरूंसारख्या समाजवादाने भारावून गेलेल्या आणि त्यांच्या सर्वंकष नेतृत्वास आव्हान देण्याइतके बळ कोणाच्याही अंगात नसताना येथे खुद्द नेहरूंना अभिप्रेत असलेले आर्थिक धोरण अंमलात आले काय ? अशा परिस्थितीत पंडितजींना जे जमले नाही ते आपण करून दाखवू अशा भ्रमात तर ते तरुण रक्त नाही ना? प्रेम आहे ते समाजवादाचे की सत्तेचे, हा प्रश्न या मंडळींना खडसावून विचारला पाहिजे. मोहन धारियांना इंदिरा गांधी यांनी उपमंत्रिपद देऊ केले होते. त्याऐवजी त्यांना हवे असलेले सहमंत्रिपद मिळाले असते तर त्यांना समाजवादाचा आठव झाला असता का, याबाबतचे कल्पकतेचे त्यांचे प्रामाणिक उत्तर जाणून घ्यावयास मी उत्सुक आहे. एवढा जर समाजवादाचा पान्हा फुटला होता तर संयुक्त महाराष्ट्राचा कलश दिल्लीहून निघण्यापूर्वी प्रजासमाजवादी पक्षाची टोपी फेकून देऊन कॉंग्रेस भवनाच्या आजूबाजूला फेऱ्या मारण्याची गरज भासली नसती.

## समाजवादाचा मुलामा

राजकारणाच्या क्षेत्रात हे असले सोयीचे पक्षांतर होत असते हे मलाही माहीत आहे. वाऱ्याची दिशा ओळखण्याचे आणि त्यानुरूप आपली टोपी फिरविण्याचे कसब असणारे कार्यकर्ते महापालिकेतून उठून एकदम राज्यसभेत जाऊन पोचतात. आणि राष्ट्रीय पातळीवरून समाजवादाचा किंवा तसल्याच एखाद्या चलनी नाण्याचा आवाज करून आपले अस्तित्व भासमान करून देतात. आमची फक्त साधी अपेक्षा एवढीच असते की या असल्या सोयीच्या शय्यासोबतीला तत्त्वज्ञानाचा गोंडस मुलामा देऊन भाबड्या जनतेची फसवणूक करू नका. थोडक्यात बोलायचे तर या खास-

दार मंडळींना समाजवादाची तहान लागलेली आहे आणि केवळ त्याच पवित्र उद्देशाने ही मंडळी इंदिरा गांधींविरुद्ध उभी ठाकली आहेत या देखाव्यावर ज्या भोळसटांचेच समाधान होणार असेल ते असो; परंतु राजकीय नीतीचा (!) ज्यांना परिचय आहे ते हेच म्हणतात, की एखाद्या महत्त्वाकांक्षी बलदंडाच्या हातातील ही सारी बाहुली असून त्यांनी इंदिरा गांधी यांना धाडलेले पत्र म्हणजे कळसूत्री बाहुल्यांच्या नाचातील एक दृश्य आहे.

इंदिरा गांधी यांच्याविरुद्ध ज्या शक्ती धीमेपणाने पावले टाकीत आहेत, त्यांना नऊ ऑगस्टच्या मुहूर्तावर कार्यरत होण्याचे धाडस झाले याचे साधे कारण असे आहे की आदल्याच दिवशी लोकसभेत एका दुरुस्तीवर मतदान घेताना सरकार पक्षाचा पराभव झाला होता. गेली वीस वर्षे केंद्रीय सत्ता अव्याहत उपभोगणाऱ्या काँग्रेस पक्षाचा लोकसभागृहात अगदी किरकोळ स्वरूपाचा का होईना पण पराभव व्हावा ही घटना अनेकांना खळबळजनक वाटली. काँग्रेस पक्षात ही अशी खळबळ माजलेली असताना तिचा फायदा घेऊन इंदिरा गांधी यांना सत्ताभ्रष्ट करण्याचा डाव खेळण्यासाठी हे समाजवादाचे नाटकी आवाहन प्रसिद्ध करण्यात आले. इंदिरा गांधी यांचे पक्षांतर्गत दुबळे स्थान लक्षात घेऊन या ना त्या कारणाने त्यांना तेथून दूर केल्यास त्या पदावर केवळ आपलीच निवड होऊ शकते, याची जाणीव नसलेल्या 'तरुण रक्ता'ने हा जो समाजवादी धमकावणीचा स्टंट करून दाखविला, त्यामागे मूळ बनाव आहे तो सत्ता हस्तगत करण्याच्या महत्त्वाकांक्षेचा, इंदिरा गांधी यांच्या राजवटीत देशाचे फार मोठे भले होणार आहे असे मानण्याचे कारण नाही. त्या प्रधानमंत्रिपदावर असणे किंवा नसणे ही घटना काही फार महत्त्वाची नव्हे. त्यामुळे उद्या काँग्रेस पक्षाने त्यांच्याऐवजी दुसऱ्या कोणाची पक्षनेतेपदी निवड केली तर त्यामुळे भारतीय राजकारणात नवे पर्व सुरू होणार आहे असे नव्हे. ज्याच्यामागे बरेच होयबा जमतील त्याच्याकडे पक्षनेतृत्वाची आणि पर्यायाने साऱ्या देशाची सूत्रे येतील. लोकशाहीच्या संकेताप्रमाणे भारतास ही नवी निवडही मान्य करावयास हवी. पण मुख्य मुद्दा आहे तो हा की, इंदिरा गांधी यांची राजवट प्रतिगामी स्वरूपाची आहे असे भासवून समाजवादाच्या पोकळ घोषणा करून पुरोगामित्वाचा टेंभा मिरवणाऱ्या या एकशेछपन्न खासदारांना झोपडपट्टीत राहणाऱ्या गरीबांचा कळवळा आला आहे का नव्या दिल्लीतल्या आलिशान बंगल्यांभोवती त्यांची बुभुक्षित नजर घोटाळत आहे. याबद्दल निदान आपण तरी भ्रमात राहू नये.

O

दक्षिणायन लेखमालेतील शेवटचा लेखांक
साप्ताहिक 'माणूस'च्या पुढील अंकात. संपादक

# मुक्ताफळे



## ☐ चंद्रशेखर : एक मात्रा !

सूतशेखर ही एक गुणकारी मात्रा आहे, आयुर्वेदात त्याला महत्त्व आहे. चंद्रशेखर ही देखील एक मात्रा आहे. आणि ' आयुर्वेडांत ' त्याला महत्त्व आहे ! भारतात प्रतिवर्षी नवी ' आयुष्ये ' घरात निर्माण करण्याचे जे वेड लोकांना लागले आहे, त्यावर चंद्रशेखर या मात्रेचे वळसे आता सुरू झाले आहेत. हेलिकॉप्टरमधून खेडोपाडी संतति-नियमनाची साधने आकाशातून टाकण्याची पहिली कल्पना जेव्हा डॉ. चंद्रशेखर यांनी मांडली, तेव्हाच आम्ही ओळखले की, ही अजब वल्ली दिसते ! अजब मात्रा दिसते. आता दुसरा वळसा नुकताच जाहीर झाला आहे. संतति–प्रतिबंधक शस्त्रक्रिया करून घेणाऱ्यांना आता ' ट्रॅन्झिस्टर रेडिओ ' फुकट देण्याची योजना डॉ. चंद्रशेखर यांनी मांडली आहे. आता रात्री मोकळेपणी, अनेकांना ट्रॅन्झिस्टर रेडिओ उशाशी ठेवून मुलांमुळे घरात निर्माण होणारी दुःखे दाखविणाऱ्या ' अश्रुतिका ' मजेत ऐकता येतील ! (मुंबई ' ब ' केंद्र लावावे.) १४० रुपयांत बाळंतपण करण्यापेक्षा १४० रुपयांत किंवा त्याहूनही कमी पैशांत लोकांना ट्रॅन्झिस्टर देता यावा– (पैसे सरकारच देणार आहे.) यासाठी डॉ. चंद्रशेखर आता जपानशी वाटाघाटी करणार आहेत. या ट्रॅन्झिस्टर रेडिओवर रात्री राष्ट्रगीताप्रमाणे रोज वाजवण्याकरिता, कमी मुलांचे फायदे वर्णन करणारे खास गीत रफीच्या आवाजात लोकांना ऐकवण्याची व्यवस्थाही भारतीय नभोवाणीने केली आहे. लताने हे गीत म्हणण्याचे नाकारले की काय कुणास ठाऊक !

फुकट ट्रॅन्झिस्टर मिळू लागले की, आमच्या डोळ्यांसमोर पुढे काय घडेल याचे चित्र दिसू लागले आहे. आता समजा, उद्या शंकरराव साळुंके यांचेकडे ट्रॅन्झिस्टर वाजू लागला, मग शेजारचे भगवानराव काकडे खवचटपणे विचारणार—

" काय ' ट्रॅन्झिस्टर ' घेतला का ?"

शंकरराव मग लाजून म्हणणार—

" अहो, जरा हळू बोला. पोरं आसपास आहेत !" बाकी पोरांची या क्षेत्रातील प्रगती तोपर्यंत इतकी झालेली असणार की त्यांना या प्रश्नाचे रहस्य सांगण्याचे कारण उरणार नाही. पोराबाळांना लूपविषयक माहिती असावी यासाठी आगपेटीच्या पृष्ठभागावर असलेली लूपची जाहिरात तेवढे कार्य तोपर्यंत करून ठेवील !

डॉ. चंद्रशेखर मात्रेचा तिसरा वळसा अन्नमंत्री अण्णासाहेब शिंदे यांनी दिला आहे लोकांना मुले होण्यात आतापर्यंत 'गणपती'ने मोठी कामगिरी केलेली आहे. मुलगा होण्यासाठी गणपतीला रोज जावे तो मुलगा देण्यापूर्वी गजाननमहाराजांनी तीन-चार मुली ओळीने द्याव्या अशीही उदाहरणे आहेत. या हत्तीवदनी देवर्षीला खरोखरच शिक्षा करणे भाग होते. आता मंत्री झाले तरी देवांना शिक्षा कशी काय करणार ? विवाहाच्या मंगल पत्रिकेपासून विवाहितांच्या नंदनवनात शिरलेल्या या तुंदिलतनू गणराजाला शिक्षा करणे शक्य नसल्याने, अण्णासाहेबांनी भारतातील सर्व हत्तींना 'लूप' मारण्याचा विचार व्यक्त केला आहे. कोपिष्ठ देवाने मुंडके उडवले असताना-हत्ती जातीने गजाननाला वदन दिले आणि तेव्हापासून हा 'मोदक्या' भारतात लोकसंख्या वाढवण्याचे प्रधान कार्य करीत आहे. (शिवाय तांदळाचे एकमेव पक्वान्न यानेच लोकप्रिय केले आहे.) हत्ती जमातीने भारताचे केलेले हे नुकसान पाहून भारतात हत्तींना लूपवंती करण्याचा विचार बिहार, ओरिसा व उत्तर प्रदेश या तीन राज्यांत सुरू झाला आहे, अशी माहिती अण्णासाहेबांनी नुकतीच लोकसभेला दिली. ते पुढे म्हणाले– "हत्तींची लोकसंख्या अजून मोजण्यात आलेली नाही; परंतु त्यांची लोकसंख्या कमी करणे आवश्यक झाले आहे."

आमच्या मंत्र्यांच्या बुद्धीचे हे वळसे पाहून 'डेलीमेल,' 'डेली एक्सप्रेस' या पत्रांनी-या 'ट्रॅन्झिस्टर' कल्पनेची टिंगल करणारी व्यंगचित्रे काढली आहेत. 'ट्रॅन्झिस्टर' रेडिओवर एक खेडूत-कामसूत्रे ऐकत आहे असे एक चित्र 'डेली-मेल' पत्राने छापले आहे. आम्हांला वाटते की 'कामसूत्रे' फुकट ट्रॅन्झिस्टर मिळवणाऱ्या खेडुतांनाच ऐकवली पाहिजेत. कारण त्यांनी आता काहीही ऐकले तरी हरकत नाही, अशा अवस्थेला तोपर्यंत ते गेलेले असणार !

फुकट पदरात न पडलेल्या व विकत घेतलेल्या रेडिओवरच अशा गोष्टी ऐकणे चूक होईल. तसे झाले तर सगळेच मुसळ केरात जाईल.

महाराष्ट्र सरकारने या दृष्टीने गणेशोत्सवांना बंदी करणे आवश्यक आहे. गर्दी जमवणारा आणि गर्दी वाढवणारा हा देव आहे ! तीन मुले ही सध्याची आदर्श संख्या आहे. खरोखर परमेश्वराला भारताची दया येऊन त्याने गुरू दत्तात्रयाप्रमाणे-मुले तीन पण पोट एक असे–एखादे नवे मॉडेल निर्माण केले, तर भारताची अन्नधान्य समस्या कितीतरी लवकर सुटेल. या दृष्टीने पुणे नभोवाणी केंद्राने गणेशचतुर्थीला गणपती अथर्वशीर्ष किंवा 'सुखकर्ता दुखहर्ता' ही आरती रेडिओवर न वाजवता

"दत्त दिगंबर दैवत माझे
–अनसूये ते तत्त्व आगळे"

हे गीत वाजवावे. गीत झाल्यावर–"तीन मुले पण पोट एक" या आगळ्या तत्त्वाचे विद्वानांकडून विवरण करावे. (नाहीतरी तीन मुलांना एका मुलाचेच रेशन हल्ली मिळते.)

नभोवाणी केंद्र जसे हे करू शकेल, त्याचप्रमाणे आदर्श 'कुंकुमपत्रिका' सरकारने तयार करावी. 'गणपती प्रसन्न' किंवा 'म्हाळसाकांत प्रसन्न' या देवतांची तिथून हकालपट्टी करून, 'डॉ. चंद्रशेखर प्रसन्न' असे मध्यभागी त्यांच्या छबीसह छापावे. त्याचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. विवाहाला आलेल्यांनी शक्यतो साधनांचा आहेर करावा. बँडवाल्यांनी ते रफींचे 'अपुत्रगीत' वाजवावे.

असा चौफेर मारा केल्याखेरीज का अन्नप्रश्न सुटणार आहे! चंद्रशेखर यांच्यात हीच एक मात्रा आहे!

## □ स्वदेशी मोटारची चाके

खूप खूप वर्षांपूर्वी आपल्या देशावर इंग्रजांची सत्ता होती, तेव्हा इंग्लिश व परदेशी मालावर बहिष्कार घालण्याची चळवळ आपल्या देशात सुरू झाली. पुढे जातीय वगैरे झालेले स्वा. सावरकर यांनी पुण्याला परदेशी कपड्यांची पहिली होळी पेटविली. महात्मा गांधींनी खादीचे कपडे वापरायचे जनतेला आवाहन केले. आता आपल्यासारख्या उष्ण देशात खादीचा जाडाभरडा कपडा घालणे काही सुसह्य नव्हते. म्हणून तर गांधी स्वतः नंतर उघडे राहू लागले. पण ज्यांना कामधंदा करायला जावे लागते, असे जे लोक ते उघड्या अंगाने कसे जाणार? त्यांनी जाडीभरडी खादी अंगावर घातली ती केवळ स्वदेशी म्हणून. अजूनदेखील मंत्री झाल्याबरोबर सर्व काँग्रेसवाले खादीच वापरतात! इस्त्री नसलेली खादीची टोपी घातली की माणसे कल्हईवाल्यासारखी दिसतात. म्हणून गांधींनीदेखील पुढे गांधी टोपी घालायचे सोडून दिले. पण महिन्यात एकदा घातलेली गांधी टोपी ज्यांना पुनः पुढच्या महिन्याशिवाय घालावी लागत नाही, म्हणजे त्यांच्याकडे परटाकडून इस्त्री करून आलेल्या टोप्यांची चळत असते. असे आपले मंत्री कशी खोचदार तिरपी टोपी घालतात. गांधी टोपीला खोच पाहिजे! ती कोनात घातली पाहिजे–म्हणजे माणूस मंभ्यासारखा दिसतो. काँग्रेसमधले सगळे अल्ली, आझाद यांनी मात्र कधी गांधी टोपी घातली नाही. गांधींना डोक्यावर घ्यायचे नाही, असे सगळ्या मुसलमानांचे ठरलेले असल्याने, त्यांनी ही टोपी घातली नाही. जाऊ द्या! तेव्हा स्वदेशीची चळवळ किती महत्त्वाची आहे, हे आपल्या ध्यानात येईल.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपल्या देशात जो माल तयार होतो तो सगळा स्वदेशी म्हणून प्रत्येकाने वापरला पाहिजे. संपूर्ण स्वदेशी अशी वस्तू अजूनही आपल्याकडे

दुर्मिळ आहे. मंत्री, राज्यांचे गव्हर्नर, आमदार, खासदार याच फक्त १०० टक्के स्वदेशी चिजा आपल्याकडे दिसतात; परंतु पुष्कळशा मशिनरीचे सांगाडे आता आपल्या देशात तयार होतात आणि मोटारी तर स्वदेशी मिळू लागल्याला आता चांगली पाच वर्षे झाली.

पण परवा एका वृत्तपत्रात आम्ही एक स्वदेशी मोटारीसंबंधी बातमी वाचली. त्यावरून मध्यवर्ती सरकार स्वदेशी मालाविषयी किती जागरूक आहे हे लक्षात येईल.

" मध्यवर्ती सरकारने १९५१ च्या इंडस्ट्रीज अॅक्टखाली भारतात तयार होणाऱ्या मोटारींचा दर्जा का खालावला याची चौकशी करण्याकरता एक कमिटी नेमली आहे.

स्वदेशी मोटारींसंबंधी प्रमुख तक्रारी अशा आहेत. सांगाडा करकर वाजतो, दारे लागत नाही, स्टिअरिंग चाक खडखडते, ऑईल सिले गळतात. शॉक अॅबसॉर्बर काम देत नाहीत, एक्झॉस्ट पाईप फुटतात, वाजवीपेक्षा फाजील पेट्रोल लागते. चाके सरळ समांतर बसवलेली नसतात व मोटारीचा रंग टिकत नाही. सरकारची अशी खात्री आहे की जर कारखानदारांनी मनावर घेतले तर हे दोष नाहीसे होऊ शकतील. "

बातमी एवढीच होती.

ही बातमी वाचून आमचा श्वास खाली पडला. आता स्वदेशी वस्तू म्हटली की, थोडेफार दोष त्यात असायचेच. परंतु स्वदेशी मोटार चालतच नाही, असे या तक्रारीत कुठेही म्हटलेले नाही. जोपर्यंत मोटार चालू आहे तोपर्यंत जास्तीत जास्त माणसांनी त्यात बसावे हे तात्पर्य ! दोष असले तरी मोटार स्वदेशी आहे व त्यात आपण बसलो आहोत या आनंदात, मोटारीतून निघणारे निरनिराळे आवाज आपण विसरून जाऊ शकतो.

आम्हांला फक्त हे कळले नाही की जे दोष कारखानदारांनी मनावर घेतले तर नाहीसे होतील असे सरकारला वाटते, त्यासाठी कमिटी कशाला ? परंतु ज्या अर्थी सरकारने कमिटी नेमली आहे त्या अर्थी त्याला तसेच काही सबळ कारण असणार ! शिवाय कमिटीवर काम करायला खूप लायक माणसे असताना कमिटी न नेमणे हे बेकारी वाढवण्यासारखे होणार नाही का ?

बेकारी निवारणावरही स्वदेशी हाच खात्रीचा उपाय आहे.

## □ ब्रह्मचाऱ्यांना नवी संधी !

परकीय वकिलातीत काम करणाऱ्या परदेशांतील वकिलांना व वकिलातीतील कर्मचाऱ्यांना एक जाचक अट असते. ती म्हणजे बायकोला चांगले इंग्रजी आले

[ पान २३ वर चालू ]

# विचार वारे

• समीर

## ☐ वृक्षांचे आरोग्य

वनमहोत्सवाच्या वेळी समारंभाने लावलेल्या झाडांची आपण मागाहून किती काळजी घेतो ? लता-वृक्षांना व पिकांना रोग होतात व ते बरे करण्यासाठी वैद्यकीय उपाय-योजना करावी लागते याची जाणीवदेखील आपल्याकडे फारशी नाही. अशा परिस्थितीत दक्षिण कोरियातील नाणावलेले ' झाडांचे डॉक्टर ' योंग जून लो यांनी काही दिवसांपूर्वी भारताच्या भेटीत या विषयावर दिलेली माहिती विशेष महत्त्वाची आहे. रोग-वाहक जंतू मनुष्यप्राण्याला जसे अपायकारक असतात तसेच रोपांना व झाडांनाही असतात. " दक्षिण कोरियात रोगवाहक जंतूंमुळे पिकांचे फार नुकसान होते व हिंदुस्थानातही तसेच होत असले पाहिजे. उदाहरणार्थ, दक्षिण कोरियात बटाट्याला होणाऱ्या रोगाच्या जंतूंचे नियंत्रण करण्यात यश मिळाल्यावर गेल्या तीन वर्षांत बटाट्यांची पैदास दुप्पट वाढली आहे. तांदळाच्या रोपांना बाधणाऱ्या जंतूंचे नियंत्रण नीट होऊ शकले तर तांदळाच्या पिकात २० टक्के वाढ व्हायला हरकत नाही. हे रोग-वाहक जंतू रोपातच असतात, त्यामुळे उपाय-योजनादेखील आपल्याला करावी लागते—म्हणजे निरोगी बीज शोधून काढावे लागते. वृक्ष-वैद्यक हे फार मोठे शास्त्र असून वृक्षरोग-जंतुशास्त्र हे त्याचे एक लहानसे पण अत्यंत महत्त्वाचे अंग आहे. " हे एक नवीन शास्त्र असून त्यात संशोधनाला खूपच वाव आहे. " मानवी रोगराईविरुद्ध चाललेल्या लढ्याप्रमाणेच वनस्पतींना होणाऱ्या रोगांविरुद्ध चाललेला लढाही कधीच न संपणारा आहे. जोपर्यंत मानव-प्राणी अस्तित्वात आहे व जोपर्यंत पिकांची लागवड होत आहे तोपर्यंत तो चालूच राहणार.

आणखी एक वनस्पतिशास्त्रज्ञ नुकतेच हिंदुस्थानात राहून गेले, ते म्हणजे प्रा. अगाबाबिमान हे सोव्हिएट तज्ज्ञ. फुलांच्या व झाडांच्या आंतरिक रचनेचा हा तज्ज्ञ सध्या " प्राचीन फुलझाडांचे परस्पर-संबंध " शोधून काढण्यासाठी संशोधन करीत आहे. या संशोधनाचा सामान्य माणसाला उपयोग काय ? उत्तर : प्राचीन पाषाणीभूत फुलांचे अध्ययन करून ते ज्या खडकात सापडतात ते खडक किती प्राचीन आहेत हे कळू शकते. खनिज तेलाचा शोध लावण्यातही या संशोधनाचा उपयोग होऊ शकतो. सोव्हिएट रशियात खनिज तेलाचे भूगर्भ साठे शोधून काढण्यासाठी या पद्धतीचा खूप मोठ्या प्रमाणावर यशस्वीरीत्या उपयोग करण्यात आला आहे.

## □ जिप्सींचे माहेरघर भारत

जगातल्या प्रत्येक देशात जिप्सी ऊर्फ भटकी जमात आहे. पण जगभर पसरलेल्या या जिप्सींचे माहेरघर भारत आहे, व या मताचा पडताळा पाहण्यासाठी रूडॉल्फ व्हिग नावाचे हंगेरियन संगीत–शास्त्रज्ञ, वंजारी जमातीच्या लोकगीतांचा व लोकसंगीताचा अभ्यास करण्यासाठी युनेस्कोच्या शिष्यवृत्तीवर भारतात आले आहेत. गेल्या कित्येक शतकांच्या कालावधीत निरनिराळ्या भटक्या जमातींच्या स्थानांतरामुळे निरनिराळ्या प्रकारचे लोकसंगीत तयार झाले आहे, परंतु अगदी दूरदूरच्या जिप्सींची शिबिरं पाहिली तरी त्यात असे काही तरी आढळते की, त्यावरून जिप्सी हे नावावरून वाटतात त्याप्रमाणे मूळचे इजिप्शियन नसून भारतीय असावेत असे वाटते.

## □ रंगभूमीवर संस्कृतीचे दर्शन

रंगभूमीवर त्या त्या काळच्या सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब पाहावयास मिळते, असे मत कु नादीन शेपर्डस्वन या अमेरिकन रंगभूमितज्ज्ञ स्त्रीने काही दिवसांपूर्वी भारत–भेटीत प्रकट केले. कुठल्याही समाजाच्या सांस्कृतिक जीवनात रंगभूमीला फार महत्त्वाचे स्थान आहे व आधुनिक काळात चित्रपट असूनही आजचा काळ याला अपवाद नाही. सर्वसाधारण नाट्यप्रेमी माणसाला रंगभूमीबद्दल वाटणारे प्रेम हे सद्य:कालीन नाटकांच्याभोवती केंद्रित झालेले असते. विश्वविद्यालयातला व महाविद्यालयातला चोखंदळ रसिक हा प्राचीन-नाट्यकृतींचा चाहता असतो. "परंतु शेक्सपियरची नाटके किंवा जुनी प्रसिद्ध नाटके रंगभूमीवर होत राहण्याचा काळ कधी संपेल असे मला वाटत नाही. खरोखरीच महान् नाट्यकृती कधीच मरत नाही."

## □ दोन मते

"प्रोजेक्ट इंडिया" (भारत–दर्शन) नावाचा कार्यक्रम करण्यासाठी अमेरिकेतील कॅलिफोर्निया विश्वविद्यालयातील आठ तरुण विद्यार्थी–विद्यार्थिनींचा एक गट नुकताच हिंदुस्थानात आला आहे, त्यांच्याशी बोलताना ऐकू आलेली दोन मते :

कायद्याचा विद्यार्थी जॉर्डन पोटॅश :

अमेरिकेत गुन्हेगार-बालकांच्या बाबतीतला कायदा फार अस्पष्ट आहे. अमेरिकन लोकसंख्येपैकी अर्धे लोक वयाने २५ च्या खाली आहेत हे पाहता कायद्यात बदल करण्याची फारच आवश्यकता वाटते.

संगीताची विद्यार्थिनी क्लेर कार्लसन :

संगीत हा निरनिराळ्या लोकांशी विचारविनिमय करण्याचा एक मार्ग आहे—नव्हे, सर्वोत्कृष्ट मार्ग आहे. ○

# लोकशाहीचा रथ धूळ उधळतो आहे

होय, हा सौर-शकट आहे.

लोकशाहीचा सूर्य हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत आणि प्राचीपासून प्रतीचीपर्यंत नित्यक्रमाने प्रकाशित राखण्याचे, विभिन्न राज्यपद्धतींच्या व्योमविहारातील परिभ्रमणशील ग्रह आणि उपग्रह यांना नेमस्तपणे प्रदक्षिणा घालायला लावण्याचे निसर्गदत्त कार्य त्याला साधायचे आहे.

आज हा सौर-शकट, लोकशाही–सूर्याचा हा रथ केंद्रशासित प्रदेशांच्या लहान आणि स्वशासित राज्यांच्या

मोठ्या अशा सत्तावीस चाकांचा आहे. केंद्रशासित प्रदेशांची दहा चाके एकाच आसाला जोडलेली आहेत. स्वशासित राज्यांची सतरा चाके सतरा आसांनी सांधलेली आहेत. या सर्व महारथाची सूत्रे केंद्रस्थानी बसलेल्या अरुण–सारथ्याच्या हाती आहेत.

सार्वत्रिक निवडणुकांच्या रूपाने या महारथाने चार झंझावात पाहिले आणि पार केले आहेत. परंतु या चौथ्या झंझावाताने या महारथाची चाके असमतोल करून टाकली आहेत. ती वेडीवाकडी आणि वंगणरहित करकरत चालू लागली आहेत. चाके चाकोरीबाहेर हेलकावत आहेत. पन्नास कोटी किरणांनी दीप्तिमान होणारा या रथावर विराजमान झालेला जनता जनार्दन भयचकित होतो आहे! कारण, या सौर–शकटाच्या या घोडदौडीमुळे रस्त्यावर अतोनात धूळ उधळायला लागली आहे.

### काय होत आहे ?

लोकशाहीचा वेग वाढला आहे का ?

लोकशाही मार्गक्रमणाचा रस्ता खराब झाला आहे का ?

अरुणाच्या हातातील लगामात ताकद राहिली नाही का ?

या महारथाचे घोडे तर बेफाम झाले नाहीत ना ?

का या अश्वराजांनी जबाबदारीने मानेवर घेतलेले या महारथाचे जू आता त्यांचे त्यांनाच नकोसे झाले आहे ?

काय झाले आहे तरी काय ? हा महारथ असा धूळ का उधळू लागला आहे ? त्यानेच उडवलेल्या या धुरळ्यात अरुणालाच पुढचे दिसेनासे झाले तर काय अनर्थ ओढवणार आहे, याची चिंता जनार्दनाला वाटत आहे.

चौथ्या सार्वत्रिक निवडणुकांनी लोकशाहीची

मो. ग. तपस्वी

भारतीय जडणघडण बदलली आहे; एक प्रकारची शांत क्रांती घडवून आणली आहे. चौथ्या निवडणुकांतून बाहेर पडले ते जनमानसाच्या मंथनाचे नवनीत आहे. मला तर वाटते, की हे भारतीय जनतेचे खरे मतपरिवर्तन आहे.

स्वातंत्र्यानंतरच्या वीस वर्षांत एक नवी पिढी उदयाला आली आहे. तिने या निवडणुकीत मतदानाचा आपला हक्क बजावला आहे. गेल्या दहा वर्षांच्या काळात भारतीय नेत्यांनी जे काही सांगितले, उपदेशिले, आणि आचरले, त्या सर्वांचा बरावाईट संस्कार ग्रहण करून आपल्या राजकीय चिंतनाला आकार देणारी ही पिढीच भारतीय लोकशाहीच्या जीवनरसाला दंड थोपटून आव्हान देती झाली आहे.

## राजकीय धर्मांतराची साथ

पहिल्या झोपेसरशी या नव्या पिढीने जुन्यांचे बोट धरून जवळजवळ अर्ध्या देशातून राजकीय सत्तेची मिरासदारी, मक्तेदारी संपुष्टात आणली आहे. सात राज्यांत कांग्रेसच्या पराभवाचा खरा अर्थ हा असा आहे. परंतु याचा बोध न घेण्याची चूक कांग्रेसने केली आहे आणि तेथूनच या महारथाचे एक चाक डळमळू लागले आहे. राजस्थानात जे कांग्रेसने केले, करविले, तिथेच लोकशाहीला खरे आव्हान मिळाले. जनार्दनाची इच्छा नसतानाही उच्चासनाची हाव बाळगल्याने राजस्थानात राष्ट्रपतींचा अंमल काही काळ आला. पण त्यानंतर तरी परिस्थिती लोकशाहीच्या मानसमंथनाच्या दृष्टीने सुधारली का ? नाही ! राष्ट्रपती शासनाच्या अल्पमुदतीत कांग्रेसने आणि विरोधी पक्षांनीदेखील सत्तापिपासेने लोकनियुक्त आमदारांच्या लोकनिष्ठेचा अपमान करून माणसे फोडली, फोडून पाहिली, तोडलेली जोडूनही पाहिली. आणि या धालमेलीत डचमळून निघाली, लोकांची लोकशाहीवरील मूलभूत निष्ठा. लोकांनी लोकांवर, लोकांसाठी लोकशाहीवर दाखवलेल्या या मूलभूत निष्ठेचा जास्तीत जास्त अवमान करण्याच्या मुलखावेगळ्या स्पर्धेत राजस्थानमध्ये अखेर कांग्रेसची सरशी झाली आणि मोहनलाल सुखाडिया यांना निवडणुकीत न लाभलेले, परंतु नंतर जयपूरच्या आम–बाजारात, छोट्या आणि मोठ्या सादरीत, हवी ती किमत मोजून विकत घेतलेले बहुमत पदरात पाडता आले. अशा प्रकारे राजस्थानच्या डगमगत्या चाकाला भरपूर वंगणाचा मलिदा चारून हा सौर–शकट चालू लागला. पुढची वाटचाल करू लागला.

पण लोकशाहीच्या बाह्य कवचावर चाललेली ही सौदेबाजी इतर राज्यांत पसरली आणि पाहता पाहता निवडणुकीनंतरच्या जेमतेम पाच महिन्यांत आणखी तीन राज्यांतील कांग्रेस सरकारे कोसळली. कांग्रेसच्या ध्येयधोरणावर तिचा पराभव झाला म्हणून ही सरकारे पडली नाहीत. खुर्च्या वाटण्याचे कामी त्या त्या ठिकाणच्या मुख्यमंत्र्यांनी ' हम करे सो कायदा ' या वाक्याने आचरण केले म्हणून त्यांचेच सहकारी बिथरले. या बिथरलेल्यांनी काय केले म्हणाल ? आपला पक्ष

बदलला. म्हणजे लोकशाहीच्या अंतरात्म्याच्या लेखी, गाम्याच्या लेखी, आपली निष्ठा बदलली. हे नव्या युगातील राजकीय धर्मांतरच नव्हे काय ?

हरियाना, उत्तर प्रदेश आणि आता परवा परवाच कोसळलेला मध्यप्रदेश या राजकीय धर्मान्तराचे पौरोहित्य करून गेले. या परधर्मात गेलेल्यांच्या 'शुद्धिकरणा'-चा घोळ घालण्याचे अयशस्वी प्रयत्न कुठे कुठे झालेत. पण सामान्यपणे परधर्मात गेला की गेला, इतकेच नव्हे तर सुखी झाला असाच प्रकार आढळून आला. हरियानातील अहंमन्य मुख्यमंत्री भागवत दयाल शर्मा यांचेविरुद्ध विरोधी पक्षांत आपल्या काही अनुयायांसह गेलेले राव बीरेंद्र सिंग हे हरियानाचे मुख्यमंत्री झाले. उत्तर प्रदेशातही अशाच प्रकारे राजकीय धर्मान्तर करणारे आणि काँग्रेसला पदच्युत करणारे चरणसिंग मुख्यमंत्री झाले. मध्यप्रदेशातही याच क्रमाची पुनरावृत्ती होऊन तेथेही ३६ काँग्रेसजनांना काँग्रेसबाहेर नेणारे गोविंदनारायण सिंग हेच मुख्यमंत्री झाले.

म्हणजे स्वपक्षात साधे मंत्रीही न झाल्यास पक्षांतर करून स्वपक्षाचे सरकार खाली ओढणारे लोक विरोधकांना जास्त ग्राह्य वाटतात, आणि आपल्या रीतसर निवडलेल्या नेत्याला बाजूला ठेवून ते अशा स्वपक्षद्रोह्याला मुख्यमंत्री करण्यास तयार होतात, हे दृश्य क्षणिक काळ मोठे सुखद वाटत असले तरी स्वपक्षीयांपेक्षा परपक्षद्रोह्याला जास्त मान देण्याची विषारी वृत्तीची वेल आपल्या भारतीय राजकीय जीवनाच्या लोकशाही प्रांगणात आपल्या हातांनी पेरीत आहोत, इकडे सर्व विरोधी पक्षही सहेतुकपणे कानाडोळा करीत आहेत.

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेणे अगत्याचे आहे. अस्तित्वावर सदोदित टांगत्या तलवारीसारख्या लटकणाऱ्या नाजूक बहुमताच्या उद्दाम दण्डेलीला पक्षांतराने सुरुंग लावण्याचा हा उपक्रम अखेरीस या सौर–शकटाला नेऊन सोडणार आहे तरी कुठे, याचा विचार कुणाला शिवेनासा झाला आहे ! पक्षांतराने पदच्युत होणारे पक्ष पक्षांतरांचेच हत्यार वापरून पुन्हा पदारूढ होण्याची स्वप्ने पाहण्यात रंगून आणि गढून गेले आहेत. जे काही झाले, त्याचा वस्तुनिष्ठपणे विचार न करता व्यक्तिनिष्ठपणे आढावा घेण्याची दुहेरी चूक होत आहे. म्हणूनच वर उल्लेखिलेल्या तीन ताज्या प्रांतांतच नव्हे, तर सार्वत्रिक निवडणुकीत गमावलेल्या सातही राज्यांतदेखील पक्षांतराच्या या पिण्डाला अपसव्याने-डाव्या अंगठ्याने-पाणी देण्याचा खटाटोप चालू असल्याचे आपल्याला आढळते आहे.

मध्यप्रदेशातील सत्ताच्युत मुख्यमंत्री द्वारकाप्रसाद मिश्रा हे त्यातल्या त्यात जास्त राजकीय उन्हाळे-पावसाळे पाहिलेले आणि जास्त वस्ताद. त्यांनी चक्कच फेरनिवडणुकीची धमकी दिली. आणि त्या धमकीविरुद्ध सर्वांआधी आवाज जर कुणी उठवला असेल, तर तो मिश्रांच्या कट्टर विरोधक राजमाता विजयाराजे शिन्दे यांनी नव्हे, तर उत्तर प्रदेशात तेच भाग्य वाट्याला आलेल्या काँग्रेसच्या चंद्रभानु गुप्त

यांनी. का तर म्हणे, उ. प्र. त ते स्वतः हेच पक्षांतराचे हत्यार चरणसिंगांविरुद्ध वापरायला तयार झाले होते आणि त्यात ते यशस्वी झाल्यास हातातोंडाशी आलेला सत्तेचा प्याला फेरनिवडणुकीच्या या योजनेमुळे कायमचा हिरावला जाण्याची शक्यता होती. गुप्ता यांच्या या विचारांची तळी दिल्लीतील अनेक प्रांतीय काँग्रेस खासदारांनीही हातोहात उचलली. अखेर मारे शूराचा आव आणून मुदतपूर्व निवडणुका हा पक्षांतरावर फारच परिणामकारक तोडगा ठरेल, असे ठासून, सांमणाऱ्या पंतप्रधानांनी माघार घेतली आणि मध्यप्रदेशात इतर पक्षांचे संमिश्र सरकार अधिकारावर आले. म्हणजे वस्तुनिष्ठ विचार राहिला कुठे ?

## पुन्हा एकदा महाभारत

काँग्रेस सरकार पाडायचे आणि आपले मजबूत करण्यासाठी त्या पक्षातील लोक फोडायचे, हा नवा बाटगेगिरीचाच प्रकार नाही काय ? पुन्हा काँग्रेसनेही तोच प्रयोग करून परत अधिकारावर येण्याची आणि विरोधकांची सरकारे पाडायची खटपट चालू ठेवायची, या पक्षहितावरच केंद्रित झालेल्या राजकीय दुष्ट चक्रव्यूहाचा भेद कुणी करायचा ? लोकप्रतिनिधी " विक्रीस तयार आहेत " अशा पाट्या लावून आपल्या राजकीय निष्ठांचा बाजार मांडणाऱ्या या पक्षोपपक्षांना ह्या बाबतीत लोकांना काय वाटत असेल याची थोडी तरी आठवण येत असेल का ? आली तरी ती बोचत असेल का ? लोकशाहीच्या सौर–शकटाची विशाल चाके म्हणून ज्यांना प्रगतिमान अश्वराजांवर आरूढ केले, तीच ही मंडळी अशा प्रकारे बेताल आणि बेचाल झालेली पाहून तो ' जनार्दन ' मनात काय म्हणत असेल ? ' सामर्थ्य आहे चळवळीचे ' हे खरे; परंतु तेथे या जनार्दनाचे अधिष्ठान असायलाच हवे ना? त्या जनार्दनाने या जनांना त्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी विधिमंडळात धाडले, खुर्चीपाठी लागून लोकांकडे पाठ फिरवण्याकरता खासच नव्हे. त्या लोकांचे अधिष्ठान घालवल्यावर या जनांनी कोणतीही चळवळ केली तरी तिला तसा कोणता मोठा अर्थ राहणार ?

लोकशाहीची याहून जास्त विटंबना ती कोणती असू शकेल की, लोकांनी लोकांसाठी लोकांच्या कायदेमंळावर निवडून दिलेली माणसे लोकमताची बूज, भीती, किंवा वचक न राखता खुशाल राजकीय धर्मान्तर करताहेत. अशा प्रकारे लोकप्रतिनिधींच्या खरेदी–विक्रीनेच जर सरकारे आपटायची वा उपटायची असतील तर मग निवडणुकांचा, लोकमताचा आणि लोकशाहीचा हा तमाशा व्यर्थच नाही का होत ? यात जास्त काळजी करण्यासारखा विषय आहे तो निव्वळ लोकशाहीचा नसून, या लोकांना हव्या असलेल्या ' शाहीत 'देखील याच पायवाटेची वहिवाट पडण्याच्या धोक्याचा आहे. कारण यथा राजा तथा प्रजा. लोकशाही राज्यव्यवस्था ही सांसदीय व्यवस्था आहे, आणि सांसदीय लोकशाही ही केव्हाही पक्षनिष्ठच असणार ! तेव्हा पक्षनिष्ठ लोकशाहीचा आत्मा पक्षनिष्ठा हा आहे आणि ती पक्षनिष्ठा अशी स्वार्थ

निष्ठ आणि सवंग झाली तर, ' पाचा मुखी परमेश्वर ' या न्यायाने पाच पांडवांसमोर द्रौपदीची झाली तशी विटंबना आमच्या लोकनेत्यांसमोर लोकशाहीची होईल, हा खरा काळजीचा विषय आहे. अशा वेळी या लोकशाहीची रुजुवात करणारा काँग्रेस पक्षाच्या भीष्माचार्य, कृपाचार्य आणि द्रोणाचार्यांनी निव्वळ खाली माना घालून बसल्याने काही साधणारच असेल तर या देशात पुन्हा एकदा ' महाभारत ' होईल.

म्हणून म्हणतो लोकशाहीचा हा सौर-शकट भरकटतो आहे. त्याचे अश्वराज उधळत आहेत. रस्त्याचे भान नाही, लगामाचे ज्ञान नाही, कर्तव्याची जाण नाही, ध्येयाची आण नाही, अशा अवस्थेत हा महारथ उधळतो आहे आणि उधळते आहे त्याच्याबरोबर हातावरचेही दिसणार नाही इतके आंधळे करून टाकणारी धूळ ! !

काँग्रेसचे चुकले असेल, आहेही.. पण तिचा पदर सोडून दुसऱ्याचे बोट धरणारे तरी कुठे धुतल्या तांदळासारखे आहेत ? हरियानाचीच गोष्ट पाहा. शर्मांशी जमले नाही म्हणून राव बीरेन्द्र सिंग यांनी काँग्रेसला रामराम ठोकला. मुख्यमंत्रिपदाची हाव त्यांच्या पाठीशी नव्हती असे तेही म्हणू शकणार नाहीत. मला मुख्यमंत्री व्हायचे आहे, मग काँग्रेस मला मुख्यमंत्री करीत नसेल तर जो कोणी करील त्याच्याबरोबर जायला मला दिक्कत वाटणार नाही, हीच यामागील नीतिमत्ता. आणि अशाप्रकारे माणसे सत्तारूढ काँग्रेस सोडून बाहेर आली की त्याचे मग संयुक्त दल व्हायचे आणि राजकीय धर्मान्तर करणारा त्याचा नेता आणि मुख्यमंत्री व्हायचा हा यातील शिष्टाचार. अशा तऱ्हेने जी माणसे बाहेर येतात, आणि मुख्यमंत्रीही बनतात, ती संयुक्त दलाला कोणता आदर्श देऊ शकणार ? हरियानात आज दलाचे सरकार टिकवण्यासाठीं ५४ आमदारांपैकी १९ मंत्री करण्यात आले आहेत. म्हणजे दलाचा दर तिसरा आमदार हा मंत्री आहे. हेही खुर्च्या वाटून सिंहासन टिकवणेच नाही का ? काँग्रेस हेच करत होती. काँग्रेसचे मिश्रा मंत्रिमंडळ कोसळू नये म्हणून मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या विसावरून तिसावर नेण्याची परवानगी सहाच दिवस आधी केंद्रीय काँग्रेस पार्लमेंटरी बोर्डाने मिश्रांना दिली होती. म्हणजे आणखी दहा खुर्च्या वाटायला तयार करण्यात आल्या होत्या. या काँग्रेसला धडा शिकवण्यासाठी तिची सत्ता कोसळविल्यानंतर विरोधकही तेच, किंबहुना त्याचा सुरात त्याहून जास्त करणार असतील, करीत असतील तर मग बाटल्या बदलून तेच रसायन लोकांपुढे येत नाही काय ? प्रश्न असतो रसायन बदलण्याचा. बाटली कितीही चांगली झाली म्हणून काही कुणी बाटली पीत नसतो. तीच गत पंजाबची. तेथे सुमारे ७४ आमदारांत २३ मंत्री केले आहेत. मध्यप्रदेशात संयुक्त विधायक दलाच्या १६५ आमदारांपैकी ३५ मंत्री झाले आहेत. त्यातही फुटलेल्या ३६ पैकी निम्म्याहून जास्त मंत्री झाले आहेत. म्हणजे मंत्रिपदाच्या या मुखलेपानेच काँग्रेसेतर पक्षांचा दुतर्फी मृदंग मधुर ध्वनी करू म्हणतो आहे. हरियानात काँग्रेस सोडून विरोधी दलाच्या सरकारात शिक्षणमंत्री झालेल्या एका कार्यकर्त्याने आधी राजीनामा-

दिला आणि फेरनिवडणूक आपल्याविरुद्ध लढण्याचे आव्हान माजी मुख्यमंत्र्यालाच दिले. हे उदाहरण फारच उत्तम ! या इसमाने ती निवडणूक जिंकून दाखवली हे त्याहून उत्तम ! पण या सर्व चांगल्या कार्यावर मंत्रिपदांची खैरात वाटून राव बीरेन्द्र सिंग यांनी पोतेऱ्याचा बोळा फिरवून टाकला त्याचे काय ?

आपल्या लोकांवरील या जाज्वल्य निष्ठेचे प्रत्यंतर मध्यप्रदेशातील काँग्रेस सोडून गेलेल्या चौतीस आमदारांनी का दाखवू नये ? अन्यथा ही लोकशाही नसून लोकशाहीची भातुकली ठरेल. भातुकलीच्या खेळात घटकेत कुटुंबप्रमुख तर दुसऱ्याच क्षणी नोकराची भूमिका बजावताना, पोरे आनंदाने आपल्याच मस्तीत मस्त असतात. तितक्याच सहजपणे भूमिका बदलण्याने लोकशाहीची भातुकली होईल, आणि लोकांच्या विवेकाशी मात्र तो जीवघेणा खेळ ठरेल. कारण, आज विरोधकांच्या हाती आलेल्या सरकारांतही आपल्याला जे काही दिसते आहे, ते तपशील वजा जाता, सरकारांत राहून आपापल्या पक्षाचे सामर्थ्य वाढण्याच्या प्रयत्नाखेरीज दुसरे काहीही नाही. बंगालात डावे कम्युनिस्ट वरचढ आहेत ते आता डोईजड होण्याचा प्रयत्न करीत आहेत. बिहारमध्ये सिंहाचा वाटा व त्याचे श्रेयही संयुक्त समाजवादी पक्षाला हवे आहे. उत्तर प्रदेशात जनसंघ आपल्या भूमिकेशी थोडीही तडजोड करायला तयार नाही. पंजाबात संयुक्त आघाडीपुढे चैतन्यशील कार्यक्रम नाही आणि तेथे कम्युनिस्ट आपले घोडे पुढे नेण्याचा प्रयत्न करीत आहेत. जनसंघ चंदीगडबाबत पंजाबात एक, हरियानात दुसरे आणि खुद्द चंदीगडमध्ये तिसरेच बोलतो आहे.

हे सर्व सौर-शकटाच्या चाकाचाकांतील तेल संपल्याचे, घर्षण वाढल्याचे लक्षण आहे. एकदा आम्हा काही पत्रकारांच्या आपसात गोष्टी चालल्या होत्या. मी म्हटले, " समजा, संयुक्त दलांचा हा घोळ घालण्याच्या भरीसच विरोधक पडले नसते, तर काय झाले असते? राष्ट्रपतींचीच राजवट अनेक राज्यांत आली असती ना ? काय बिघडले असते ? आजच्यासारखी अशी परवड तरी नसती झाली. "

माझ्या मित्रांनीही याला मान डोलावली. फक्त एकजण म्हणाला, " मग ती लोकशाही प्रक्रिया राहिली नसती."

"ती कशी काय ? कोणतेच दल सरकार बनविण्यास असमर्थ आहे असा त्या त्या राज्यपालाला राष्ट्रपतींना कळवायचा लोकशाही हक्कच नाही का ?"

" आहे तर. परंतु बाबा रे, काँग्रेसनेच आधी संमिश्र सरकारे तिला सोयीची वाटली तेव्हा राबवली आहेत. आता ती इतर पक्षांनी राबवली एवढाच फरक झाला आहे."

अर्थात् आमची ही चर्चा निवडणुकांतून काय बाहेर पडले त्यावर आधारित होती. पक्षान्तर आणि राजकीय धर्मान्तरावर नव्हे. परंतु याही बाबतीत पुढाकार घेतला तो काँग्रेसनेच. टी. प्रकाशम् यांना काँग्रेसमध्ये आणण्यासाठी काय काय प्रयत्न

झाले, आज काँग्रेसमध्ये दिसणारी अशोक मेहता, पट्टम थाणू पिल्ले, आनंदराव चव्हाण, रघुनाथराव खाडिलकर, तुळशीदास जाधव, मोहिते, ही सर्व मंडळी पहिल्यांदा कुठे होती? काँग्रेसमध्ये कशी आली, का आली? आणि आता कुठवर चढली आहेत? मध्यप्रदेशात १९६३ साली अधिकारावर येताना मिश्रांनी ३९ काँग्रेसेतर आमदारांनाच काँग्रेसमध्ये ओढले ना? १९६७ मध्ये राजस्थानात सुखाडियांनी काय केले? इतकेच कशाला आता अगदी परवा म्हणजे जुलैच्या दुसऱ्या पंधरवड्यात स्वतंत्र पक्षाच्या एका खासदाराला काँग्रेसने आपल्यात घेतलेच ना? आणि जुलैतच दिल्लीत भरलेल्या अ. भा. काँग्रेस कार्यकारिणीने बाहेरच्यांना काँग्रेसमध्ये येण्याचे मुक्तद्वार, अगदी ठराव करून दिलेच ना? मग राजकीय घटनाचक्राला या अनिष्ट दिशेने वळण देण्याची सुरुवात जर काँग्रेसनेच केली तर आता या घटनाचक्राचे एक आवर्तन पूर्ण होईपर्यंत ओरड करण्याचे नैतिक कारण तिला कसे काय सापडते?

पण मग "या चक्राचे एक आवर्तन पूर्ण होऊ द्या, मग राजकीय आचारसंहिता करण्याची भाषा बोला," असे स्वतंत्र पक्षाचे प्रो. रंगा म्हणताहेत त्यात तरी दुराचाराचा फायदा एकट्या काँग्रेसलाच का म्हणून, आम्हांलाही तो का नको, असल्या युक्तिवादातून डोकावणाऱ्या प्रच्छन्न स्वार्थापलीकडे काय आहे? आणि १९६१ साली, 'महाराष्ट्राच्या राजकीय निष्ठा झपाट्याने बदलत असल्याचा' साक्षात्कार झाल्यागत भाटघर सम्मेलनात बोलणारे आजचे गृहमंत्री यशवंतराव चव्हाण, भारतातील राजकीय निष्ठाही तितक्याच झपाट्याने बदलत असल्याचे प्रत्यंतर या निवडणुकीत आल्यानंतरही, "आपल्यातून बाहेर गेलेल्यांना परत आपल्यात आणण्याचा प्रयत्न करण्यात वाईट ते काय आहे, असा जो मोठा सोवळचा भोळेपणाचा प्रश्न लोकसभेत विचारतात, त्यातही विशुद्ध राजकीय लाभाखेरीज दुसरे काय दडलेले आहे?

ही जी सगळी धूळ उडते आहे, ती लोकमताचा पाठिंबा मिळवून राज्यांच्या वा केंद्राच्या विधिमंडळात पोचलेल्यांनी पक्षांतर केले त्यावरून उडाली आहे. या देशाचे भाग्य घडविण्यासाठी सरकारी राज्यसत्तेचा दंड ज्यांच्या हाती आला, त्यांनी इमान राखले नाही म्हणून हा ओरडा होतो आहे. एरवी कोणी या पक्षातून त्या पक्षात गेला तर त्याची दखलही कोणी घेता ना, हा धुरळा खाली बसायला हवा असेल, कितीही वेगाने लोकशाहीचा महारथ धावला तरी धूळ म्हणून उडणार नाही इतका त्याचा रस्ता पक्का, स्वच्छ आणि सिमेंटचा व्हायला हवा असेल, तर जनार्दनाचे अधिष्ठान जनमानसात पक्के करायला हवे आहे. लोकांबाबत इतका आदर, त्यांचा स्वयंस्फूर्त वचक लोकप्रतिनिधींच्या हाडीमांसी खिळायला हवा आहे. तरच खरी लोकशाही नांदेल. अन्यथा, लोकशाहीच्या फाफटपसाऱ्यात स्वार्थसिद्धीचा खलपुरुष हवा तसा नाचतच राहील.

यासाठी लोकांनीही जागरूक असायला हवेच आहे. आपण अमुक एका पक्षाच्या

विचारसरणीच्या पाठीशी उभे राहून निवडून दिलेला प्रतिनिधी जर आपल्याला न विचारता पक्षांतर करीत असेल, तर त्याला धर्मांतर केलेल्यांप्रमाणे सामाजिक वाळीत टाकण्याचे, त्याच्या आचरणाचा समाजपुरुषाच्या आधुनिक न्यायासनासमोर त्याला जाब द्यायला लावायचे, आणि पुन्हा लोकांच्या चरणाशी वाकायला लावून निवडणुका लढवायला भाग पाडण्याचे दायित्व कठोर कर्तव्य म्हणून लोकांनी पार पाडले पाहिजे. मग पक्ष बदलण्याचे धाडस कुणाला करवायचे नाही. आणि यासाठी लोकशाहीच्या सच्चा उपासकांनी लोकनीतिचे नियम ठरवून द्यायला हवे आहेत. सरकारनेही या प्रयत्नांत लोकांच्या भावनेच्या पाठीशी दण्डसत्ता उभी करायला हवी आहे. आपले राज्य गेले तरी बेहत्तर; परंतु लोकशाहीच्या परमपवित्र निष्ठांशी इमान सोडणार नाही हे कायद्याने, आणि त्याहूनही जास्त स्वतःच्या उदाहरणाने ठिकठिकाणी सत्तेवर असलेल्या पक्षांनी लोकमानसात रुजवायला हवे आहे. दण्डापेक्षा दण्डकांना, नियमांपेक्षा नीतिमूल्यांना, आणि प्रशासनापेक्षा प्रघातांना पावित्र्य आणून देऊनच हे कार्य, हे उद्दिष्ट, प्रभावीपणे साध्य करता येईल. स्वार्थाकरता नियमांचे अन्वयार्थ सोईस्करपणे बदलता येतील; पण नीतिमूल्ये अशी सहजी बदलू शकणार नाहीत. हा लोकशाहीचा धर्म आहे. 'धारणाद्धर्ममित्याहु धर्मो धारयते प्रजा' या न्यायाने समाजाची ही धारणाच घडवली पाहिजे. लोकमानसाच्या कोंदणात व्यवस्थित जडवली पाहिजे, म्हणजे समाजधर्म आपोआप योग्य वळण घेईल.

इंग्लंडमधील संसदेचे काही खासदार भारतात आले होते. त्यांना मी हा प्रश्न विचारला होता—"आमच्याकडे लोक उठल्यासुटल्या पक्ष बदलतात. तुमच्याकडे असे का होत नाही?" त्यांच्या नेत्याने दिलेले उत्तर मोठे मार्मिक होते—"आमच्याकड पर्यायी सरकार बनवू शकेल असा समर्थ पक्ष तयार आहे. त्यामुळे सरकारपक्षाचे काही चुकल्यास, सरकार बदलते. लोक पक्ष बदलत नाहीत. तुमच्याकडे तसा पर्यायी पक्ष नाही म्हणून लोक पक्ष बदलतात." माझ्या डोळ्यांसमोर तशा अंधारातही फक्त एकच पक्ष उभा राहिला, जो कधीकाळी आपल्या स्वतःच्या हिंमतीवर पर्यायी सरकार बनवू शकण्याचे सामर्थ्य साचवतो आहे, तो पक्ष आहे भारतीय जनसंघ. या पक्षाची माणसे निदान स्वार्थाकरिता पक्ष बदलण्याबद्दल कुप्रसिद्ध नाहीत. सिद्धांताकरता सरकार मोडू, लोकभावनेचा आदर करण्यासाठी ज्यांना आजवर देशद्रोही मानले त्यांच्याबरोबर सरकारातही बसू; परंतु तसे करताना सिद्धांताशी, लोकनिष्ठेशी बेईमान होणार नाही, अशा बाण्याने आतापर्यंत हा पक्ष आकाराला येतो आहे.

परंतु सर्वत्र पर्यायी पक्ष म्हणून मान्यता पावण्याइतका समर्थ तो झालेला नाही. दुसरा कोणताच पक्ष त्या दृष्टीने तयार नाही. आणि तरीही लोकांना काँग्रेसला सिंहासनावरून खाली ओढण्याची घाई झाली आहे. म्हणून काँग्रेस गेली, परंतु तिची जागा घ्यायला सुसंबद्ध असे निश्चित धोरण असलेला पक्ष पुढे आलेला नाही, अशी

स्थिती उत्पन्न झाली. आज लोकशाहीचा सौर-शकट जी अवास्तव धूळ उधळतो आहे, ती यामुळेच ! लोकशाहीच्या महारथाने घेतलेल्या वळणावर तशीच धूळ जास्त आहे. यांतून मार्ग काढायला दोन साधने हवीत. घोडदौडीचा रस्ता दुरुस्त करीत महारथाची चाके सांधणारे आस मजबूत करणे हे एक आणि ही धूळ शिरल्याने दृष्टी कोंदणार नाही, अशी दक्षता घेणारा शाश्वत पक्षनिष्ठेचा सुशीतल चष्मा डोळ्यांवर ठेवणे हे दुसरे.

बाकीची काळजी घ्यायला पन्नास कोटी किरणांचा जनभास्कर समर्थ आहे. केंद्रस्थानी बसलेला सारथी अरुण मग या जनभास्कराच्या इच्छेनुसार शकट हाकील. ○

[ मुक्ताफळे : पान ११ वरून चालू ]

पाहिजे ! ब्रह्मचाऱ्यांचा तर या नोकऱ्यांत शिरकावच त्यामुळे होऊ शकत नव्हता. परंतु पेकिंग येथील आपल्या वकिलातीला रेडगार्डस्नी जो गराडा दिला व आपण चिडून दिल्लीत एका चिन्याचे नाकोटे फोडले त्या प्रकरणामुळे पेकिंग येथील वकिलातीत यापुढे फक्त ब्रह्मचाऱ्यांना व विधुरांना नेमण्याचा विचार परराष्ट्रखाते तूर्त करीत आहे, अशी माहिती परराष्ट्रमंत्री स्वर्णसिंगांचे उपमंत्री सुरेंद्रपालसिंग यांनी लोकसभेत सांगितली ! चिन्यांनो, तुम्ही आमच्या वकिलातीतील लोकांच्या बायका-मुलांना त्रास देता काय ? आता आम्ही ब्रह्मचारीच पाठवू–विधुर पाठवू–– मग काय कराल ? हे जे कुणी नवे सिंग आहेत ना त्यांचे या नव्या पवित्र्याबद्दल आपण कौतुक केले पाहिजे. चिन्यांना वाटले भारत सरकार वकिलात बंद करील. परंतु भारत सरकारने चिन्यांना पेचात टाकले आहे. भारत सरकारने ठरवले आहे– पेकिंगमधील वकिलातीतील स्त्रियांच्या बांगड्यांचा आवाज, मुलांचे खेळणे आम्ही बंद करू. पण वकिलात चालू ठेवूच ठेवू. खिडकीही कशी बंद करायची ? वकिलातीतील नोकरवर्गाच्या बायकांनीच जर नवऱ्यांना सांगितले––

" राया, मल्ला, खिडकीत नेऊ नका ! " तर ते तरी बिचारे पेकिंगला कसे जाणार?

ब्रह्मचारी हा लेचापेचा नसतो हे चिन्यांना एकदा कळू द्या ! मारुतिराय, भीष्म यांची तैलचित्रे एकदा वकिलातीत लावली की काय बिशाद रेडगार्ड वाटेला जातील ! पेकिंगच जाळून टाकण्याची भीष्मप्रतिज्ञा एखाद्या हनुमानाने केली तर काय घ्या ?

आम्हांला भीती फक्त एकच वाटते की पेकिंगच्या भारतीय-वकिलातीत ब्रह्मचारी व विधुरांचा तळ पडला आहे हे कळताच चिनी स्त्री–रेडगार्डांनीच वेढा घातला तर मात्र काही सांगता येत नाही ! 'हिंदी-चिनी-बाई-बाई' हे लफडे सुरू झाले तर पेकिंगची वकिलात म्हणजे एक मॅरेज ब्युरोच होईल ! ! पाटील–टुंगटांग विवाह, जोशी–लिओशीची विवाह, राय–कुशीलाय विवाह अशा पत्रिका भारतात येऊ लागतील.

अर्थात अशी हळद लागली तरी चिन्यांहून पिवळे होईल. अशी अगदी हद्द झालीच तर सरहद्द कुठली ?

सरदारजी, तुम्ही ब्रह्मचारी आहात काहो ? **ग्यानबा**

*तुझ्या हळव्या स्वभावाचीच भुरळ वाटायची मला. आपले संबंध इतके एकपदरी होते की, ते सुटे करताच याचचे नाहीत. लग्न करण्यापूर्वी तू भेटला असतास तरी......*



खिडकीच्या दुध्या काचेतून आत येणारा उजेडाचा धुरकट पट्टा दिनकरला दिसतो. पडल्या पडल्या किलकिल्या नजरेनं तो थोडा वेळ बघतो अन् डोळे मिटून पडून राहतो...

अर्धवट जागृती, अर्धी सुषुप्ती, थोडी अंधारी धुंदी, थोडी प्रकाशाची जाणीव. हळूहळू विरळ होत जाणारा सुन्न काळोख. मुरत मुरत विरणारी साखरझोप. चिमुकल्या मऊशार पिसांचं गरगरतं घुसळणं. खोल-खोल भिरभिरत जाणारी, निळी-जांभळी, लाल-शेंदरी वेगवान् वर्तुळं...झोपेच्या संथ डोहात सरपटत येऊन पडलेला जाणिवेचा खडा. गहिऱ्या गुंगीचा थरकता शेवाळी तवंग. सातत्यशील, लयबद्ध, मुलायम वलयं ...... तरारत्या, टपोऱ्या, नाजूक स्पर्शकळ्या...

गंमत वाटते आहे. मन मोकळं, हलकं झालं आहे. कमालीचं तरलहळवं वाटतं आहे. हल्ली पुष्कळ

दिवसांत असं अमाप सुख वाट्याला आलं नाही. असा निश्चिंतपणा अनुभवायला मिळाला नाही. हा उजाडता दिवस शांत-निवांतपणाचे रुणझुणते वेध लावणारी ही झुंजुमुंजू वेळ—अलगद उलगडत जाणाऱ्या रेशमी वस्त्राच्या जरतारी घडीसारखी ! हलके हलके विस्तारणाऱ्या, झगमगत्या मखमली पडद्याच्या कमानदार महिरपी-सारखी ! कधीतरी, क्वचित लाभतील असे हे सुखद—सोत्कंठ क्षण...

—कुणाचं हे भाग्य ? कुणाचं हे श्रेय ?

—आपलं ? अलकाचं ? की गंधा देसाईचं ?...

दिनकर उठून बसतो. त्याच्या अंगावर विसावलेला अलकाचा हात गादीवर आपटतो. तिच्या नाजुक बोटांचं तो अलगद चुंबन घेतो अन् हात हळू दुमडून तिच्या छातीवर ठेवतो. अलका ' ऊहूं ' करते. मान हलवते. तिचं गोरेपण झळकतं. समाधानानं ती झोपी गेली आहे—असं काही केलं की तोंडाचा चंबू करून, ' शूः ' म्हणून

# विसावलेल्या मळलेल्या वाटा

## शरद काळे

दटावण्याची तिची सवय आहे. रात्री हिनं असंच केलं होतं. समंजस आहे विचारी. सोशिक आहे. सुंदर आहे. उठून दिसण्याइतकं नेटकं लवलवीत लावण्य तिला लाभलं आहे. हा रेखीव गोरा हात—

—एरवी तिला जवळ ओढल्यावाचून राहवलं नसतं. अलकेच्या चिंतनात, धुंद अनुनयात रंगून जाण्यात गोडी वाटली असती अशा गंमतीदार वेळी तिचा हात दूर करण्याइतका, तिच्या स्पर्शाच्या मोरपिशी जादूनं पुलकित न होण्याइतका अरसिक-पणा कुणाला शोभेल ?

पण आज कधी नव्हे ते असं हळवेपण लाभलं आहे. मन हलकं-फुलकं बनलं आहे. वेगळीच जाणीव झाली आहे. साऱ्या चिंता मिटल्या आहेत. समस्या सुटल्या आहेत. पेच फिटले आहेत. ही कसली किमया आहे ?

—दिनकर पलंगावरून दूर होतो. खिडकीचं झडप उघडतो—जवळच्या घरांची एकमेकांना लगटलेली छप्परं, स्लॅब्स्, धूरनळ्या दिसू लागल्या आहेत. दूरवर धुक्याचे

पर्वत दाटले आहेत. गार झुळका सुटल्या आहेत. हुवीहुवीशी शिरशिरी अंगी भरते आहे.

वाऱ्याचे झोत मग झरझर आत येऊ लागतात. खिडकीच्या बंद तावदानाची काच खडखडते. जवळचा रुपेरी गज बर्फगार वाटतो. शीतल झोत फणफणत राहतात. एखाद्या वेगवान् वाहनातून जात असावं—

—'जात असावं' असं तरी का म्हणायचं? काल आपण असेच गंधा देसाईच्या गाडीत बसलो नव्हतो काय? असंच थरथरतं निळसर तावदान, हवेचे फणकारे, अलगद जाणारी 'अ‍ॅम्बॅसेडर', तिचं तरंगल्यासारखं घसरणं...ऑफिसच्या दिवस-भराच्या रुक्ष कामामुळं आलेला शीण दूरदूर जात असलेला. शेजारी गंधा बसलेली. एकदम अबोल झालेली. विचारांत गढून गेलेली. चेहऱ्यावर—तिच्याही अन् आपल्याही-अबोध आश्चर्याची लाट उसळलेली...

—हीच का ती गंधा? रस्त्यावर जिनं एकाएकी गाडी थांबविली. 'दिना—दिना' म्हणून अल्लडपणानं हाका मारल्या. चपळ उडी मारून बाहेर आली. भडाभडा बोलत राहिली—'असतोस तरी कुठं? काही पत्ता? ऑफिस कसं चाललंय्? किती वाळलास रे?' आणि असं कितीतरी. असं उधाण आल्यासारखं वागत असताना आपल्या केसांकडे लागलेली तिची नजर. अगदी अशीच ती पहिल्यानं भेटली तेव्हा बघत राहिली होती. आपला घुमेपणा फुंकरून, पचवून बोलली होती. बोलायला लावीन, अशा ईर्ष्येनं बोलत राहिली होती—तशीच पुढेही बोलत गेली होती. मध्येच भुवई ताणत होती. गालाला लोभस खळी पडत होती. हनुवटी आर्जवी वाटत होती. अन् आपण हां हां म्हणता विरघळत होतो—विरघळत गेलो होतो. दर दिवसागणिक अधिकाधिक संबंधित होत होतो.

—हीच ते बोलली काय? हिच्याच स्नेहाची साय दाटत गेली काय? की आपण वाह्यात वागलो? काय नेमकं मनात होतं? फक्त भावनेची एक उकळी? अविवेकी, अनावर आकर्षण? बेफाम 'फर्स्ट साइट काफ लव्ह?' बेफिकिरी तर झाली नाही? काय नेमकं घडत गेलं? कसे ताण आवळत गेले? ऑफिसात इन्कम-टॅक्सच्या कामासाठी आलेले तिचे वडील. त्या निमित्तानं ती बरोबर आलेली. कामाच्या प्रचंड धबडग्यात झालेली नजरानजर. संभाषण—ओझरता परिचय—त्या वेळीच कोवळं असं काहीतरी अंतर भेदून वर आलं काय? संबंध वाढत गेले तसं तेही वर्धिष्णू बनत गेलं ना?

मग काल तिनं अचानक गाठलं तेव्हा आपण घाबरलो का म्हणून? तसा आता काही संबंध?

विस्मय, भय लपविण्यासाठी मुद्रेवर आपण कसं बेफिकिरीचं कवच ओढून घेतलं होतं, ते दिनकरच्या लक्षात येतं. ते आपल्या गावीही नाही, असं भासवून गंधा कशी बडबडत राहिली होती, ते आठवतं. मनात काहीबाही घुमू लागतं...

—बगलेत लेदरबॅग धरून, पायाला तिढा घालून, कृष्णासारखा तो उभा होता. गंधा गाडीच्या दाराशी रेलली होती—गडद गॉगल लावलेली, अस्मानी साडी नेसलेली, पदराची निळी लहर वाऱ्यानं झेपावत असलेली. तांबूस कानाजवळ नक्षीदार बट थरथरत असलेली—कमालीची आकर्षक, मोहक, मादक...

—छे: आपली चूक होतेय्. गंधा तीच, तशीच असेल; पण आपण बदललोत, पार पालटलोत. असं तिच्याकडं आता बघणं म्हणजे...

दिनकर एकदम चपापला होता.

आणि मग एकाएकी त्याला युक्ती सुचली; बस्स् झालं. यापुढं हे सगळं बंद व्हायला हवं! अलकाच्या ध्यानी आलं नाही तोवर हा धागा—बळकट असला तरी इथंच तोडून, नव्हे गुंडाळून फेकून द्यायला हवा. नकळत त्याचं घुमेपण नाहीसं झालं. चलबिचल थंडावली. तसा तो चित्त्यासारखाच उत्साहित होऊन बोलू लागला. एक प्रकारची बेफिकिरीची जाणीव त्याला झाली. 'गृहस्था, लग्न केलंस ते केलंस; पण त्यासाठी अशी लपवाछपवी का केलीस?' असं निर्भीडपणे तिनं विचारलं असतं तरी तितक्याच बिनदिक्कतपणानं त्याला सडेतोड, रोखठोक जबाब त्यानं दिला असता. इतका तो तयार झाला.

पण गंधा असं पेचात पकडल्यासारखं बोलतच नव्हती. अगदी निष्कपटी मनान चौकशी चालली होती. हसता हसता शब्द फवारत होते. बोलता बोलता मोकळं हसू फुटत होतं. तेव्हा तोही उसन्या हास्यात शब्द भिजवू लागला,—

"फार फरक पडला ग तुझ्यात!"

"बोलायचं भान आलं म्हणायचं शेवटी! पण फरक पडला म्हणजे?—"

नेमकं काय म्हणायचं होतं, ते त्याला कुठं ठाऊक होतं? तो सहज बोलून गेला,

"म्हणजे फार सुधारलीस!"

"सुधारलीस?"

"तर काय!"

ती जोरानं हसली. असं हसली की दिनकरला वाटलं, उगीच आपण बोचक बोललो. तरीही चेहऱ्यावरला बेदरकार भाव त्यानं तसाच ठेवला.

स्वतःला सावरून घेत गंधा म्हणाली, "ते जाऊ दे. तुझं कसं काय चाललंय्. केव्हापासनं विचारतेय्."

"ठीक आहे."

"ते झालंच. पण हे बघ, ही नुसती वरकरणी चौकशी नव्हे हं."

"मग?"

"म्हणजे जागा शोधीत होतास ती मिळाली का?"

"हो!"

"सगळं उरकून गावाकडनं कधी आलास? ऑफिसात येणार होते. पण म्हटलं,

चिडायचास एखादे वेळी."

दिनकरच्या मुवया उंचावल्या–चिडायचास–म्हणे ! आणि सरळ निर्लज्जासारखं 'कधी आलास ?' म्हणून विचारतेय्. मी कधीही येईन, लग्न करीन, संसार थाटीन किंवा तसाच राहीन. तुला भेटेन किंवा भेटणारही नाही. करायचीय काय चौकशी ? माझ्या मनचा मी राजा...

काखेतली बॅग घेऊन तिची चेन त्यानं इकडेतिकडे फिरविली. तिच्यावर टिचकी वाजवीत संत्रस्त मुद्रेनं तो गंधाकडे बघू लागला. जणू बॅग हाती धरणं, हे जितकं त्याच्या इच्छेवर अवलंबून होतं, तितकंच जे घडलं ते त्याच्या अधिकारात–फक्त त्याच्या स्वखुषीनं–घडलं होतं. तुटकपणानं तो म्हणाला, "गावाकडनं ना ? लगेच परतलो. बरं, चलू, मी आता ?"

गॉगल काढून त्याच्याकडे बघत रोखून गंधा म्हणाली, "तर–तर ! असा पळून नको जाऊस रे ! मला ठाऊक आहे. आता घरी वाट बघणारं माणूस आहे तुझं. तुला एवढासादेखील उशीर झाला, तर—"

'नसती बैदा ! किती लोचटपणा हा !' तो मनोमन चरफडला. जे तो टाळू इच्छीत होता, नुसतं सुचवून भागेल असं मानीत होता, ते ती उघड करीत होती. जे नको होतं, ते दत्त म्हणून समोर ठाकू पाहत होतं. काहीच कळत नाहीसं झालं होतं. वास्तविक आपल्या मार्गातून गंधानं आपणहून बाजूला सरायला हवं होतं; ते राहिलं दूर अन् ही लग्नाची बित्तंबातमी काढून छळायला टपली आहे. अशी तिची आपली जवळीक आता पूर्वीच्या स्वरूपात राहणं शक्य तरी आहे का ?

पण कोडं वाटण्यासारखी गोष्ट म्हणजे आपल्यासारख्या साध्याबगड्या माणसाची ओळख जपण्यात गंधाला कोणतं स्वारस्य वाटत होतं ? अजूनही ते का वाटतं ? तिच्याशी परिचय–केवळ परिचय–व्हावा म्हणून झटणारे, तळमळणारे काय कमी असतील ? असं असूनही तिनं आपल्यालाच वाव दिला. नव्हे, आपणहून ती आपल्या आयुष्यात शिरू पाहत होती; इतकं की, आपल्यातलं 'अहो जाहो'चं अंतरदेखील तुटलं. मग अशाच भेटी, तिच्या बंगल्यावर जाणं, कॅफेतलं बोलणं, सिनेमाची संगत...

..खरं म्हणजे जे घडत होतं त्याची निर्णायक परिणती झालीही असती. पण ती प्रत्यक्षात उतरविण्यासारखी परिस्थिती नव्हती–निखालस नव्हती ! तिच्याशी जडला होता तो संबंध पुरेसा होता. 'पुरेसा' म्हणण्यापेक्षा झालं होतं ते फारच झालं होतं, असे म्हणायला हवं. हा सहवास वाढविणं, त्याला गाठ घालणं, ती पक्की करणं, महाकर्मकठीण होतं. अन् ते जमलं असतं तरी पूर्णपणे धोक्याचं होतं. शिवाय तिचं मन कुठं अजून समजलं होतं ? एका धनिकाची ती कन्या. आपण, वरच्या दर्जाचं असलो तरी, शेवटी एक नोकरीत गुरफटलेला, आयुष्याचं यंत्र बनविलेला रुक्ष कारकून ! झेपलं नसतं हे ! व्यवहाराशी साजेलसं झालं नसतं....

गावाकडनं मग वडिलांचं अचानक आलेलं पत्र. मुलगी बघण्याचा विधी, घाई-घाईनं उरकलेलं लग्न, आयुष्यात अकल्पितपणे डोकावलेली अलका...

पण गंधाला आपण आठवणीनं पत्रिका धाडली होती.

पत्रिका !

दिनकरला हसू आलं–ही सबब होती. निव्वळ निमित्त होतं. गंधापासून दूर पळण्याचं, सुटका करून घेण्याचं. मन आवरण्याचं. हे योग्य झालं का ? पूर्वीच तिला हे सगळं पटवून द्यायला नको होतं काय? आता ती म्हणतेय, 'असा पळून नको जाऊस रे!' अन् आपण कधीच तिला हुलकावणी देऊन बसलोत. घरी वाट बघणारं माणूस आहे आपलं. गंधाच्या ते लक्षात आलेलं नाही असं कसं म्हणावं ? तिनंच तर त्याचा उल्लेख केला. पण तुटक बोलूनही, फटकून वागूनही ती बघत नाही आहे. घरी चल म्हणूनदेखील सांगेल. कुणी सांगावं ?

गंधा तेवढ्यात म्हणाली, "किती वेळ असं उभं राहायचं ? तू कंटाळला आहेस."

"ते तर झालंच."

काहीही करून तिला टाळावं म्हणून तो म्हणाला, "शिवाय आज काम इतकं होतं की–"

त्याला वास्तविक म्हणायचं होतं, 'एखाद्याचा असा नाहक वेळ घेणं, हे पाप आहे. अक्षम्य अपराध आहे.'

शेवटी कंटाळून तो म्हणाला, "समोरच्या कॅफेत येणार ? रस्त्यावर असं उभं राहणं बरं नाही. शिवाय आज शनिवार. तेव्हा अखेरच्या कामांमुळं अगदी थकून जायला झालंय्."

"नको. मी एक वेगळंच सुचविणार होते–" तो कदाचित् 'नाही' म्हणेल, पुढे बोलूच न देता निसटू पाहील म्हणून घाईघाईनं अजीजीच्या स्वरात ती विनवू लागली,

"घरीच चल ना आमच्या ! वेळ नाही मोडणार. आधीच खूप म्हणजे खूपच उशीर झालाय् स्वारीला ! पण कॅफेत नाहीतरी वेळ जाईलच. आणि मला ठाऊक आहे–मी आता गेले की लगेच बसची वाट न बघता तू आधी तिथं जाशील. तेवढ्याच वेळात मी तुला घरी पोचवून देईन. मग तर झालं ना ? शिवाय उद्या रविवार आहे ! हो खरं–उद्या रविवार ना ? अय्या !"

तिनं एकदम टाळी मारली. तिचा चेहरा फुलला. काय उत्तर द्यावं, त्याला कळेना. तिनं एकवार टक लावून त्याच्याकडे पाहिलं अन् ती पुन्हा म्हणाली,

"खरंच, तुझा जास्त वेळ नाही घेणार मी. प्लीज—!"

त्याच्याकडे बघत बघतच ती गाडीत शिरली. तो येणार हे जणू तिनं पुरेपूर जाणलं. जड पावलं ओढीत अगतिकासारखा तो गाडीत चढला. ड्रायव्हरला तिनं उत्साहित होऊन सांगितलं, "जल्दी चलो !" झडप जोरानं वाजली. गाडी हलली.

आपण एकदम कैद झालो की काय, दिनकरला कळेना.

वाटेत ती काही बोलत नव्हती. दाराचा दट्ट्या गरगर फिरवून आपल्याकडली काच तिनं एकदा अर्धी वर सरकवली. पुन्हा खाली केली. खिडकीच्या मऊ फटीत ती काच हळूहळू सरकू लागली. तोच खेळ सुरू झाला. दिनकर तिकडे बघत होता. अंग बधिर झाल्यासारखं वाटत होतं. घशाशी एक अवजड गोळा घुटमळत होता गाडी घूम पळत होती. केव्हाच ती बंगल्याच्या पोर्चमध्ये शिरली.

गंधा तरतरीत झाल्यासारखी उठली, अन् पोर्चमधून जवळजवळ पळतच आत शिरली. अशीच नेहमी ती करायची. बोलणं घाईनं, चालणं घाईनं – आपले संबंध जडले ते घाईनं, तुटलेही अगदी अकस्मात्—

तुटले ? छट् ! आता तर आपण इथं आलोय्–

तिच्या मागोमाग तो दिवाणखान्यात पोचला. आता गंधाची मोठी बहीण, आई-वडील, इतर सगळी माणसं जाब विचारायला येतील. एखाद्या कैद्याला पोलिस-इन्स्पेक्टरपुढं जबानीसाठी उभं करावं, तसं होतंय् हे. पण इथं आधी सर्वांना नीटशी कल्पना कुठं आहे ? इन्कमटॅक्स ऑफसमधला कुणी अधिकारी, कारकून. आपल्या वडिलांच्या कामात गंधानं त्यांना मदत करणं, संबंधित व्यक्तींशी परिचय राखणं, वाढवणं हे शेवटी त्या मंडळींना फायदेशीरच नाही काय ! तसं नसतं तर त्यांनी पूर्वीच सावध पाऊल उचललं नसतं काय ?

काहीही असो. कुणीही काही म्हणो–आज डरायचं नाही. या गुहेत शिरून, वाघाशी सरळ सरळ झुंज दिल्याखेरीज गत्यंतर नाही. डरायचं काम नाही. सर्वांच्या साक्षीनं एकदा सोक्षमोक्ष होईल—बरं होईल.

गंधाच्या वडिलांनी कोचावर रेलल्या–रेलल्या वर्तमानपत्रातून आपले सुजल्यासारखे दिसणारे डोळे उचलून दिनकरकडे पाहिलं. जाड चष्म्यातून आपल्या रोखले गेलेले ते डोळे त्याला एखाद्या जज्जाच्या नजरेसारखे अंतराचा ठाव घेणारे वाटले.

—ही माणसं म्हणतील काय आपल्याला ? गंधाला वेड तर लागलं नाही ना ?

गंधानं हळू विचारलंच, " आत चलतोस ना ? "

जणू ही आत गेली म्हणजे आपण गेलंच पाहिजे किंवा आपण अगदी आत ओढलेच जाणार. हिला आज झालंय तरी काय ? की काही कारस्थान रचून हिनं आपल्याला खेचून आणलंय् ?

दिनकरची मती कुंठित होऊन गेली. जो धागा तोडून टाकण्याचा निर्धार त्यानं केला होता, नव्हे, जो आपल्यापुरता त्यानं पटकन् तोडलाही असल्याचं त्याला भासत होतं, तोच इतका पीळदार अन् चिवट निघाला की आयुष्यावर रक्तबंबाळ ओरखडे मात्र त्यामुळं निघाले. अनेक घटनांचे, अनेक गोष्टींचे तणावे प्रबळपणे त्या धाग्याभोवती भरभर वेढले गेले. त्यांची उकल करणं अत्यंत अशक्य होऊन बसलं. शेवटी हे असं हिनं कोंडीत पकडलं.

मनात प्रचंड उलथापालथ होत असताना तो नकळत उलटासुलटा जिना चढून गंधाच्या मागोमाग वर आला होता. माडीवरल्या तिच्या खोलीत जाऊन सरावानं कोचावर बसल्यानंतर जेव्हा हलका धक्का मिळाला, तेव्हा कुठं तो भानावर आला. त्याला तिथं बसवून गंधा केव्हाच खाली गेली होती. फार अस्वस्थ वाटलं म्हणून तो उठला अन् येरझारा घालू लागला.

तिचं लिहिण्या-वाचण्याचं टेबल सुरेख सजवलं होतं. 'लाइफ', 'डायजेस्ट'चे अंक व्यवस्थित ठेवलेले होते. एखाद्यानं पाहिलं असतं तर कुणा प्राध्यापकाची खोली भासली असती. टेबलाशेजारी टाइपराइटर होता. आपल्या वडिलांच्या फर्ममध्ये काम करण्याची तिची हौस होती. घरीही ती आपला वेळ त्यातच काढीत असे. भिंतीला हिरवं प्लॅस्टर होतं. एका खिडकीत सोनेरी, तांबूस मासे निळसर काच-पेटीत अलगद झळाळत होते. विशेष म्हणजे त्यानं तिला प्रेझेंट केलेलं निळं लेटरपॅड जपून ठेवल्यासारखं दिसत होतं. फ्लॉवरपॉट अन् भिंतीवरली प्लॅस्टिकची वेल — तिथलं सगळंच मोठं रुबाबदार अन् देखणं वाटत होतं. तिकडे बघता बघता दिन-करला एक निराळीच गोष्ट जाणवू लागली.

या गोष्टी पूर्वीही आपण पहिल्या आहेत. पण आज असं वाटतंय की आपल्याला जाळ्यात पकडायला रचलेलं हे कारस्थान आहे; ही मयसभा आहे. हे ढोंग आहे. ही नाडणूक आहे. आपला बळी जाणार आहे—गेलाच आहे या मामल्यात! आपला 'उपयोग' या माणसांनी करून घेतलाय! इन्कमटॅक्स! केवळ त्यापासून सुटका मिळावी, जास्तीत जास्त चुकवाचुकवी करून नफा पदरी पडावा हीच एकमेव इच्छा या सर्व गोष्टींच्या मागे नाही काय? साहेबाला खूष ठेवलं की सगळं साधतं, मूठ दाबली की वाटेल ते गुन्हे पचतात — छे:! म्हणजे आपण एक कुत्रा आहोत —तुकड्यासाठी, उष्ट्यासाठी वखवखलेला. शी ऽ! आपल्या हे आधीच कसं लक्षात आलं नाही? गंधा म्हणेल तसं आपण वागलो. ज्या अर्थी तिच्यासारख्या सुंदर, धनवान मुलीचा जीव आपल्यावर जडलाय, त्या अर्थी आपल्या व्यक्तिमत्त्वात दिलखेचक, आक-र्षक असं काहीतरी असावं, अशी समजूत करून घेतली. सुदैवानं आपण तिच्यापासनं दूर गेलो. पण शेवटी तिनं आपल्याला नमविलंच की नाही? आपल्याला वाटत होतं, ती पुन्हा आपल्याकडे मनोमन ओढली जातीय्. जुना जिव्हाळा जपू पाहतेय्. पण तो भास होता. खरी गोष्ट एकच आहे — आपली महत्त्वाच्या जागेवरची नोकरी. ते प्रेम नव्हतं, लोभ नव्हता. अजूनही नाही. हा व्यवहार आहे — सौदा आहे. हे बळजबरीचं, नाहक पडलेलं प्रेशर आहे. हा धूर्त वशिला आहे. ही अप्रत्यक्ष लाच आहे!...

दिनकर भयंकर चिडला. त्याला वाटलं, मोठमोठ्यानं ओरडावं, गंधाला धरून गदगदा हलवावं अन् दातओठ खात हडसून खडसून विचारावं, 'का असा छळ मांड-लायस? पैशानं माणसं विकत घेता काय तुम्ही? भावनेचं मोल, आयुष्याची किंमत

तुम्ही इतकी क्षुद्र समजता ? बोल, जाब दे ! मला जाब विचारायला निघालीय लेकाची ! '

ट्रे घेऊन गंधा आत आली, पेले खडखडल्यामुळं तो दचकला – आज ही स्वत: चहा घेऊन येते आहे. केवढी मायावी अदब ! काही आर्थिक लपवालपवी करायची असेल ! ते काही नाही. आज कशालाच दाद द्यायची नाही. या माणसांचं मिंधेपण झुगारून द्यायचं. भीडमुर्वत न ठेवता स्पष्ट सांगायचं, ' ते शक्य नाही – कदापि नाही.' म्हणजे अशी जिरेल ! ...

" बस ना !. चहा घे. इतके का आपण परके आहोत ? " गंधा आर्जवून म्हणाली.

तो मुकाट्यानं चहा घेऊ लागला.

" आता मुद्दाम इथं का आणलं माहीत आहे ? " गंधानं विचारलं.

त्यानं वरकरणी उत्सुकता पांघरली.

" एक विनंती करायचीय. "

त्याच्या कपाळी नकळत आठ्या चढल्या.

" लग्न झाल्यापासनं तुझी भेट झाली नाही. पण तू आपणहून येण्याचं टाळावं, असं काहीच नव्हतं. मला खूप वाटत होतं, तुझी भेट घडावी, तुझा संसार बघावा, तुझ्या पत्नीशी परिचय व्हावा. तू सुखी झालेला पाहावं म्हणून. पण ते शक्य नाही झालं."

" ते कसं शक्य आहे ? "

तो हे मनोमनच म्हणाला.–पक्का निर्धार करूनही त्याच्या तोंडून शब्द उमटेनात.

गंधा पुढे म्हणाली, " तेव्हा मी म्हणणार होते, एकदा दोघंही या ना आमच्याकडे. ओढून ताणून आणलेला तुटकपणा कमी होईल. नवा परिचय होईल. उद्याला रविवार आहे. उद्याच या की ! "

" पण – "

"तू काय म्हणणार आहेस ते मी जाणते; पण मग इतक्यात सवड नाही व्हायची. निवांतपणा मिळायचा नाही. आत्ताच हे जमू शकेल. कारण..."

थोडं थांबून ती म्हणाली, " कारण, नुकतंच माझं लग्न ठरलंय रे ! "

त्याला त्याही स्थितीत धक्का बसला. तिच्या स्वभावातली गुंतागुंत त्याला सुटी करता येईना. हीच गंधा आपल्यावर जीव जडवून राहिली होती ना ? की हा सूड आहे ? घडलेलं गृहीत धरून ठकास ठक होण्याची ही नीती तर नाही ना ? मुद्दाम घरी आणण्याचा हाच केवळ हेतू असेल तर तो ठीकच आहे म्हणायला हवं ! तसंच होऊ दे. सगळ्याच भानगडीला पूर्णविराम मिळाला तर तो इथं कुणा लेकाला नको आहे ! ...

उत्सुक मुद्रा करून त्यानं विचारलं,

" असं ? वा: ! वा: ! कॉंग्रॅट्स ! काय करतात तुझे मिस्टर ?"

" ते सगळं नंतर सांगेन. पण माझ्या विनंतीचं काय ? माझ्या लग्नापेक्षाही हे जास्त महत्त्वाचं वाटतं मला. येशील ना ? पत्नीसह ?"

स्पष्ट नकार द्यायचं धाडस त्याच्यानं झालं नाही.

तिनं खुलासा केला,—" तुला हे विचित्र वाटेल थोडंसं. पण दिना, कसलीही वावगी भावना माझ्या मनात नाही, हे मुद्दाम सांगते. तुला कदाचित्—किंवा निश्चित-देखील—असं वाटलं असेल—की गंधा असं वागतेय त्यामागं तिचा शुद्ध हेतू नाही. आपल्याला ती बनवतेय. स्वार्थी दृष्टीनं आपल्या हळव्या, भाबड्या स्वभावाचा फायदा उठवतेय—पण तसं काही काही माझ्या मनात कधी नव्हतं अन् नाही. खरं सांगू ? तुझ्या या हळव्या स्वभावाचीच भुरळ वाटायची मला. अन् खरंच, आपले संबंध इतके निकटचे, न् एकपदरी होते की तुझे वेगळे, माझे वेगळे इतके सुटे करताच येणार नाहीत. एक प्रांजळ, प्रामाणिक अन् लोभस मित्र म्हणून मी तुझ्याकड पाहत होते. पैशाचा उपयोग करून तुला फितवावं असं कधीच मला वाटलं नाही. यासाठीच लग्न करण्यापूर्वी तू नुसतं भेटला असतास तरी फार बरं झालं असतं. मी सगळं तुला समजावून सांगणार होते. दिना, दुर्दैवानं या श्रीमंतीचा असा उलट अर्थ लावला जातो. तुला तोच बोचक वाटला, हे मी जाणते. पण मी वागले ती अगदी खुल्या मनानं-अन् मी मुळीच आडकाठी केली नसती-निश्चितच! ते जाऊदे. मला सांगायचंय् एवढंच की, मला तू तसा भिऊ नकोस. काहीएक कारण आता उरलेलं नाही— निदान आता तरी ! याचा अर्थ आपण आपली ओळख पुसून टाकायची असा नाही ! वरवर आपण तसं करूही. पण मनोमन आपण जळत राहू, तळमळत राहू. हे दु:ख, हे शल्य कधीही विसरता यायचं नाही, दिना ! कुणीही अशा व्यथा विसरू शकत नाही. तसं भासलं तरी ते खरं नसतं. पटतंय् हे ?"

तिला एकदम थकल्यासारखं वाटलं.

सिगरेट शिलगावून तो विचारमग्न झाला होता— चांदण्यात चालताना समोर एखादं पांढुरकं भूत नाचतंय्, असं भासावं अन् भीत भीत जवळ जावं तो सुगंधानं आसमंत भारणारी रातराणीची ती वेल आहे, हे ध्यानी यावं, तशी त्याची स्थिती झाली होती. हळूहळू एकेक गोष्ट त्याच्या ध्यानी येऊ लागली—

—एकूण यासाठी हा सारा खटाटोप होता तर ! गंधा देसाईच्या जवळ येऊनही आपण तिच्यापासनं दूरच राहिलो—भ्याडपणानं वागलो. एका मनमोकळ्या, सज्जन मुलीबद्दल गैरसमज करून घेतला. तडकाफडकी काहीबाहीच निर्णय घेऊन मोकळे झालो. गंधा आपल्यासाठी जीव पाखडीत होती, हे तर खरंच; पण ती जे वागत होती, ते अगदी निष्कपटीपणानं. आपल्याला तिच्या वर्तनात किंतु दिसला. छद्मीपणा जाणवला. पण हे तर नुकतंच घडलंय्. ज्या वेळी आपण तिच्यापासून दूर होण्याचं ठरवलं, त्या वेळी आपल्या मनात काही वेगळेच विचार खेळत होते. कुठेतरी चूक

होतेय, एवढंच कळत होतं. पण ती चूक ज्या जागी आपण हुडकण्याचा प्रयत्न केला, ती जागाच चुकीची होती. नव्हे, आपण मुद्दाम उकरून काढलेली ती माती होती ! अजूनही चूक सुधारता येईल. गंधा म्हणतेय, ' आपण हे सारं विसरू शकणार नाही–' जुने संबंध असे तोडून तुटण्याइतके कमकुवत नाहीत, हे तर खरंच. पण गंधा म्हणते त्याचप्रमाणे ते जतन करणंही मूर्खपणाच आहे. शहाणपणा आता करायचाच असला तर हे संबंध नव्या भूमिकेतून प्रस्थापित करावे लागतील. त्या दृष्टीनं तिची सूचना मानायला हरकत नाही. अन् शेवटी हे किती झालं तरी अपरिहार्य आहे. आततायीपणानं काही साधणार नाही...

दिनकर उत्तेजित झाला. म्हणाला, " माफ कर गंधा. तू कोण आहेस, तुझ्या अंतरात काय आहे, ह कधीच कळलं नाही मला. पुसटशी कल्पना आज येतेय. खरंच, तू थोर आहेस. त्यागी आहेस. मनात खूप वाटतंय,पण व्यक्त करता येत नाही ग !"

" ते सगळं राहूदे– तू काहीतरी अवास्तव बोलतो आहेस. पण उद्याचं काय ?"

" निश्चित झालं समज."

त्याला आश्चर्य वाटत होतं, आपण ठरवलं होतं काय अन् बोलत आहोत काय ?

गंधा उजळ मुद्रेनं बघत सांगत होती, ' दोघांनीही यायचं हं ! अन् अजून नावदेखील सांगितलं नाहीस पत्नीचं ?'

" अलका."

" अलका–अलका वहिनी ! छान आहे नाव !"

गंधा हसली. त्यानं रोखून तिच्याकडे पाहिलं. पण तिच्या डोळ्यांत छद्मीपणाची, बनेल विचारांची पुसटशीदेखील झाक त्याला दिसली नाही. आपल्यापेक्षा तीच जास्त शहाणी आहे, व्यवहारी आहे, भावनांना बांध घालण्याचं जास्त सामर्थ्य तिच्यात आहे, असं त्याला वाटलं.

" बरं, चलू मी आता ? फार उशीर झालाय्. " तो उठत म्हणाला.

" हो ! फार उशीर झालाय्. पण उद्याचा बेत ठरलाय्, हेही काही कमी नाही. विसरू नकोस, अनमान करू नकोस हं ! काळोख पडत चालला होता. गाडी येईलच तुला पोचवायला अन् उद्या सकाळी किती वाजता गाडी पाठवू ? दहाला ?"

" चालेल. "

" पण बघ हं ! कसली अडचण––"

" कळलं मला. तसं काही होणार नाही. अलकाला काही वाटणार नाही. मी समज घालतो तिची. चलतो मी. "

तो पुढे झाला अन् गंधाचा हात हलके दाबीत तो म्हणाला, " अच्छा !"

तीही दचकली नाही. निर्मळ ताज्या पाण्याचा शीतल-उबदार स्पर्श व्हावा, तसं त्याला वाटलं.

पोर्चमधून गाडी हलली. बागेतून अलगद रस्त्याला लागली. त्यानं वळून पाहिलं.

बंगल्याच्या दारात गंधा उभी होती. तो दूर चालला होता. पण त्याला वाटलं, आता तर आपण जास्तच तिच्याजवळ आलोत—नव्या नात्यानं, नव्या हुरुपानं. गैरसमज फिटले आहेत. तुटक बिंदू सांधले आहेत. अन् कधीतरी झालं गेलं सगळं विसरावं लागणार होतं; पण ते पूर्णपणे विसरणं अशक्य होतं. त्यापेक्षा हा मार्ग चोखाळणंच अधिक सुखप्रद आहे.

रस्त्यावरल्या वीजनळ्यांचे झोत खालच्या तुकतुकीत पृष्ठभागावर प्रतिबिंबित झाले होते. एकमेकांत मिसळत होते.

तो घरी आला त्या वेळी अलका वाट बघून थकली होती. तिला जवळ घेऊन तो म्हणाला, " फारच उशीर झाला नं ?"

मग कितीतरी वेळ तो अलकाशी बोलत बसला होता. एखाद्या परीची गोष्ट सांगावी, तसं मन खुलं करून सारंसारं सांगत होता. शेवटी त्यानं विचारलं, " मग अलका, जायचं ना उद्या गंधाच्या घरी ?"

' हो जायचं. खुशाल जायचं ! पण तुम्ही आधी जेवलातदेखील नाही धड ! आता नीट झोप तरी घ्यायचीय् की नाही ?"

" पण तुझा काही गैरसमज..."

' शूः !' तिनं नेहमीसारखं लाडिकपणानं त्याला दटावलं.


—निश्चित मनानं तो झोपी गेला.

—आणि सकाळी दिनकरला लवकर जाग आली आहे. खिडकीत रेलून तो दूर-वर पाहत आहे—धुक्याचे पर्वत विरळ-विरळ होत अधांतरी तरंगू लागले आहेत... गंमत वाटते आहे. कधीतरी, क्वचित् लाभतील असे हे सुखद–सोत्कंठ क्षण....रुण-झुणते वेध लावणारी ही सतेज वेळ...

दिनकरच्या मनात काहीबाही घुमू लागतं. अलकाला उठविण्यासाठी तो वळतो. ती कधीच उठून कामाला लागली आहे. आतून येणाऱ्या कपबशांच्या किणकिणाटा-मुळं तो भानावर येतो. लगबगीनं मग ती दोघं तयारीला लागतात. आवराआवर करण्यात वेळ झरझर जातो. अलका साडी नेसण्यासाठी सेफ उघडते—मंद गुलाबी सुगंध घरभर दरवळतो. धुंद मनानं सेफच्या आरशासमोर दिनकर पोषाख करून उभा राहतो, शीळ घालीत टाय बांधू लागतो.

अन् गंधा देसाईच्या गाडीचा परिचित हॉर्न त्याला ऐकू येतो. ○

# १२



# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

विंटर पॅलेससमोरील हत्याकांडानंतर साऱ्या रशियाभर झारशाहीविरुद्ध असंतोषाचा जो गदारोळ उठला त्याला संघटित स्वरूप देण्यासाठी १९०५ च्या मेमध्ये पीटर्सबर्ग येथे प्रा. मिलिउकोव्ह यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय मेळावा भरून त्यात प्रातिनिधिक शासनयंत्रणेच्या आणि सार्वत्रिक मताधिकाराच्या मागण्यांचा पुनरुच्चार करण्यात आला. आता या मागण्यांकडे संपूर्ण दुर्लक्ष करून चालणार नाही, हे झारच्या लक्षात आले आणि म्हणून त्याने इंपिरियल ड्युमाची– लोकांनी निवडून दिलेल्या संसदेची– मागणी आपल्याला मान्य असल्याचे ५ ऑगस्ट रोजी जाहीर केले. परंतु केवळ सल्लागार मंडळ असेच या ड्युमाचे स्वरूप राहणार होते आणि कायदे करण्याचे सर्व अधिकार पूर्वीप्रमाणेच यापुढेही झार स्वतःकडे ठेवणार होता. आपल्या हातातील एकतंत्री सत्ता सोडावयास झार अद्यापही तयार नाही हे पाहून लोकांच्या संतापात भरच पडली. राजकीय स्वातंत्र्य मिळविण्यासाठी झारशाहीविरुद्ध लढा दिल्याशिवाय आता अन्य मार्ग उरलेला नाही ही भावना बळावताच, ठिकठिकाणी कामगारांचे आणि विद्यार्थ्यांचे संप, निदर्शने, दंगली यांचे पर्व सुरू झाले. याच सुमारास म्हणजे सप्टेंबरमध्ये युनियन ऑफ लिबरेशनच्या चाळीस प्रतिनिधींची मॉस्को येथे बैठक भरून तीत कॉन्स्टिट्यूशनल डेमोक्रॅटिक पार्टी या नव्या पक्षाची स्थापना करण्यात आली. 'कॅडेट' नावाने हा पक्ष ओळखला जाऊ लागला.

सप्टेंबरच्या मध्यास मॉस्कोतील मुद्रण कामगारांनी संप पुकारला. या संपात टपाल व तार खात्यातील कामगारही सामील झाले. कोणत्याही पक्षाकडे या संपाची सूत्रे नसताना या संपाचे लोण साऱ्या देशभर पसरले. २५ ऑक्टोबरपासून रेल्वे कामगारही संपावर गेले. रेल्वे कामगारांच्या संपामुळे सरकारी यंत्रणेचे महत्त्वाचे व्यवहारही थंडावले. आतापर्यंत झारशाहीच्या दडपशाहीपुढे लोक भयभीत होत असत; परंतु १९०५ पासून या दडपशाहीविरुद्ध लोक सामुदायिक रीतीने व निर्भीड वृत्तीने उभे राहू लागले. रशियन जनतेच्या मनातील या क्रांतिकारक बदलामुळे १९०५ हे साल रशियाच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा मानले जाते.

लोकमताचा वारा आता कोणत्या दिशेने वाहू लागला आहे, याचा झारच्या गोतावळ्यात वावरणाऱ्यांना अंदाज येऊ लागला. लोकांना ताबडतोब राजकीय अधिकार दिले नाहीत, तर देशात रक्तरंजित क्रांतीचा आगडोंब उसळेल, असा इशारा काऊंट विट या भूतपूर्व अर्थमंत्र्याने दिला. २२ ऑक्टोबर १९०५ रोजी झारला धाडलेल्या पत्रात काऊंट विट लिहितो—

> ' स्वातंत्र्याच्या चळवळीला जोर चढल्याचे दृश्य आता दिसू लागले असले तरी त्यावरून ही चळवळ नव्यानेच सुरू झाली आहे, असा गैरसमज करून घेणे घातक ठरेल. रशियाच्या गेल्या अनेक शतकांच्या इतिहासात या चळवळीची मुळे रुजली गेली आहेत. सरकारने लोकांना आता राजकीय अधिकार दिलेच पाहिजेत ! तसे झाले नाही तर या राज्ययंत्रणेच्या अस्तित्वालाच धोका निर्माण होईल. इतिहासाची वाटचाल कोणीच अडवू शकत नाही. रशियन जनतेला नागरी स्वातंत्र्य देण्यात जर राजसत्तेने खळखळ केली तर येथे क्रांती झाल्यावाचून राहणार नाही. जर समजा, तशी क्रांती झालीच तर तिचे स्वरूप इतके सर्वभक्षक राहील की या क्रांतीला मानवजातीच्या इतिहासात तुलना सापडणार नाही ! या वणव्यात रशियाची सारी प्राचीन परंपरा नष्ट होऊन जाईल आणि तिच्या राखेतून एक संपूर्ण नवी समाजव्यवस्था जन्मास येईल. कदाचित परकीय राष्ट्रेही आपल्या स्वार्थाखातर या क्रांतीला मदत करतील.आज समाजवादाची नुसती चर्चाच होत आहे; पण जर का येथे क्रांती झाली तर हा समाजवाद येथे सत्ताधिष्ठित होईल आणि मग धर्म, कुटुंब, खाजगी मालमत्ता, राजेशाही या सर्व ' संस्थां'चा विनाश होईल. म्हणून सरकारने आता ताबडतोब लोकांना घटनात्मक अधिकार दिले पाहिजेत. त्याशिवाय पर्यायच उरलेला नाही. एक तर लोकांच्या मागण्यांचा विचार करून त्यानुरूप सरकारने बदलले पाहिजे किंवा नष्ट तरी झालें पाहिजे, हाच या वर्षातल्या घटनांचा अर्थ आहे.'

याच सुमारास आणखीही एक महत्त्वाची घटना घडली. पीटर्सबर्गमधील कामगार संघटनांनी कामगारांचे प्रतिसरकार स्थापन करण्याचे ठरविले. त्यानुसार २६ ऑक्टोबर रोजी निवडणुका होऊन पीटर्सबर्गमधील कामगारांचे 'सोव्हिएट कौन्सिल ऑफ वर्कर्स डेप्युटीज' हे मंडळ अस्तित्वात आले. कामगारांनी फक्त या मंडळाचेच आदेश मानावेत, असे ठरले. रशियातील या पहिल्या सोव्हिएटच्या अध्यक्षपदी ख्रुस्टालेव्ह-नोसर या तरुण वकिलाची निवड झाली. ट्रॉटस्की आणि अॅव्हक्सेंटिएव्ह हे दोघे उपाध्यक्ष म्हणून निवडून आले. हे सोव्हिएट स्थापन करण्यात सोशल डेमोक्रॅटिक पक्षातील मेन्शेव्हिक गटाने पुढाकार घेतला होता. पीटर्सबर्गमधल्या वीस हजार कामगारांनी आपले चाळीस प्रतिनिधी या सोव्हिएटवर निवडून दिले. सोव्हिएटच्या पहिल्याच बैठकीमध्ये श्रमिक जनतेला संपासाठी सिद्ध राहण्याचा आदेश देण्यात आला. या आदेशात असे म्हटले होते की, येत्या काही दिवसांमध्ये रशियात फार महत्त्वाच्या घटना घडणार असून श्रमिक जनतेचे दीर्घकालीन भवितव्य ठरविण्याचे सामर्थ्य या घटनांमध्ये सामावलेले आहे. म्हणून सर्व श्रमिक जनतेने आपली अभेद्य एकजूट निर्माण करून या घटनांचे स्वागत करण्यासाठी आणि त्यात सहभागी होण्यासाठी सिद्ध राहिले पाहिजे.

पीटर्सबर्गमधील कामगारांनी आपले सोव्हिएट (पंचायतमंडळ) स्थापन केले आहे ही गोष्ट झार राजवटीपासून लपून राहू शकली नाही; परंतु तरीही या सोव्हिएटच्या कार्यात व्यत्यय आणण्याचा सरकारी अधिकाऱ्यांना धीर झाला नाही. त्यामुळे साहजिकच 'कामगारांचे सरकार' अशी या सोव्हिएटला अल्पावधीतच प्रतिष्ठा लाभली. कामगारांना त्यांचे रास्त अधिकार मिळवून देण्याचे मर्यादित उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून अस्तित्वात आलेले हे सोव्हिएट लवकरच राजकीय आंदोलनाचे प्रभावी हत्यार म्हणून उपयोगी ठरू लागले. क्रांतिकारक प्रवृत्तीच्या कार्यकर्त्यांनी या सोव्हिएटच्या आधारानेच आपली पावले टाकण्यास प्रारंभ केला. सोव्हिएटचे अध्यक्षपद जरी ख्रुस्टालेव्हकडे असले तरी त्याची सर्व सूत्रे ट्रॉटस्कीकडेच आली होती. आपल्या सामर्थ्याचा अंदाज घेण्यासाठी ट्रॉटस्कीने ३० ऑक्टोबर रोजी पीटर्सबर्गमध्ये संपूर्ण हरताळ घडवून आणला आणि तो अपेक्षेपेक्षाही यशस्वी झाला.

पीटर्सबर्गमधील कामगार एकत्र येऊन आपले सोव्हिएट स्थापन करतात ही घटना वरकरणी दिसावयास मामुली असली तरी कामगारवर्गाच्या मदतीने सत्ता हस्तगत करणाऱ्या क्रांतीच्या मार्गावरील पहिले पाऊल म्हणून तिचे विशेष महत्त्व आहे. झारच्या सर्वंकष राजसत्तेविरुद्ध प्रतिसरकार म्हणून उभे राहण्याचे धाष्टर्य दाखविणाऱ्या या छोट्याशा सोव्हिएटच्या पायावरच पुढे बारा वर्षांनी राज्यक्रांतीची दणकट इमारत उभी राहू शकली. पीटर्सबर्गमधील सोव्हिएटचे हे स्वरूप केवळ झारलाच नव्हे तर युरोपमधील इतर एकतंत्री सत्तांनाही भयावह वाटले आणि

म्हणूनच या सोव्हिएटची पाळेमुळे खणून काढण्यासाठी आपण तुला मदत करण्यास तयार आहोत, असे जर्मनीच्या कैसरने झारला कळविले. केवळ मदतीचे आश्वासन देऊनच कैसर थांबला नाही, तर झारच्या मदतीला जाण्यासाठी फिनलंडच्या आखातातील आपल्या नौदलाला सज्ज राहण्याचा त्याने आदेश दिला.

कैसरचा हा खलिता आल्यानंतर आपल्या देशातील परिस्थितीने गंभीर वळण घेतले आहे याची झारला जाणीव झाली आणि त्याने ३० ऑक्टोबर रोजी प्रधानमंत्रिपदावरून पोबेडोनोत्सेव्ह याची हकालपट्टी करून त्या पदावर काउंट विट याची नेमणूक केली. इतकेच नव्हे तर लोकांना भाषणस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य आणि सभास्वातंत्र्य देण्यालाही आपण तयार आहोत, असे त्याने जाहीर केले. या घोषणापत्रकात झारने असेही म्हटले होते की, मतदानाचा अधिकार व्यापक करून ड्यूमाच्या निवडणुका घेतल्या जातील आणि ड्यूमाने मान्यता दिल्याशिवाय कोणताही कायदा करण्यात येणार नाही. पूर्वीच्या घोषणेत ड्यूमाचे स्वरूप सल्लगार मंडळासारखे होते. या नव्या घोषणेत याच कायद्यावर शिक्कामोर्तब करण्याचा अधिकार लोकप्रतिनिधींकडे सोपविण्यास झार तयार झाला होता.

झारचा हा जाहीरनामा वाचताच पीटर्सबर्गचा गव्हर्नर ट्रेपोव्ह म्हणाला, "अखेर आमच्या लोकांना कायदा करण्याचा अधिकार मिळणार तर ! तसे असेल तर या नव्या घोषणेमुळे नवा रशियाच जन्माला येत आहे असे म्हटले पाहिजे."

झारची ही आश्वासने फसवी आहेत, असे ट्रॉट्स्कीचे मत होते. त्याने सोव्हिएटतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या 'इझव्हेस्तिया' या पत्रात लिहिले, 'आम्हांला सर्व काही मिळालेले आहे आणि त्याबरोबरच काहीही देण्यात आलेले नाही.'

झारच्या नव्या जाहीरनाम्याला कामगारांचा आणि विद्यार्थ्यांचा स्पष्ट विरोध आहे, हे दाखवून देण्यासाठी ३१ ऑक्टोबर रोजी पीटर्सबर्गमध्ये एक प्रचंड मिरवणूक काढण्यात आली. राजकीय सुधारणा अंमलात आणण्यापूर्वी राजकीय स्थानबद्धांची मुक्तता करा, अशी हे कामगार व विद्यार्थी मागणी करीत होते. ही मागणी करीत ते तुरुंगाच्या रोखाने जाऊ लागले. परंतु तुरुंग फोडण्याचा त्यांचा प्रयत्न मात्र पोलिसांनी यशस्वी होऊ दिला नाही. हे कामगार घरोघर परतत आहेत न आहेत तोच झारच्या हस्तकांनी मिरवणूक काढून रस्त्यावर दिसेल त्या कामगाराला व विद्यार्थ्याला झोडपण्यास सुरुवात केली.

या मारहाणीच्या प्रकाराबाबत 'इझव्हेस्तिया'मध्ये लिहिताना ट्रॉट्स्की म्हणाला, 'आपल्याला काय हवे आहे आणि काय नको आहे हे कामगारवर्गाला नीट माहीत आहे. दंडुका दाखविणारा ट्रेपोव्हही आम्हांला नको आणि उदारमतवादाचे कातडे पांघरणारा विटसारखा धोरणीही आम्हांला नको. जसा लांडग्याचा दणकट पंजाही नको, तशीच कोल्ह्याची मऊसर शेपटीही नको.'

८ नोव्हेंबर रोजी पीटर्सबर्गमधील खलाशांनी झार राजवटीविरुद्ध बंड पुकारले, परंतु पोलिसांनी खलाशांना मारझोड करून ते बंड मोडून टाकले. पोलिसांच्या या दंडुकेशाहीविरुद्ध आपला संताप व्यक्त करण्यासाठी सोव्हिएट कामगारांना संपावर जाण्याचा आदेश दिला. हा संप लौकर बारगळेल, अशी काऊंट विट याची कल्पना होती; परंतु आपण अजीजी केल्याशिवाय हा संप मिटणार नाही हे कळून आल्यानंतर तो नरमाईची भाषा बोलू लागला. झारचा आतापर्यंतचा कोणताही मंत्री एवढ्या मुलायम भाषेत बोलला नव्हता.

विट म्हणाला, " कामगार बंधूंनो, तुम्ही कामावर रुजू व्हा. तुम्ही हा संप कशासाठी करता असे मी तुम्हांला कळकळीने विचारतो. तुमच्या या हट्टामुळे तुमच्या बायकामुलांना किती त्रास सोसावा लागतो याचा जरा विचार करा. मी जनतेचा सेवक आहे. म्हणून तुमचे कल्याण कसे साधेल याचाच मी सारखा विचार करीत असतो. तुमच्या या हितकर्त्याचा सल्ला तुम्ही मानणार नाही का ?"

विट याच्या या मानभावी उद्गाराबद्दल ट्रॉटस्कीने लिहिले आहे, ' काऊंट विट याने कामगारांना ' बांधवहो ' असे संबोधले याचे आम्हांला आश्चर्य वाटते. कारण काऊंट विट या नावाचा आपला कोणीही नातलग नाही असे कामगार मानतात. '

सशेरॉन येथे राहत असलेल्या लेनिनचे रशियातल्या घटनांकडे सतत लक्ष होते. झारविरुद्ध सशस्त्र उठाव करून कामकऱ्यांची आणि शेतकऱ्यांची हुकूमशाही प्रस्थापित करण्याचा काळ आता जवळ येऊन ठेपला आहे असे त्याला वाटू लागले. कामगारवर्गाच्या उठावासंबंधी मार्क्स आणि एंगल्स यांनी जे जे लिहून ठेवले आहे ते ते सारे त्याने पुन्हा वाचून काढले. १८४८ मधील पॅरिसमधला उठाव ज्याने अमानुष रीतीने चिरडून टाकला त्या जनरल क्लुसेरेत याचे आत्मवृत्तही लेनिनने चाळले. आपण उठाव केला तर तो चिडरण्यासाठी शत्रुपक्ष कोणते उपाय योजील याचा त्याला त्यामुळे अंदाज आला. सशस्त्र उठावाची वेळ जवळ आली असताना ' सोशल डेमोक्रॅटिक पक्षा 'वरचे मेन्शेव्हिकांचे प्रभुत्व झिडकारून देणे त्याला आवश्यक वाटू लागले. १९०५ च्या एप्रिलमध्ये लेनिनने लंडनमध्ये ऑल रशियन सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचा तिसरा मेळावा भरविला. या मेळाव्याला फक्त बोल्शेव्हिक कार्यकर्तेच हजर राहतील अशी त्याने दक्षता घेतली असल्यामुळे २५ एप्रिलपासून १० मेपर्यंत चाललेल्या या मेळाव्यात लिटव्हिनोव्ह, कामेनोव्ह, रिकोव्ह, क्रासीन, लुनाखरस्की आदी कार्यकर्त्यांनीच भाग घेतला.

जूनच्या प्रारंभी कझान येथील एक बोल्शेव्हिक कार्यकर्ता लेनिनची भेट घेण्यासाठी सशेरॉनला आला.

" आपले मार्गदर्शन हवे आहे, " असे त्या कार्यकर्त्याने म्हणताच, लेनिन उत्त-

रला—" आता आपण एकच गोष्ट केली पाहिजे. सशस्त्र उठाव."

" पण बोल्शेव्हिक पक्षामध्ये एवढी ताकद अद्याप कुठे निर्माण झाली आहे? उठाव केला तर आपण विजयी होऊ का?" कार्यकर्त्याने शंका प्रदर्शित केली.

"विजय!"—लेनिन आवाज चढवीत सांगत होता, "विजयाची क्षिती आपण कशाला करायची?"

लेनिनचे ते रौद्र स्वरूप पाहताच तो कार्यकर्ता अवाक् झाला. आपली मूठ टेबलावर जोरजोराने आपटत लेनिन त्याला सांगत होता,—

"तू रशियात जाऊन तिथल्या आपल्या कार्यकर्त्यांना माझा निरोप सांग, की मी कोणत्याच भ्रमात वावरत नाही. रोखठोक वास्तववादी म्हणून माझा लौकिक आहे. आपण आता लवकर सशस्त्र उठाव करावा, असे जेव्हा मी म्हणतो, तेव्हा आपण त्यात हमखास यशस्वी होऊ, असे मी मुळीच मानत नाही. इतरांनीही त्या भ्रमात न राहणेच बरे! आपण अद्याप दुर्बळ आहोत हे इतरांपेक्षा मला अधिक चांगले माहीत आहे. आपण विजयी होऊ किंवा नाही हा विचार करणेच चुकीचे आहे. झारशाहीची दगडी इमारत आपल्याला गदगदा हलवायची आहे आणि श्रमिक जनतेला क्रांतीच्या नव्या मार्गावर आणून उभे करायचे आहे. जनतेला आपल्या मागे खेचायचे असेल तर असेच काही तरी अचाट दिव्य करून दाखविले पाहिजे. आज तरी तेच उद्दिष्ट आहे आणि म्हणून मी पुन: पुन्हा सांगतो, सशस्त्र उठाव करा. या उठावात आपण विजयी होऊ की नाही या भीतीने धास्तावलेल्या चिंतातुर जंतूंशी मला कोणताच संबंध ठेवायचा नाही.'

तो कार्यकर्ता कझानला परतला तेव्हा त्याच्या कानात लेनिनचे ते शब्द घुमत होते— सशस्त्र उठाव......क्रांतिकारी सेनेची उभारणी......क्रांतिकारकांचे हंगामी सरकार......

त्या कार्यकर्त्याला सशस्त्र उठावाचा केवळ उपदेश करूनच लेनिन स्वस्थ बसला नाही. त्याने रशियातील आपल्या पक्ष सदस्यांकडे शस्त्रास्त्रे पाठविण्याचा धडाकाच सुरू केला. त्यासाठी त्याने पोटेमकीन जहाजावरील खलाशांना झारशाहीविरुद्ध जागे केले. तो खलाशांना सांगत होता—' जुलमी झारशाही उलथून पाडायची असेल तर क्रांतिकारकांचे सैन्य उभारलेच पाहिजे. कारण, कोणताही प्रश्न लष्करी सामर्थ्याशिवाय सुटूच शकत नाही. त्यातून आजचा काळ असा आहे की सशस्त्र सैन्यच आपले स्वप्न साकार करू शकेल. म्हणून तुम्ही ही शस्त्रास्त्रे रशियात पोचविली पाहिजेत, बोल्शेव्हिक पक्षाचे सामर्थ्य वाढलेच पाहिजे.'

पीटर्सबर्गमधल्या आपल्या कार्यकर्त्याला धाडलेल्या पत्रात लेनिन लिहितो—

'आपल्याजवळ शस्त्रसामर्थ्य हवे. अमाप शस्त्रसामर्थ्य हवे. सहा महिने होऊन गेले, आपण बाँब कसे तयार करावेत याचा नुसता काथ्याकूट करीत

बसलो आहोत. मला ही गोष्ट साफ नामंजूर आहे. अजूनपर्यंत आपण एकदेखील बाँब तयार करू शकलो नाही, ही केवळ नामुष्कीची गोष्ट आहे ! आता चर्चा, योजना, आराखडे बस्स झाले. तरुणांना हाताशी धरा आणि बाँब तयार करायला लागा. आपण जर का आता हाती आलेली संधी गमावली तर जन्मभर पश्चात्ताप करावा लागेल. विद्यार्थ्यांना आणि कामगारांना हाताशी धरून त्यांची क्रांतिसेना उभारा. त्यांना शस्त्रे द्या. चाकू, रिव्हॉल्व्हर हातबाँब—जी मिळतील ती. या सर्व लोकांनी प्रथम आपल्या सोशल डेमोक्रॅटिक पक्षात येऊन समाजवादाची शपथ घेतली पाहिजे, असा मूर्खासारखा आग्रह धरू नका. नेहमीचे नियम क्रांती जवळ आली की दूर फेकून द्यायचे असतात! जर येत्या एक दोन महिन्यांत तुम्ही पीटर्सबर्गमध्ये दोन-तीनशे सशस्त्र क्रांतिकारी गट उभारू शकला नाहीत तर तुमच्या त्या समित्या आणि मंडळे खड्डयात पुरून टाका. या क्रांतिसेनेला छुप्या युद्धाचे शिक्षण देण्याची तातडतोब व्यवस्था व्हावयास हवी. हे शिक्षण पुरे झाले की काही गटांनी पोलिसचौक्यांवर हल्ले चढवावेत. काही गटांनी सरकारी हेरांचे खून करावेत. जो गट विशेष तयार असेल त्याच्यावर बँकांवर हल्ले करून तिजोरी लुटण्याची जबाबदारी सोपवावी. जर खरोखरच हे सारे घडून आले तर आज आपण जो त्याग करून त्याची आपल्याला सव्याज परतफेड मिळेल याची खात्री बाळगा.'

लेनिनचे हे सशस्त्र उठावाचे प्रतिपादन चालू असताना रशियात कामगारांच्या आणि विद्यार्थ्यांच्या संपाचे पर्व सुरू झाले होते. कामगारवर्ग निदर्शनांचा मार्ग चोखाळत आहे ही गोष्ट लेनिनच्या शिकवणुकीत बसत नव्हती. परंतु या निदर्शनांमुळे कामगारवर्गात एवढी प्रचंड जागृती निर्माण झाली होती की, लेनिनला अनिच्छेने या मार्गाचे महत्त्व मान्य करावे लागले. पीटर्सबर्गमधल्या सोव्हिएटलाही प्रारंभी त्याचा विरोध होता. परंतु तो प्रकट केला तर कामगारवर्ग आपल्यावर नाराज होईल या जाणीवेने तो गप्प बसला. एवढेच नव्हे तर हे सोव्हिएटच आपल्या हाती कसे येईल याचा मार्ग तो शोधू लागला.

अशा परिस्थितीत दूर स्वित्झर्लंडमध्ये राहणे त्याला परवडण्यासारखे नव्हते. नोव्हेंबरमध्ये लेनिन रशियाला परतला. गेल्या चार-पाच वर्षांत पीटर्सबर्गमधील परिस्थिती खूपच बदलली होती. आता तेथे वर्तमानपत्र काढण्याचीही मुभा होती. पीटर्सबर्ग आपल्या हातात असणे आवश्यक आहे हे हेरून लेनिनने तेथे 'नोव्हाया झिझ्न' हे पत्र सुरू केले. प्लेखानोव्ह याने या पत्राच्या संपादक मंडळात यावे, अशी लेनिनची इच्छा होती. तसे त्याने प्लेखानोव्हला पत्रही धाडले. हे पत्र वाचल्या-

नंतर प्लेखानोव्ह हसत म्हणाला, "ही लांडगा आणि शेळी यांची युती ठरणार आहे."

लेनिनच्या बोल्शेव्हिक गटाचे पीटसबर्गमध्ये वृत्तपत्र सुरू होताच मेन्शेव्हिक गटाला स्वस्थ बसून चालणार नव्हते. मेन्शेव्हिकांनी 'नात्शॅलो' हे पत्र सुरू केले. या पत्राची सूत्रे ट्रॉटस्की आणि पार्व्हस यांच्याकडे सोपवण्यात आली. ते दोघेजण 'नात्शॅलो' पत्रातून अव्याहत क्रांतीचा आपला सिद्धांत मांडू लागले. जगातील सर्व राष्ट्रांमध्ये समाजवादी क्रांती होणे आवश्यक असून रशियातील क्रांती ही या जागतिक क्रांतीची नांदी ठरली पाहिजे, असे या सिद्धांताचे थोडक्यात सूत्र होते.

लेनिन सकाळच्या वेळी आपल्या नव्या पत्राचे संपादकीय कामकाज पाही आणि संध्याकाळी गुप्त बैठकी घेऊन सशस्त्र उठावासंबंधी चर्चा करी. विल्यम फ्रे या नावाचा खोटा पासपोर्ट घेऊनच तो पीटर्सबर्गला परतला होता. कामाचा व्याप बराच वाढला असल्यामुळे क्रुपस्कायाला येथे तूर्त तरी बोलावून घ्यायचे नाही असेच त्याने ठरविले होते. त्यापुढे संध्याकाळची बैठक आटोपली की तो सहकाऱ्यांसमवेत कोठल्यातरी उपाहारगृहात जाऊन भोजन करी. असेच एकदा लेनिन आणि त्याचे दोन-तीन सहकारी उपाहारगृहात गेले असताना शेजारच्या टेबलापाशी एक सुंदर तरुणी एकटीच बसलेली लेनिनला आढळली. ती श्रीमंत असावी हे तिच्या पोशाखावरून समजून येत होते. परंतु श्रीमंतीपेक्षाही तिच्या सौंदर्यात खास जादू होती. लेनिन सारखा तिला न्याहाळीत आहे हे एका सहकाऱ्याच्या लक्षात येताच तो त्या तरुणीजवळ गेला आणि मोठ्या अदबीने म्हणाला, "तुम्ही जर एकट्याच असाल तर आमच्याबरोबरच जेवण करा ना!" नंतर लेनिनकडे अंगुलीनिर्देश करीत तो म्हणाला, "चला, तुम्हांला मी एका गमतीदार गृहस्थाची ओळख करून देतो. तसा तो बराच प्रसिद्ध आहे. परंतु स्वतःसंबंधी फारसे बोलायला त्याला आवडत नाही."

"ठीक आहे", असे म्हणत ती तरुणी आपल्या खुर्चीवरून उठली आणि लेनिनच्या शेजारी जाऊन बसली.

"माझे नाव एलिझाबेथ के." तिने स्वतःची ओळख करून दिली.

"हे विल्यम फ्रे". मघाच्या कार्यकर्त्याने एलिझाबेथला लेनिनची ओळख करून दिली.

"आपण ब्रिटिश आहात काय?"– एलिझाबेथने विचारले.

"नाही. तसेच म्हणता येत नाही–" लेनिनने वेळ निभावून नेली. त्यानंतर लेनिन आणि एलिझाबेथ तासभर गप्पा मारीत बसले होते.

नंतर काही दिवसांनी 'नोव्हाया झिझन' पत्रात काम करणाऱ्या एका ओळखीच्या व्यक्तीला भेटण्यासाठी एलिझाबेथ तेथे आली असताना 'विल्यम फ्रे' तिचे

स्वागत करीत म्हणाला, " वा:, हा एक गंमतीचाच योग म्हणायचा. आपली पुन्हा भेट होईल आणि तीही येथे याची मला कल्पना नव्हती. हल्ली तुम्ही त्या उपाहार-गृहात जेवायला येत नाही वाटतं ?"

लेनिनने सूचक भाषेत आपल्याला पुन्हा तेथे भेटण्याचे निमंत्रण दिले आहे हे त्या चाणाक्ष तरुणीन ओळखले. दररोज संध्याकाळी तिची आणि लेनिनची त्या उपाहार-गृहात भेट होऊ लागली. नंतर लेनिनने तिला आपल्या कार्याचे स्वरूप समजावून सांगताच एलिझाबेथने आपली खोली पक्ष-बैठकीसाठी वापरू देण्यास मान्यता दिली. कधी कधी लेनिन एकटाच तिच्या खोलीवर येई आणि स्वयंपाक करण्यात तिला मदत करू लागे. जेवण आटोपले, की लेनिन तिला पियानो वाजवण्यास सांगे. त्या दोघांतील मैत्रीचे संबंध घनिष्ट होऊ लागले.

१९०५ च्या अखेरीस सैनिकही अधूनमधून उठाव करू लागले. परंतु त्या उठावा-मागे कोणतीही पद्धतशीर यंत्रणा उभी नसल्यामुळे हे उठाव मोडून काढणे सरकारला सोपे जात होते. टपाल आणि तार खात्याच्या कामगारांनी पुन्हा एकदा संप करून सरकारी दळणवळण बंद पाडले. कामगार, खलाशी, विद्यार्थी आणि सैनिक वारंवार संप करू लागल्यामुळे सरकारने या बंडखोरीचा ताबडतोब बंदो-बस्त केला पाहिजे, अशी उद्योगपतींनी झारकडे मागणी केली. झार अशाच संधीची वाट पाहत होता. त्याने गृहमंत्री डुर्नोव्हो याला बंडखोरांचा बीमोड करण्यासाठी काय वाटेल ते उपाय योजले तरी हरकत नाही, अशी मोकळीक दिली. त्यानंतर सरकारी दडपशाहीला ताळमेळच उरला नाही. त्यात ब्लॅक हंड्रेड्स ही झारची हस्तक संघटनाही कामगारांना व विद्यार्थ्यांना मारहाण करू लागली.

प्लेखानोव्ह स्वित्झलंडमध्ये राहत होता. त्याने बोल्शेव्हिकांना आणि मेन्शे-व्हिकांना अशी विनंती केली की, ' रशियातील आजची परिस्थिती शत्रूला अनुकूल ठरणारी आहे. अशा वेळी आपण थोडेसे सबुरीने घेतले पाहिजे. जर का घाईघाईने आपण उठाव केला तर आपली चळवळ दडपून टाकण्याची सरकारला आयतीच संधी मिळेल. म्हणून आज तरी आपली तयारी पूर्ण झाली नसताना, सरकारशी झुंज घेतली तर कार्यनाशच होईल. आज जर का आपला पराभव झाला तर समाज-वादी चळवळ पन्नास वर्षांनी मागे खेचली जाईल. आपल्या बेजबाबदार वृत्तीमुळे झारशाही मात्र अकारण सर्वसमर्थ होऊन बसेल.'

प्लेखानोव्हचा हा सबुरीचा सल्ला लेनिन आणि ट्रॉटस्की या दोघांनाही पसंत पडला नाही. उलट सरकारला कर देऊ नका असे ट्रॉटस्कीने लोकांना आवाहन केले. परंतु सरकारी दडपशाही एवढी सैराट सुटली होती, की ट्रॉटस्कीचे ऐकण्याचा लोकांना धीरच राहिला नव्हता. लोक भेदरलेले आहेत, हे आढळून येताच सरकारने पीटर्सबर्ग येथील सोव्हिएटच्या सर्व प्रमुख सदस्यांची धरपकड केली.


बोल्शेव्हिक पक्ष उठावाच्या पूर्वतयारीत गर्क झाला होता. परदेशातून चोरटी शस्त्रे आणून पंचवीस जणांचे एक अशी तितकी जमतील तितकी क्रांतिसेनेची पथके उभारण्यावर त्यांचा विशेष भर होता. पीटर्सबर्गमध्येच झार राहत असल्यामुळे तेथील सरकारी बंदोबस्त कडक होता. म्हणून पीटर्सबर्गऐवजी मॉस्कोमध्ये आपल्या सामर्थ्याची परीक्षा घेण्याचे लेनिनने ठरविले.

ट्रॉटस्की प्रभृतींना १६ डिसेंबर रोजी अटक करण्यात आल्यानंतर या धरपकडीच्या निषेधार्थ २० डिसेंबर रोजी हरताळ पाळावा असे कामगार संघटनांनी ठरविले. सरकारी भयामुळे पीटर्सबर्गमधील हरताळाला यश लाभू शकले नाही. परंतु मॉस्कोमधील हरताळ मात्र शंभर टक्के यशस्वी ठरला. ही संधी साधून बोल्शेव्हिक पक्षाच्या क्रांतिसेनेने सरकारी मालमत्तेवर हल्ले चढविण्यास प्रारंभ केला. तीन-चार जणांची तुकडी एखाद्या गल्लीतून पुढे येई, पोलिसांवर बॉंब फेकी व निमिषार्धात अदृश्य होई. क्रांतिसेनेचे हे हल्ले स्थानिक पोलिसांना थोपविता येणे अशक्य झाल्यामुळे २९ डिसेंबर रोजी पीटर्सबर्गहून मॉस्कोला सैन्य पथक धाडण्यात आले. लष्करी सामर्थ्यापुढे क्रांति-सैनिकांची मात्रा चालेना. दोन दिवसांच्या आत म्हणजे ३१ डिसेंबर १९०५ रोजी मॉस्कोतील क्रांतिसेनेचा उठाव बंद पडला.

मॉस्कोमध्ये क्रांतिसेनेने उठाव करताच २४ डिसेंबर रोजी लेनिन पीटर्सबर्गहून फिनलंडला निघून गेला. सरकारी सेनेने अवघ्या दोन दिवसांच्या आत मॉस्कोमध्ये तुटपुंज्या साधनांनिशी झुंजणाऱ्या क्रांतिसैनिकांचा बीमोड करताच लेनिनचे सहकारी त्याच्या साहसवादावर टीका करू लागले. आपल्या अनुयायांचे लेनिनने अकारण रक्त सांडले असे ते म्हणू लागले. परंतु लेनिनला असल्या टीकेची मुळीच पर्वा नव्हती. तो म्हणत होता, " मॉस्कोतला आमचा उठाव फसला असेल. पण त्यामुळे सरकारशी झुंज घ्यावयाची म्हणजे कोणते दिव्य करावे लागते याचा लोकांना आणि पक्ष कार्यकर्त्यांना चांगला अनुभव मिळाला. "

लेनिनच्या दृष्टीने मॉस्कोतील उठाव ही भावी राज्यक्रांतीची रंगीत तालीम होती.

(क्रमशः)



# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## ☐ आडनावात काय नाही?

शेक्सपियर आणि मी शाळेत एका वर्गात शिकत असतो तर 'नावात काय आहे?' असे म्हणण्याची शेक्सपियरला कधीच छाती झाली नसती. कारण मास्त-रांच्या हजेरी रजिस्टरात माझे नाव अक्षरांप्रमाणे आधी आले असते, आणि बिचारा शेक्सपियर नेहमीच मागे पडला असता. परिणाम असा झाला असता, की नाटके लिहिण्याचा धाडसी उद्योग करून पाहण्याचे त्याच्या मनातही आले नसते; कारण 'प्रेझेंट सर' ओरडण्याची सुवर्णसंधी लवकर कधीच न मिळाल्याने त्याच्या मनात कायमचा न्यूनगंड निर्माण झाला असता. निदान मानसशास्त्रीयदृष्टया असे व्हायला हवे असे दिसते! कारण इंग्लंडात एका मानसशास्त्रज्ञाने असा शोध लावला आहे की हल्लीच्या क्यूच्या जमान्यात प्रत्येक ठिकाणी आडनावाच्या आद्याक्षरांप्रमाणे यादी करण्याची पद्धत इतकी वाढली आहे की, एस्पासून झेड्पर्यंतच्या अक्षरांनी सुरुवात होणाऱ्या आडनावांच्या मंडळींना नेहमीच मागे राहावे लागते व त्यांच्यांत एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण होतो.

पाहिलेत? आई-बाप निवडताना केवळ पैशाकडे पाहून चालत नाही तर निदान इंग्लंडात तरी त्यांचे आडनावही पाहावे लागते. पण भारतीय माणसाला या इंग्रजी न्यूनगंडाची बाधा होण्याचे काय कारण? आपल्याकडे काही माणसे दुसऱ्या कोणाचे तरी नाव टाकतात, तर श्रीमन् नारायणासारखे काही श्रीमान स्वतःचे आडनावही टाकतात. पंतप्रधान इंदिराजींसारखी काही धोरणी माणसे तर एकाच नावाची हुकूमशाही नको म्हणून नेहरू-गांधी असे दुहेरी (की दुटप्पी?) आडनावही लाव-तात. ते काही असले तरी एकदा हिंदुस्थानातून इंग्रजी गेली की काशिनाथ किरकिरे हा बबन वडबडेला एकदम मागे टाकणार अन् एका व्यंजनात त्याचा परदेशी न्यूनगंड नष्ट होणार.

## ☐ एकदा मरून बघा!

न्यूयॉर्कच्या एका मुडदेफरास कंपनीने वर्तमानपत्रात पुढील जाहिरात दिली आहे: 'आमच्याइतकी उत्कृष्ट सोय दुसरीकडे कोठेही आढळणार नाही. एकदा आमच्या उत्तरक्रियेचा अनुभव घेतलात की तुम्ही कधीच दुसरीकडे जाणार नाही.' बरोबर

आहे. गिऱ्हाइकाला जेव्हा अधिक चांगला माल मिळतो, तेव्हाच धंद्याला बरकत येते. एक हेअर ऑइल दुसऱ्या हेअर ऑइलपेक्षा अधिक सुगंधी असते, एक शेव्हिंग क्रीम दुसऱ्या क्रीमपेक्षा अधिक फेसाळ असते, एक हॉटेल दुसऱ्या हॉटेलपेक्षा अधिक आलीशान असते, किंवा एक मोटारगाडी दुसऱ्या मोटारीपेक्षा अधिक ऐसपैस असते, त्याप्रमाणे एक उत्तरक्रिया दुसऱ्या उत्तरक्रियेपेक्षा अधिक आरामशीर असली तरच मरण्यात अर्थ आहे, नाही का ? म्हणून ही कंपनी अगदी रास्तपणे म्हणते : लोकहो, एकदा आमच्याकडे मरून बघा,—संपूर्ण समाधानाची आमची गॅरंटी खोटी ठरली तरच दुसरीकडे मरा.

## □ न्हाणीघरातले नवकाव्य

काव्याला कुठलाही विषय असला तरी चालतो. नव्हे, हल्ली तर कुठलाही विषय नसला तरच काव्य होऊ शकते. कालिदासापासून होमरपर्यंतच्या जुन्या मंडळींनी लढायांची वर्णने केली तर मर्ढेकरांनी मेलेल्या उंदरांची केली; बी, बालकवी आदींनी फुला-मुलांची वर्णने केली तर अत्र्यांनी चहाच्या पेल्यात पडलेल्या माशीवर कविता केली. आता तर या विषय-वैचित्र्यावर अक्षरशः पाणी पडण्याचा प्रसंग आला आहे. इराणचे शहेन्-शहा पॅरिसमध्ये एक रत्नजडित, स्फटिकमंडित बाथ-टब करवून घेत आहेत व इराणचे राजकवी या बाथ-टबवर एक स्तुतिकाव्य करणार आहेत, असे परवा वाचले. म्हणजे कवितेच्या नावाने आंघोळ करणाऱ्या कुठल्याही राजकवीला साजेल असा विषय अखेर सापडला म्हणायचा ! हे काव्य वाचून सामान्य इराणी माणसाच्या जीवनातले गद्य पार धुऊन निघेल, अशी मी आशा करतो.

## □ समुद्राच्या वाऱ्यावर सोडलेली नैतिकता

फ्रान्समध्ये समुद्रकिनाऱ्यावरील एका गावात नगरपालिकेने असे बंधन घातले आहे की, वाळूत खेळायला येणारे मूल वयाने कितीही लहान असले तरी त्याच्या आई-वडिलांनी त्याला नग्न ठेवता कामा नये. शाब्बास ! याला म्हणतात संस्कृति-रक्षण ! फ्रान्समधल्या रस्त्यावर टॉपलेसमधल्या तरुणी चालतात अन् फ्रान्समधल्या नाइट-क्लबमध्ये संपूर्ण नग्न स्त्रिया चालतात. पण फ्रान्समधल्या समुद्रकिनाऱ्यावर तान्हे मूल उघडे नागडे चालू शकत नाही; अर्थात याचे कारण एकच आहे. फ्रान्स-मध्ये अनैतिकता हा पोलिओप्रमाणे फक्त लहान मुलांनाच होणारा रोग असल्याने त्यांच्या रक्षणासाठी हा नियम करावा लागला. हल्ली पोलिओचा डोस प्यायला मिळतो त्याप्रमाणे अनैतिकता कोळून प्याल्यावर फ्रेंच माणूस निर्धास्तपणे अंगावरचे कपडे (समुद्राच्या) वाऱ्यावर सोडू शकतो. ○



# रातराणी

विजय तेंडुलकर

## रंजनप्रधान हलकेफुलके नाटक

ग्रॅस आणि हार्ट या दोन गोष्टी प्रत्येकात थोड्याफार असतात आणि कधी कधी यात होऊ नये पण गल्लत होते.

जगाच्या कुठल्याही भागात, कुठल्याही घरात ही गल्लत आणि त्यापोटची गुंतागुंत होऊ शकेल.

म्हणून अमेरिकेतले ‘ सेंड मी नो फ्लॉवर्स ’ नाटक इथे इंग्रजी चित्रपटाच्या रूपात बऱ्यापैकी लोकप्रिय झाले आणि त्याचेच चपखलपणे मराठी ‘ वाजे पाऊल आपले ’ बनले. ‘ नरो वा कुंजरो वा ’ या आधीच्या नाटकानंतर मराठी नाट्यसृष्टीतून निवृत्त झाल्यासारखे असलेले विश्राम बेडेकर पुन्हा रिंगणात आले आणि सर्वसामान्य प्रेक्षकांपर्यंत, मर्यादित प्रमाणात का होईना, पोचले. बेडेकरांइतकेच निवृत्त वाटणारे तुलनेने त्यांच्याहून कनिष्ठ वयाचे दाजी भाटवडेकर आणि दामू केंकरे चक्क दोन अफलातून भूमिकांत ‘ हिट्ट ’ ठरले. ‘ मराठी नाटक ’ नावाची नवी नाट्यसंस्था जन्मास आली आणि नंतरचे नाटक वेळीच रंगभूमीवर आल्यास आणि तेही पुरेसे यशस्वी ठरल्यास ही संस्था टिकाऊ आणि व्यावसायिक क्षेत्रात बऱ्यापैकी नामवंत देखील होण्याची शक्यता आहे.

नाममात्र संस्थांच्या सध्याच्या रंगभूमीच्या अवस्थेत अशा संस्थेची गरज तर आहेच; परंतु त्याहीपेक्षा 'वाजे पाऊल'ने या संस्थेकडून येणाऱ्या संभाव्य नाटकाविषयी माझ्यासारख्याच्या मनात अपेक्षा निर्माण केल्या आहेत.

'वाजे पाऊल' हे एक निर्हेतुकपणे करमणूकप्रधान व हलकेफुलके नाटक आहे. तसा कोणताही मातबर विषय त्याला नाही. म्हटल्यास आहेही ! 'मृत्यूची चाहूल' हा विषय फारच मातबर ठरण्यासारखा होता. याच विषयावर पु. भा. भावे यांचे 'पडछाया' नामक एक अतिगंभीर आणि तत्त्वचिंतनात्मक नाटक मागे येऊनही गेले आहे; परंतु हा मोह किंवा आग्रह इथे पूर्णपणे टाळला आहे. या नाटकाला अगदी विनोदी नाटक म्हणून देखील फार मोठी उंची आहे असे नाही. यात सहजी हाती लागण्याजोगा संदेश नाही. हसू-आसूंचा मनोहर संगम वगैरे करण्याच्या प्रयत्नात जोडलेला एखादा भावनाप्रधान हळवा शेवटही त्याला नाही. आरंभी ज्या माफक अपेक्षा ते निर्माण करते; अर्थात रंजनाच्याच–त्या ते अखेरी बव्हंशी पुऱ्या करते. अधून मधून एखादा लोकप्रिय पातळीवरचा राजकीय विनोद ते पिकवते पण तो 'क्लिक' होऊनही पुन्हा तसल्या विनोदामागे वाहवताना आढळत नाही. वाङ्मयीन अश्लीलतेसारखा गरमागरम विषय विनोदी नाटकाला आयता मसाला ! हाही विषय या नाटकात रुचीपुरता आठवणीने वापरून पुढे तितक्याच संयमाने सोडून देण्यात आला आहे. थोडक्यात, आजच्या पेटंट व्यावसायिक लोकप्रिय साच्यांपैकी एखाद्यात 'फिट्ट' बसण्याचे सर्व संभव डावलून हे नाटक एका हलक्या-फुलक्या नाटकाच्या आपल्या मूळ पिंडाला नेटाने जागले आहे. त्यात काहीही असामान्य, आगळे, जबरदस्त, हृदयस्पर्शी, तुफान वगैरे नाही हेच त्याचे साधे वेगळेपण आहे. हे साधेपणच मराठी रंगभूमीवर सध्या दुर्मिळ आहे.

भगवंत मुस्कुटे नामक एका सुस्थितीतील यशस्वी आणि लठ्ठ माणसाला गॅसेसचा त्रास होतो. त्यात घरात 'दिव्यौषधी-निघंटू' हा वैद्यकीय ग्रंथ सदैव हाताशी बाळगणारा हा गृहस्थ अर्धा डॉक्टर असतोच. त्याचा फॅमिली डॉक्टर ऐनापुरे याच्या गफलतीने भगवंताला वाटते की, आपल्याला हार्ट डिसीझ झाला आहे आणि या धक्क्याने त्याचा भावनावश मनाचा वकील मित्र व्यंकटराव वाढते मद्यपान करू लागतो. इकडे स्वत:विषयी मरणाच्या चाहुलीने हळवा बनलेला भगवंत मन घट्ट करून अखेरची निरवानिरव करण्यासाठी सज्ज होतो. आपल्यामागे आपल्या स्वरूप-सुंदर बायकोला एकटे पडावे लागू नये म्हणून अचाट ऊर्फ अच्युत नामक तिच्या एका

## वाजे पाऊल आपुले

महाविद्यालयीन शिवराळ मित्राबरोबर तिचे जमवून देण्यासाठी अगत्याने झटू लागतो. तिला शेवटचे निरोपाचे पत्रदेखील लिहून ठेवतो. त्याचा वकील मित्र व्यंकटदेखील मित्रकार्यात मागे न राहून ' वहिनी, या तुमच्या पतीमागे तुम्हांला कुणी नाही असे मुळीच समजू नका. महर्षी कर्वे जरी गेले असले तरी मी तुमच्या-मागे नक्की राहीन,' असे धीराचे दिलासे वहिनींना मद्याचे उसासे सोडीत देऊ लागतो. यातच फॅमिली डॉक्टर ऐनापुरे दर आंब्याच्या सीझनप्रमाणे याही सीझनमध्ये पेशंट-स्ना त्यांच्या दैवावर सोपवून कोकणात निघून जातो. त्याचे म्हणणे, शेवटी ज्याचे त्याचे दैवच काय करील ते खरे असते. माणसांच्या हाती प्रयत्नांशिवाय काही नसते आणि ते करणाऱ्यासाठी आपल्याशिवाय हवे तेवढे डॉक्टर गावात उपलब्ध आहेत. तेव्हा आंब्याचा सीझन आपण तसा दवडणार नाही. भगवंतरावाची सरळमार्गी, सत्शील पत्नी पतीच्या मानसिक आजाराचे गांभीर्य न कळल्याने त्याच्या चमत्कारिक वागण्याबोलण्याचा आणि ' अखेर 'च्या पत्राचादेखील अर्थ असा घेते की, त्याचे आणखी कुणा बयेशी जमले आहे आणि आपल्याला नावडती म्हणून मार्गातून दूर करण्याचा त्याचा हा प्रयत्न आहे ! ती घर सोडण्याला निघते. भगवंतरावाला तिचा हा गैरसमज कळताच तो आवर्जून सगळे नाकारतो, याने तिचा गैरसमज जास्त दृढच होतो. हे पाहून व्यंकटराव याच्या मित्रत्वाच्या परंतु अमली सल्ल्याने तो घाई-घाईने सगळे पत्करतो आणि तिची सपशेल क्षमायाचना करतो. याने स्त्री विरघळते आणि पतीचे अपराध पोटात घालते हा स्खलनशील व्यंकटरावाचा घरचा अनुभव. पण भगवंतरावाच्या भलतेच अनुभवाला येते. त्याच्या निरपराधित्वाबद्दल मुळात आपली आपणच खात्री पटलेली आणि घर न सोडण्याच्या मनोमन निर्णयाला आलेली त्याची पत्नी त्याच्या या सपशेल कबुलीने नव्याने आणि अधिकच बिथरते. डॉक्टर ऐनापुरे कोकणातून कुळथाचे पीठ आपल्या पेशंटांसाठी घेऊन परततो आणि भगवंताला काहीदेखील झालेले नाहीं असे शपथेवर त्रिवार जाहीर करतो. हे ऐकून, आपल्या सन्मित्राच्या मृत्यूचा विचार मनाला लावून घेऊन पोटात मद्य ढकलीत आणि दुखवटयाचे हृदयस्पर्शी भाषण लिहीत काळ कंठलेल्या व्यंकटरावाला आपला मित्र अखेर मरत नाहीच; हे निराशाजनक सत्य जाणवते आणि तो भग्नमनस्क होतो. भगवंतराव आणि त्याची पत्नी यांच्यांतले गैरसमज दूर होतात आणि मृत्यूच्या म्हणजे विनाशाच्या भयाने ग्रासलेला हा बेडेकरांचा मध्यमवयस्क भगवंत मुस्कुटे नवनिर्मितीची सूचना देत हसतखेळत सपत्नीक शैय्यागृहाकडे निघून जातो.

' वाजे पाऊल 'चे हे ढोबळ मानाने कथानक. खरे तर आरंभीचा एकच मोठा घोटाळा सोडल्यास हे तसे कथानकाचे नाटक नव्हेच. प्रसंग घडतात ते बव्हंशी अपेक्षे-नुसारच, अपेक्षित संगतीने अपेक्षेहून कमी! या नाटकातले नाट्य प्रामुख्याने जाणवते ते त्याच्या व्यक्तिरेखात आणि संवादांत. व्यक्ती मर्यादित आहेत. एका कटाक्षाने नाटकाचे स्वरूप सुटसुटीत आणि बंदिस्त ठेवण्यात आले आहे. परंतु या मर्यादित



**दाजी भाटवडेकर आणि दामू केंकरे**
**दोघेहि अफलातून भूमिकेत 'हिट्ट' ठरले.**

व्यक्तीच नाटयपूर्ण प्रसंगांची, अकल्पित कलाटण्यांची उणीव काही अंशी भरून काढतात. विशेषत:, यांपैकी नायक भगवंतराव, त्याचा मद्यपी मित्र व्यंकटराव आणि फॅमिली डॉक्टर ऐनापुरे या व्यक्तिरेखांमुळे या नाटकात एक अवीट गोडी निर्माण होते. यात अर्थात या भूमिका तद्रूपतेने आणि भरपूर हशे पिकवीत करणारे अनुक्रमे दाजी भाटवडेकर, दामू केंकरे आणि सतीश दुभाषी यांचा मोठा वांटा आहेच. किंबहुना मूळ भूमिका आणि अनुरूप, गुणी नट यांच्या अपघाती मेळातूनच एखादी अविस्मरणीय व्यक्तिरेखा रंगभूमीवर आकारते. असे तीन अपघात या एका नाटकातच व्हावेत, हे या नाटकाचे भाग्य म्हटले पाहिजे. इतर व्यक्तिरेखा लेखन आणि अभिनय या दोही अंगांनी इतक्या गहिऱ्या जमलेल्या नाहीत तरीही नाटकाच्या रंगतीला विशेष बाध आणण्याइतके डावे यात कोणी राहत नाही आणि संघभावनेने हे सारे नाटकाचे मोल वाढवतात.

व्यक्तिरेखांखालोखाल या नाटकाचे आकर्षण त्याचे संवाद होत. हे संवाद सर्वसाधारणपणे अकृत्रिम, वरपांगी, सहजगत्या उच्चारल्यासारखे वाटणारे, श्रवणीय, वेधक, चुरचुरीत आणि अधून मधून विलक्षण खोचदार आणि चमकदार वाटतात. संवादलेखनाच्या या शैलीत बेडेकरांना जोड भेटणे कठीण हे अद्याप खरे आहे असे या नाटकाने जाणवते.

## विशुद्ध रंजन

दिग्दर्शन वा नेपथ्य वेगळे दाखवता येईल, असे या नाटकाच्या बंद्या रुपयासारख्या खणखणीत प्रयोगात नाही हेही आजच्या नाटकांपासून त्याचे वेगळेपण वाटते. रंगमंचावरील अनेक बारीकसारीक क्लृप्त्यांनी नाटकाची रंगत वाढलेली आपल्याला जाणवते; परंतु या क्लृप्त्या नाटकापासून अथवा नटांच्या भूमिकेनुरूप अभिनयापासून सहसा वेगळ्या उमटून पडत नाहीत. एका सधन माणसाचा दिवाणखाना रंगमंचावर मांडला जाऊनही त्यातले वैभव प्रेक्षकांना स्वतंत्रपणे दिपवून टाळी मागण्याचा प्रयत्न करीत नाही. प्रकाशयोजनेचे मोजके खेळ केले जातात तेही नाटकाला धरून वाटतात. थोडक्यात, तांत्रिक भागातही हे नाटक कटाक्षाने हलके-फुलकेच राहिले आहे. परिश्रमांचा घवघवीत प्रत्यय मिळूनही कोणताही नाटकबाह्य महत्त्वाकांक्षी हेतू त्यांमागे भासत नाही. भासतो तो हेतू एकच : विशुद्ध रंजन.

या रंजनापुरती या नाटकाची रंगत पहिल्या अंकास सातत्याने आणि वेगाने वाढते, दुसऱ्या अंकात हे सातत्य आणि हा वेग राहत नाही आणि कुठे कुठे नाटक रेंगाळते. तिसऱ्या अंकात पुन्हा ते वेग घेते. परंतु पहिल्या अंकाची लज्जत मनात तरीही राहून जाते. नाटक संपल्यावर मनात रेंगाळतो तो पहिला अंक.

मराठीत अशी केवळ रंजनप्रधान नाटके दुर्मिळ. प्रत्येकजण एक खरा-खोटा बोध घडवण्याची, प्रेक्षकांना धो धो रडवण्याची, हसवण्याची, किंवा दिपविण्याची जिद्द करताना दिसतो. मुक्तछंदातली आत्मगते, फिरते–सरकते रंगमंच, देदिप्यमान देखावे, सत्यसृष्टीतले खळबळजनक विषय, चित्रपटसृष्टीतील नटनटी, संगीतातले मोहरे, हमखास रडविणाऱ्या किंवा हसविणाऱ्या ठरीव भडक घटना, अतिरेकी अभिनय, गोळीबंद, दणदणीत सुभाषितांच्या फैरी, मोठमोठ्या गद्यपद्य जाहिराती, अशा अनेक साधनांनी, जणू गाढ झोपू पाहणाऱ्या प्रेक्षकाला जागे ठेवण्याचा जिवापाड अट्टाहासच मराठी नाटके करीत आहेत असा भास कितीकदा होतो. या परिस्थितीत अगदी जाहिरातीपासून लेखन–दिग्दर्शन–अभिनय–नेपथ्य अशा सर्व अंगांनी ' वाजे पाऊल ' हे रंजनप्रधान हलके-फुलके नाटकच राहिले आहे, हेच त्याचे उठून दिसणारे वैशिष्टच ठरेल.

वर उल्लेखिलेले सर्व बरे-वाईट प्रकार अखेर नाटकाच्या व्यावसायिक यशासाठीच असतात आणि ज्या मर्यादेत ज्याला ते झेपतील आणि व्यावसायिक पातळीवर यशस्वी करता येतील, त्याच्यापुरते ठीकही आहेत. परंतु एखादे व्यावसायिक नाटक असेही अधून मधून निघावे की, ज्याला फारसे काही ' स्टंट ' न करता, कोणत्याही अट्टाहासाशिवाय प्रेक्षकांना दोन घटका सहज आणि निखळ रिझविता यावे आणि तेवढ्या बळावर वाजवी काळ, वाजवी प्रयोग-संख्येपर्यंत ते विनासायास चालावे.

अशा एखाद्या नाटकाने समजूतदार प्रेक्षकांनाच आपल्या अभिरुचीविषयी विश्वास पटतो. ○




मनोहर रेगे

## □ नव्या टेबल-टेनिसपटूंचा उदय

सेंट झेव्हियर्स कॉलेजच्या खुल्या टेबल-टेनिस स्पर्धेतील उपान्त्यपूर्व फेरीमधील फरूक खोदायजी आणि दिलीप लाखाणी यांच्यामधील सामना असा काही विलक्षण रंगला की उपस्थितांच्या अंगावर त्याने रोमांच उठविले. टेबल-टेनिसच्या खेळाचे वैशिष्टच हेच आहे की, प्रत्येक खेळाडूला कितीही गुणांचे आधिक्य मिळाले तरी शेवटपर्यंत सावध राहावे लागते. चेंडूची दिशा, गती, फिरक आणि उशी यावर त्याला सतत एकाग्रचित्ताने नजरबंद व्हावे लागते. मनाचा समतोलपणा त्याला बिघडवून चालत नाही. प्रतिस्पर्ध्याच्या अस्तनीतील युक्त्याप्रयुक्त्या त्याला हेरून तसे डावपेच आखावे आणि अंमलात आणावे लागतात. अखेरपर्यंत उत्तम शारीरिक तंदुरुस्ती आणि शांत चित्त त्याला सांभाळून ठेवावे लागते.

खोदायजी–लाखाणी सामना झाला २१ जुलैला. त्यापूर्वी दहा दिवसच ब्रदर्स क्लब स्पर्धेत दिलीप लाखाणी यांनी 'टॉप सिडेड' रतीश चाचड यांचा अंतिम फेरीत १५–२१, २१–१८, १५–२१, २१–१६ आणि २१–१७ असा संस्मरणीय पराभव केला होता. शेवटच्या डावात तर रतीश चाचड १०–३ गुणांनी पुढे होते आणि सर्व काही संपत आले होते. लाखाणी म्हणजे तरुण लढवय्ये खेळाडू आहेत. प्रतिस्पर्ध्यावर जोरदार टोल्यांचा सतत हल्ला चढवून त्याला ते नेस्तनाबूद करण्याचा प्रयत्न करतात. याच स्पर्धेत लाखाणींनी सी. सी. आय. विजेत्या उदय गुर्जरना आणि २१–१६ अशी झुंझार लढत देऊन लोळविले होते.

आणि म्हणूनच राष्ट्रीय वीर फरूक खोदायजींबरोबर लढत देण्यास येताना दांडगा आत्मविश्वास, उत्तम सराव आणि नवा उन्मेष घेऊन ते आले होते. खोदायजींनी अलीकडच्या कुठल्याच स्पर्धेत भाग घेतला नव्हता. पण जबर अनुभव त्यांच्या पाठीशी होता. खोदायजींनी पहिला डाव २१–१७ गुणांनी मिळविला. दुसरा डाव लाखाणींनी २१–१८ ने जिंकला. एवढेच काय पण तिसरा डावही त्यांनी (२१–१४) खिशात घातला. चेंडूवर तुटून पडावयाचे हेच दिलीप लाखाणींचे ध्येय होते. कोन साधून बॅकहँडचे मारलेले फटके आणि लवलवत्या मनगटांनी दिलेले झटके खोदायजींच्या पवित्र्यातून निसटून जात आणि कित्येक वेळा तर ते चेंडूच्या रेषेत पोहोचूही शकत नसत. लाखाणींचे फोरहँड्चे तडाखे तर खोदायजींना काही करण्यास वेळही देत नसत.

परंतु अशाही परिस्थितीत खोदायजींनी नवशिक्या लाखाणींचा धांदरटपणा हेरला आणि त्यांना थोडी घाईगर्दी करू दिली आणि त्यातच लाखाणींचा बळी पडला. बॅकहँडवर भिस्त ठेवून आणि लाखाणींच्या चुकांवर लक्ष्य केंद्रित करून खोदायजींनी चौथा डाव पदरात पाडून घेतला (२१–१४). पाचव्या डावात मात्र त्यांनी बचावाचे धोरण स्वीकारले. चार सर्व्हिस पॉइंट्स मिळवून लाखाणी ६ गुणांनी (१३–७) त्यांच्यापुढे गेले. परंतु नव्या दमाच्या लाखाणींचा धीर इथे सुटला. विजयाकडे घोडदौड करीत असता त्यांच्या मेंदूचा समतोलपणा सुटला. अधीर मनाने ते वेडेवाकडे खेळू लागले. ओळीने सहा गुण त्यांनी फरूक खोदायजींना देऊन टाकले. २१–१६ गुणांनी अखेरचा डाव जिंकून झेव्हियर्स स्पर्धेत खोदायजी पुढे सरकले.

फरूक खोदायजींना दिलीप लाखाणींनी स्वतःच्या पराभवातही एक चांगला धडा शिकविला. अनुभवी खेळाडूंच्या ऐदीपणावर या सामन्याने एक नवे अस्त्र फेकले गेले. उदय गुर्जर, संजय मेहता, सुहास कुलकर्णी असे उदयोन्मुख टेबल-टेनिसपटू क्रीडा-क्षितिजावर प्रकर्षाने पुढे यत आहेत. आंतर-राष्ट्रीय टेबल-टेनिस स्पर्धेत नवे तंत्र, वेग आणि सामर्थ्यच भारताला उपकारक ठरणार आहे आणि त्या दृष्टीने अशा स्पर्धांवर क्रीडा-चालकांनी विशेष लक्ष पुरविले पाहिजे.

## ☐ खेळांकडे खेळ म्हणूनच पाहा

राष्ट्राराष्ट्राच्या इभ्रतीला धक्का पोहोचविणारा आणि क्रीडा स्पर्धांना काळीमा आणणारा किंबहुना खेळांचे मूलभूत अंग नष्ट करणारा यंदाचा एक नवीन प्रकार म्हणजे प्रेक्षकांची हुल्लडबाजी ! याला नवीन प्रकारांपेक्षा नवीन विषय म्हणणे अधिक पथ्यकर ठरेल. या वर्षाच्या सुरुवातीला कलकत्त्याच्या महशूर 'ईडन गार्डन्स' मैदानावर भारत आणि वेस्ट इंडिज यांमधील दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्यात वाजवीपेक्षा अधिक प्रेक्षकांची खेचाखेच झाल्याने प्रक्षुब्ध जमावाने सबंध क्रीडांगण डोक्यावर घेतले आणि 'ईडन गार्डन्सच्या' स्टँड्सना आगी लावल्या.त्यामुळे दुसऱ्या दिवशीचा खेळ बंद पडला. त्यानंतर हे लोण क्रिकेटवरून फुटबॉल क्रीडांगणापर्यंत पोहोचले. कलकत्ता आणि मद्रासला आपल्या संघांची बाजू घेऊन प्रेक्षकांनी खेळाडूंना मारहाण करण्यापर्यंत पाळी आणली आणि सामने अनिर्णित ठेवले. क्रिकेटची 'सेन कमिशन' चौकशी चालू आहे तर फुटबॉलच्या चालकांनी विनवणी–पत्रके काढून स्वतःवरच दोषांचे खापर फोडून घेतले व सबुरीची भाषा बोलून सर्वांना चुचकारून ती प्रकरणे एकदाची मिटवून टाकली.

चला, आता आपण इंडोनेशियातील बॅडमिंटन स्पर्धांकडे वळू. दहा जूनची ही हकीकत आहे. 'थॉमस कप' बॅडमिंटन स्पर्धेतील इंडोनेशिया आणि मलेशिया यामधील अंतिम फेरी जाकर्ताला चालू होती. मलेशिया ४–३ सामन्यांनी आघाडीवर होता. आणि दुहेरी फेरीतील एन्. जी. बून बी व तान यी खान (मलेशिया) आणि मुल्जादी व एगस सुसांटो ( इंडोनेशिया ) या दोन जोडचा हिरीरीने खेळत

होत्या. दोघांचा एकेक डाव बरोबरीने सुटला होता. त्याच वेळी उपस्थित असलेल्या १२,००० प्रेक्षकांना आपल्या देशाच्या प्रेमाचे भरते आले आणि त्यांनी मैदानात घुसून एकच दंगल उडवून दिली. गेली ९ वर्षे आपल्याकडे ' थॉमस कप ' ठेवणाऱ्या इंडोनेशियाच्या प्रेक्षकांना माहीत होते की, यंदा तो आपल्या हातून जाणार. ती मक्तेदारी संपुष्टात येणार म्हटल्याबरोबर प्रेक्षकांनी हुल्लडबाजी करून खेळ बंद पाडला. सैन्यदल मागविण्यात आले. विजेरी झगझगाट एकदम नाहीसा करण्यात आला. त्या अंधारातही ' थॉमस कप ' चकाकत होता.

१९६२ च्या जाकर्तामधील आशियाई क्रीडामहोत्सवात इंडोनेशियाच्या सरकारने इस्रायल आणि तायवान देशांच्या खेळाडूंना व्हिसे नाकारून खेळात राजकारण आणले होते. तीच पुनरावृत्ती इंडोनेशियाने या वेळी केली. आंतर-राष्ट्रीय बॅडमिंटन महासमितीचा वरील सामना त्रयस्थ न्यूझीलंड कोर्टावर खेळावा असा आदेश आला असताही इंडोनेशियाने ती प्रतिष्ठेची बाब करून आंतर-राष्ट्रीय समितीचे म्हणणे फेटाळून लावले. समितीचा निर्णय आम्ही मानणे म्हणजे आमच्या प्रेक्षकांवरच गैरवागणुकीचे शिक्कामोर्तब करणे असे वाटून ' थॉमस कप ' लवकरच या समिती-कडे परत केला जाईल असा मोठेपणाचा आव इंडोनेशियाने आणला. त्याअगोदर इंडोनेशियाने एक खुसपट काढून अनिर्णित राहिलेला सामना आम्ही जाकर्ता किंवा कुआलालंपूर येथेच खेळू व तोदेखील पहिल्यापासून, असा त्रागा केला.

' थॉमस कप ' तर आपल्या हातून सुटलाच पण किती अप्रतिष्ठेने आणि नामुष्कीने, याची आता इंडोनेशियाच्या प्रत्येक नागरिकाला हळहळ वाटत असेल. कलकत्त्याच्या किंवा मद्रासच्या सूज्ञ प्रेक्षकांनाही झालेल्या गैरप्रकाराबद्दल मनातून एक शिसारी आली असेल. भावनांचा उद्रेक होतो कसा क्षणभरच, पण त्याचे गंभीर परिणाम किती दीर्घकालपर्यंत टिकतात !

राष्ट्राची प्रतिष्ठा, देशाभिमान अशा उत्तम आणि उदात्त गुणांचा कितीही समुच्चय समुदायात उतरलेला असला तरी खेळांकडे खेळ म्हणूनच पाहावयास शिकले पाहिजे. युद्धात किंवा राजकारणात देशाची इभ्रत योग्य ठरत असली तरी क्रीडा-स्पर्धेत त्याचा पगडा प्रेक्षकांच्या मनावर होता कामा नये. उत्कृष्ट खेळाचे आणि खेळाडूंच्या कर्तृत्वाचेच चीज तिथे प्रेक्षकांच्या कौतुकाने झाले पाहिजे. मग तो प्रेक्षक कोणत्याही देशाचा असो, खेळातील उत्तमांगांचे दर्शन होत असताना क्रीडा-शौकी-नांनी तिथे संकुचित मनाने वावरता कामा नये. कारण खेळ हा त्याच्या मनाला विरंगुळा मिळण्याचे साधन. तिथे तो अनेक तत्त्वे घेऊन आला म्हणजे खेळ संपलाच ! परंतु अशी विचारांची निश्चित बैठक प्रेक्षकांत रुजेल तेव्हाच ना ! तूर्त तरी या गोष्टी अशक्य दिसतात. खेळांच्या प्रगतीचा प्रेक्षक हा एक मोठा आधार आहे. त्या दृष्टीनेच देशाची शासन-मंडळे, तेथील क्रीडा-संस्था आणि खेळ संबंधित व्यक्तींनी या गंभीर बाबींचा जरूर विचार करावा. ○

# तुमचे भविष्य आमचा अंदाज




**श्री. गो. जोशी**

सायनाचार्य, नासिक


ता. १९ ते २५ ऑगस्ट १९६७

**मेष :** शनि–मंगळांचा प्रतिकार झुगारून देऊन आपण निर्धाराने पुढे निघाला आहात, आणि सिंहराशीच्या सूर्याचे तुम्हांला आशीर्वचनही मिळालेले आहे "शुभास्ते पंथान:." आता तुम्हांला कुणाचीही डर नाही. परमेश्वर तुमच्या पाठीशी आहे.

शिक्षणासाठी, नव्या उद्योगधंद्यासाठी तुमचे स्थानांतर घडलेले असेल. नवे वातावरणही आपण लवकरच आत्मसात करू शकाल. या आठवड्यापासून चिरंतन स्मृतीच्या अनेक घटना घडून यायला लागतील. तुमच्या जीवनातील हे एक महान क्रांतिपर्व आहे. आता अपयश सहसा तुम्हांला भेटू शकणार नाही. जबाबदारी वाढेल. अनेक नवे स्नेहसंबंध जुळून येतील. आणि त्याच्या सहकार्यामुळेच फार मोठ्या जबाबदाऱ्या आपण यशस्वी करून दाखवाल.

दि. १९ चे २३ अनेक चांगल्या गोष्टी या वेळी घडाव्यात.

**वृषभ :** या वेळचे ग्रह तुमच्यावर निहायत खूष आहेत. त्यांच्या प्रेरणेमुळे आणि तुमच्या अचाट कर्तृत्वामुळे तुम्ही कुठेही गेलात तरी तुमचे स्वागतच होईल.

तुमच्या असीम माहात्म्याचा सर्वत्र गौरव होऊ लागेल. नवे लाभणारे क्षेत्र विक्रमी यशदायी ठरेल. कित्येक दिवसांत

लाभला नसेल इतका नेत्रदीपक यशाचा हा काल आहे.

उत्स्फूर्त लेखन घडेल. नवे विचार जगापुढे मांडले जातील. आपला जो जो व्यवसाय असेल तो आगामी महिन्यात प्रगतीला चढेल. स्थावराचा प्रश्न सोडविला जाईल. पैसा तर अनेक मार्गांनी हाती येऊ लागेल.

दि. १९ ते २२ हा काल चिरस्मरणीय प्रगतीचा ठरेल.

**मिथुन :** पराक्रमस्थानी एखादा ग्रह जरी आला तरी तो जीवनात नवचैतन्य निर्माण करू शकतो. आणि या वेळी तर चार ग्रहांची तिथे उपस्थिती झाली आहे. ते तुमच्या कर्तृत्वाला उधाण आणतील. सहसा कुणाला न होणारी कामे ते तुमच्या हातून घडवून आणतील.

प्रवास, बदल, बढती यांपैकी काहीही या वेळी घडावे. सांपत्तिक अडचणी काय-मच्या मिटाव्यात. राजकीय क्षेत्रातही तुम्हांला स्थान लाभावे.

अलीकडे कित्येक दिवसांत लाभला नसेल इतका सर्वांगीण प्रगतीचा काल तुमच्या वाट्यास सध्या आलेला आहे. त्याचे सहर्ष स्वागत करा.

दि. २० ते २३ या कालाची नोंद करा.

**कर्क :** धनस्थानी चार ग्रह म्हणजे ग्रहस्थितीचे वरदानच. अशा वेळी आपणांस चौथ्या मंगळाची बाधा सहसा होणार नाही.

व्यावसायिक अडीअडचणी काही प्रमाणांत दूर व्हाव्यात, शिकस्तीच्या प्रयत्नां-नंतर अपेक्षित यश पदरी पडावे. या सध्याच्या कालात काहीसे जुळते मिळते घेण्याची सवय ठेवलीत तरच तुमचे कुठे फारसे नडणार नाही.

अधिक मोठ्या जबाबदाऱ्या इतक्यातच उचलू नका. आणि लोकांनी दिलेल्या अभिवचनावर मुळीच विसंबून राहू नका. हे दिवस काहीसे बरे असले तरी पूर्ण-त्वाने आशादायक नव्हेत.

दि. २२ ते २५ अनुकूल व उत्साही काल.

**सिंह :** स्पष्ट—निर्भीड माणसे म्हणून तुम्हा सिंह राशी व्यक्तींचा लौकिक आहे. पराक्रमस्थ मंगळामुळे त्यात थोडी भरच पडेल. या वेळी सूर्यासमवेत अनेक ग्रहांचे तुमच्या राशीत आगमन घडलेले असल्यामुळे—जिद्द जागी होईल, निर्धार पेटून उठेल, शत्रूंची दाणादाण होईल.

औद्योगिक क्षेत्रात प्रचंड क्रांती घडवून आणण्याचे तुमचे स्वप्न साकार होईल. या आठ—पंधरा दिवसांतच विजयावर विजयी विक्रमी यश देणारा काळ हाच.

राजकीय क्षेत्रांतील तुमची उपस्थिती विशेष परिणामकारक ठरेल. या काला-पासून आपणांस दौऱ्यावरही निघावे लागेल.

दि. २१ ते २५ विशेष अनुकूल काळ.

**कन्या :** सूर्यादी ग्रह व्ययांत आल्याने तुमच्या प्रगतीला आणि प्रतिष्ठेला मुळीच बाध येणार नाही. एवढे मात्र घडण्याची शक्यता आहे, की तुमची राशी उग्र ग्रहांच्या

कात्रीत सापडलेली असल्यामुळे, परिश्रम फार करावे लागतील. जबाबदाऱ्यांचे ओझे असह्य वाटू लागेल; पण असले अनेक प्रसंग आजवर आपण अनुभवलेले आहेत आणि ते सारे पचवलेतही.

व्यावसायिक क्षेत्रात विनासायासे उच्च स्थान लाभेल. थोर-संपन्न व्यक्तींचे सहकार्य लाभल्याने तुमची सारी कामे अपेक्षेप्रमाणे गती घेऊ लागतील.

दि. १९-२०-२३ या काली अनेक कामे यशस्वी होतील.

**तूळ :** कधी नव्हते ते सूर्य-बुध-शुक्र, हे ग्रह आपल्या लाभस्थानी आता आलेले आहेत. त्यांच्या सहानुभूतीचा आणि सहकार्याचा आपण योग्य उपयोग करून घेतलात तर या वेळी तुमच्या साऱ्या योजना यशस्वी होतील, आपले सध्याचे दिवस इतके अनुकूल आहेत की, सहज काही करावे आणि ते अपेक्षेबाहेर यश घेऊन उठावे असा प्रत्यय पदोपदी यायला लागेल.

या आठवड्यात अनेक विवंचना मिटतील. व्यवसायधंद्यात उत्क्रांती घडून येईल. वैचारिक संघर्षही मिटतील.

दि. २१-२४-२५ या काळी अनेक चांगल्या गोष्टींचा प्रत्यय यावा.

**वृश्चिक :** सूर्य-गुरूच्या अनुकूलतेपुढे व्ययस्थ मंगळ दिपून जाईल. तुमच्या मार्गात अडचणी निर्माण करण्याचे धाडसच होऊ शकणार नाही. हा एक प्रतिज्ञेने यश मिळवून देणारा काल आहे.

व्यावसायिक व राजकीय हेतूने दूरचे प्रवास घडतील, यांत्रिक, वैद्यकीय व काही तांत्रिक व्यवसायस्थानी परप्रांतीय जाण्याची लक्षणेही दिसू लागतील.

स्थावराचे जमेल, वाहनांचे साधेल. या अनुकूल गोष्टींमुळे हा काल आपणांस कित्येक दिवस स्मरणात राहील. सांसारिक वातावरणही प्रसन्न बनू लागेल.

दि. २३ ते २५ या काळी अपेक्षित यश लाभावे.

**धनू :** आपल्या राशीच्या भाग्यस्थानी सूर्य-बुध-शुक्र इतके समर्थ ग्रह प्रकटले आहेत. कित्येक दिवसांत आपण अनुभवलेला नसेल इतका उत्तम काल तुमच्या वाट्यास आलेला आहे. आता क्षणार्धात तुमचे सारे पेचप्रसंग सुटायला लागतील.

नोकरीतील स्थानांतर घडेल, परप्रांती व्यवसाय उभारण्याच्या तुमच्या योजना आकार घेऊ लागतील, सांपत्तिक विवंचनाही मिटून जातील.

गुरू आता अष्टमस्थानी आहे नाही सारखाच. तुमच्या भाग्यस्थानी प्रवेश करण्यासाठी त्याने केव्हाच प्रस्थान काढून ठेवलेले आहे. थोडक्यात मला आपणांस असे सांगायचे आहे की, तुमच्या अपेक्षासाफल्याचा काल याच आठवड्यापासून सुरू होत आहे.

दि. २३ ते २५ या कालाची नोंद करा.

**मकर :** अनेक ग्रह अष्टमस्थानी आलेले आहेत म्हणून नाराज बनू नका. जो पर्यंत गुरू-शनी तुमच्या पाठीशी खडा पहारा करीत आहेत तोपर्यंत कोणत्याही

ग्रहाला तुमच्याकडे वाकड्या नजरेने पाहण्याची हिंमत होणार नाही.

उलट या आठवड्यापासूनच आपल्या साहसी कार्याला प्रारंभ होईल. आणि ते व्यावसायिक साहस अंगाशी येणार नाही अशी गुरूने हमी घेतलेली आहेच. जबाबदारी वाढू लागेल. अहोरात्र काम करून कामांचा डोंगर निपटून काढावा लागेल.

पैशा-अडक्याच्या व्यवहारात मात्र फार दक्षता बाळगा. कोणत्याही क्षणी फसवणूक होण्याचा संभव आहे.

दि. २२ ते २५ या काळी अनेकांचे सहकार्य लाभेल.

**कुंभ** : या आठवड्यातील विशिष्ट ग्रहस्थितीमुळे, तुमच्या मनातील पेटलेला संघर्ष विझून जाईल. त्याशिवाय अनेक व्यावसायिक विवंचना मिटून जातील. सांपत्तिक सुस्थितीचा हा काळ नसला तरी हरवलेले स्वास्थ्य या वेळी नक्कीच गवसेल.

नोकरीधंद्यासाठी व राजकीय कार्यक्रमासाठी प्रवास घडेल. आणि या प्रवासामुळेच भविष्यकालातील आत्यंतिक प्रगतीच्या घटना घडून यायला लागतील.

मतभेद, वादविवाद मिटू लागतील. नव्या जागेत स्थानांतर करण्याचे जवळजवळ निश्चित ठरेल. वाहनाच्या योजना आखल्या जातील. या काली आपल्या हातून काही विधायक आणि भरीव कार्य घडेल.

दि. २१ ते २४ या कालाचे महत्त्व प्रकर्षाने जाणवेल.

**मीन** : आपल्या साडेसातीला पायबंद घालण्यासारखी प्रभावी ग्रहरचना निर्माण झालेली आहे.

या आगामी ४–८ दिवसांत हुकलेल्या संधी पुन्हा लाभू लागतील. साऱ्या स्थगित कार्यांना चालना मिळेल आणि कधी न पाहणारी माणसेही तुमच्याशी आत्मीयतेने सहकार्य करू लागतील.

आठव्या मंगळामुळे प्रकृतीच्या तक्रारी मधून मधून जाणवायला लागल्या तरी आपल्या व्यावसायिक प्रगतीवर त्याचा फारसा अनिष्ट परिणाम होऊ शकणार नाही. तुमच्या साडेसातीतील अनिष्ट पर्व आता संपुष्टात आलेले आहे.

दि. १९–२०–२४–२५ या काळी बऱ्याच प्रगतिकारक गोष्टी घडाव्यात. ○


स्वादिष्ट मिठाईसाठी

आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी,

मंडई रस्ता, पुणे २.



# पुरंदरच्या बुरुजावरून

**ब. मो. पुरंदरे**

दख्खनची थैली आली. डाकेची थैली घेऊन स्वार चौखूर दौडत आला. लाल किल्ल्याच्या प्रचंड दरवाजातून स्वार दौडत दौडत किल्ल्यात प्रवेशला. बातमी अत्यंत महत्त्वाची होती. आनंदाची होती. औरंगजेब बादशहाला ही बातमी सादर झाली. बातमी ऐकताच बादशहाच्या डोळ्यांपुढे महत्त्वाकांक्षेची रोशनी झगमगू लागली. त्याला खात्रीच पटली की, आता सारी दख्खन आपल्या कबजात येणार! मुघल सलतनतीचे झेंडे मराठ्यांच्या रायगडावर लागणार!

आणि दख्खनची ती खबर साऱ्या लाल किल्ल्यात आणि लगोलग साऱ्या दिल्लीत वाऱ्यासारखी पसरली की, शिवाजीराजा भोसला मरण पावला! मुघल दौलतीचा कट्टा दुष्मन खलास झाला! नक्की नक्की मेला तो. आजपर्यंत त्याच्या मरणाच्या दहा वेळा खबरा आल्या. पण प्रत्येक वेळी त्या खोटचा ठरल्या. पण आता नक्कीच मेलाय तो.

खरोखरच महाराज छत्रपती शिवाजीराजे रायगडावर मरण पावले. उभं हिंदवी स्वराज्य दुःखात बुडालं. पण हिंदवी स्वराज्याच्या वैऱ्यांना मात्र ही आनंदाची वार्ता होती. गोव्याचे फिरंगी, जंजिऱ्याचा सिद्दी आणि दिल्लीचा आलमगीर, मनातले मनसुबे बाहेर काढू लागले. तो भयंकर शिवाजीराजा मेला. आता त्याच्या पोराच्या हातून मराठी दौलत सहज हिसकावून घेता येईल, अशी पक्की खात्री या साऱ्यांना वाटू लागली.

# पैजार पट्टी

आणि खासा औरंगजेब जातीने दख्खनवर निघाला. तीन लाखांच्या-वर शाही फौज कूच करून निघाली. हजारो तोफा, हजारो हत्ती आणि हजारो घोडेस्वार दख्खन भरडून काढण्यासाठी निघाले. धरण फुटल्यावर सुटावा तसा तुफानी लोंढा रोरावत सुटला. बादशहाचे तिघेही शाहजादे निघाले. अजम, मुअज्जम आणि कामबक्ष.

हे असलं दळबादल सुटलंय आणि औरंगजेब आपल्या तीनही पुत्रांसह चालून येतोय ह्या बातम्या स्वराज्यात आल्या.

औरंगजेब औरंगाबादेस येऊन पोहोचला. पण औरंगाबादेस पोहोचण्या-पूर्वीच त्याने आपली फौज मराठी स्वराज्यावर सोडली. शाहजादा अजम एका बाजूने कोकणात उतरण्यासाठी निघाला. हमीदुद्दीनखान रामशेजच्या किल्ल्यावर निघाला. शहाबुद्दीनखान पुण्याच्या रोखाने निघाला.

शहाबुद्दीनची पंधरा-वीस हजार फौज संगमनेरावरून जुन्नर-मावळात उतरली. खानाचा तळ ओतूरजवळ नदीकाठी पडला. तंबूराहुटयांची दाटी झाली. शाही झेंडे उंच फडफडू लागले. रात्री मशालींच्या उजेडात छाव-णीत गझल-कवाल्या रंगू लागल्या. ढोलकी, घुंगरं वाजू लागली. खानाच्या तंबूत पुढच्या चढाईची खलबतं खलली जाऊ लागली.

दिवसा खानाच्या छावणीतले अरब, पठाण, तुर्क आणि कझाक छाव-णीच्या आसपास स्वैर भटकू लागले. अन् त्यातच एक गंमत घडली.

खानाच्या छावणीतला एक हशम असाच एकटा भटकत निघाला. ओतूरहून जुन्नरकडे जाणाऱ्या रानवाटेने त्याने आपलं घोडं वळवलं होतं. सारं रान पिकांनी भरलं होतं. हिरवी पिवळी शेतं डुलत होती. हिरव्या झाडीच्या पलीकडे उंच उंच डोंगरपट्टी आभाळाला टेकली होती. त्यातच दिसत होता गड शिवनेरी. शिवछत्रपतींचा जन्म जिथं झाला तो गड शिवनेरी.

तो हशम दौडत चालला होता. भर शेतातून उभी पिकं तुडवीत तो

दौडत होता. वेळ सकाळची होती. तेवढ्यात त्या हशमाने आपला घोडा थांबवला. त्याचं लक्ष दूर पलीकडच्या टोकाला गेलं होतं. त्याने लगाम तिकडे वळवला. तो हावऱ्या नजरेने तिकडे पाहत होता. तिकडून आवाज येत होता, " हिर्रर्रर्रर्र हुईऽ ऽ ऽ ". मागोमाग गोफणीचा फटकारा उठत होता. खडा शेतातल्या ताटात सडाडत जात होता. पाखरांचा थवा सुसाट उडत होता. पण पुन्हा धिटाईने पिकावर बसत होता. पुन्हा गोफणीचा खडा सुटत होता. पुन्हा पाखरं उडत होती.

पिकांत उंच मचाणावर एक विशी-बाविशीची मराठी पोरगी गोफणीने पाखरं उडवीत होती. तिचा तोरा अस्सल मराठी होता. दंडात चांदीच्या येळा होत्या. नाकात वाटोळी नथ होती. भाळी वाटोळं कुंकू होतं. दुहेरी कासोटयाचं लुगडं आणि अंगी खणाची चोळी ती ल्याली होती. पदर डोईवरून खांद्यावर ढळला होता. केस भुरूभुरू उडत होते. सावळ्या रूपाची ही मराठमोळी रुक्मिणी त्या मोगली हशमाने पाहिली तो तसाच सरळ रेषेत निघाला त्या शेताकडे. आवतीभवती जवळपास कुणीच दिसत नव्हतं. हशम सरळ निघाला. तिला तो प्रथम दिसलाच नाही. ती आपल्याच नादात होती. ' हिर्रर्रर्रर्र हुईऽऽऽऽ ! '

पण हशम जरा पुढं आला अन् तिचं लक्ष गेलं. तो पुढं पुढं येत होता. तिला संशय आला. हा आपल्या रोखाने येतोय. नक्की याच्या मनी पाप आहे !

हशम तिच्या शेताच्या बांधाशी आला. तिची गोफण थांबली. तिने रोखलेल्या नजरेने त्याच्याकडे पाहिलं. तो हसत हसत घोड्यावरून उतरला आणि पुढं येऊ लागला. ती तशीच मचाणावर उभी होती. पुतळीसारखी. तो हशम बांधावरून शेतात उतरला अन् ती विजेसारखी कडाडली,

" थांब तथंच ! पाऊल म्होरं घालू नगस ! "

तो हसत पुढं पुढंच येत होता. मुघली वाघ हरणीचा वेध घेत येत होता. ती पुन्हा गरजली,

" गुमान माघारा फिर ! "

तिचे डोळे भडकले होते. पण त्याला तिचं काडीइतकंही भय वाटत नव्हतं. त्याला ती करमणूकच वाटत होती. तो हसत होता. तो थेट मचाणापाशी आला आणि आपले हात पसरून तिला म्हणाला,

"आव! —"

अन् तेवढ्यात तिने एकदम मचाणावरून उडी टाकली आणि काय घडतंय हे त्याच्या लक्षात यायच्या आतच तिने गोफणीचा सपकन् फट-कारा त्याच्या गालफडावर दिला! लगेच तिने मचाणाखाली ठेवलेली आपली वहाण उचलली आणि पापणी लवायच्या आतच त्या हशमाच्या थोबाडावर अशा आवेशाने लगावली की, त्याचा झोकच गेला. तिचा हा एल्गार इतका अकल्पित होता की हशम झांजावला. तिने कोलमडत्या हशमाच्या गळ्यात एकदम गोफणीचा विळखा टाकला आणि त्याच्या गालफडात आणखी एक वहाण लगावली. तो चिडून तिच्या अंगावर आला. पण तेवढ्यात तिने त्याच्याच कमरेची तलवार डाव्या हातांने सर्ररकन् ओढली. तिच्या हातात ती धारदार तलवार जाताच हशम पारच गळफटला. कारण त्याचं मरणच तिच्या हातांत गेलं. आणि मग उजव्या हाती उगारलेली तलवार धरून डाव्या हाताने ती त्याच्या अंगावर वहाण फेकून मारू लागली. तो तिच्यावर चाल करूच शकेना केली असती तर तलवारीखाली मरणच! तो माघारी पळत सुटला. ती आपल्या वहाणा उचलून त्याला फेकून मारीत होती. तो खाचखळग्यांतून पडत धडपडत पळत होता. पाठीवर मराठी वहाणा बसत होत्या. तो घोड्यापाशी आला, पण तिने त्याला घोड्यावरही बसू दिलं नाही. तो तसाच पळत सुटला. घोडं राहिलं बांधावर. ती वहाणा हाणीतच होती. तो जरा थांबतोय असं दिसलं की, तलवार होतीच मागे! वहाणा फेकू फेकू ती



त्याचा पाठलाग करीत होती. तो पळत होता. ती त्याच्या मागे दोन वहाणा आलटून पालटून हाणीत अन् तलवार उगारीत धावत होती. तो ओरडत ओरडत पळत होता, " माफ करो मुझे ! माफ करो, !"

ती पिसाळली होती. चवताळली होती. ती त्याच्या मागे धावत होती. बडवीत होती. किती तरी अंतर तोडून तो पळत आला होता. पण अजूनही ती पाठलाग करीतच होती. त्याला शिव्या देत होती.

तेवढ्यात समोरून घोडेस्वारांची एक टोळी येताना दिसली. तरीही ती त्याला पिटाळीतच होती. ती स्वारांची टोळी जवळ आली आणि थबकली. त्यात होता खासा शहाबुद्दीनखान. तो हे दृश्य पाहून विस्मितच झाला. मार खाणाऱ्या हशमाला त्यानं ओळखलं. तो त्याच्याच छावणीतला होता. खान त्या मुलीला उद्देशून ओरडला, " ठैरो ! ठैरो !"

तो हशम आणि ती मुलगी दोघेही थांबले. दोघेही घामाघूम झाले होते. एक मार खाऊन. दुसरी मार देऊन ! मार खाणारा तर आता खानापुढं शरमेने मेल्याहून मेला झाला होता. खानाने विचारलं,

" आय् लडकी, क्या हुवा ?"

" इचार तुझ्याच लाडक्याला ! मेला माझ्या अब्रूवर उठतोय !"

खान चकीतच झाला. मराठ्याच्या एका पोरीने आपल्या एका मर्दाला पैजाराने झोडपीत पिटाळावं ? खान बघतच राहिला. ती मुलगी आपल्या वहाणा आपल्या पायांत घालीत म्हणाली,

" पुन्हा येशीला तर तुझा मुडदाच पडल ! जाय गुमान ! तुजी शिपायगिरी हथं नगं दावूस ! "

तिने तलवार त्याच्यापुढं फेकली आणि ती माघारी फिरली. रप् रप् वहाणा वाजू लागल्या. तिच्या पाठमोऱ्या ताठ आकृतीकडे खान बघतच राहिला आणि पुटपुटला,

" हा मराठी मुलूख काबीज करणं अवघड आहे!"

आणि त्या धुळीने माखलेल्या आपल्या हशमाकडे संतापाने नजर फेकून खान ओरडला,

" बेवकूब !"

ज्या शिवारात त्या मुलीने त्या हशमाला पैजाराने झोडपीत पिटाळलं त्या तेवढ्या पट्टीला नांव पडलं पैजार पट्टी. ○

ज्वलंत राष्ट्रवादाच्या

भयानक दीप्तीचा

ललितभव्य आलेख

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

मूल्य पंचवीस रुपये

'माणूस'मधून प्रसिद्ध झालेल्या

प्रदीर्घ लेखमालेची सुधारित ग्रंथावृत्ती.

राजहंस प्रकाशन,

४१९ नारायण पेठ, पुणे २.

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H-646

"डायमंड"

टॅक्सी व रिक्षा मीटर्स

भारतात सर्वप्रथम निर्मिती

डायमंड क्लॉक मॅन्यु. कं. प्रा. लि.,

११८० बुधवार पेठ, पुणे २

डायमंड वॉच कंपनी

११७९ बुधवार पेठ, पुणे २.

महाराष्ट्रातील ख्यातनाम घड्याळजी. सर्व प्रकारची घड्याळे व इन्स्ट्रुमेंटस् चोख दुरुस्त केली जातात.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा, लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**